पुणे, शनिवार, १ मार्च २०२५ | RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 94 | वर्ष ४ थे, अंक ९४ | किंमत ₹ ६ | पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News



सांस्कृतिक राजधानीला विकृत घटनांचा 'काळीमा'

P३

पीटरसनचे दिल्ली कॅपिटल्समध्ये पुनरागमन

१२



## At a Glance

### मुख्यमंत्री कार्यालयावर हल्ला करण्याची धमकी

**मुंबई :** मुंबई वाहतूक पोलिसांना व्हाट्सअ‍ॅपवरून मंत्रालयातील मुख्यमंत्री कार्यालावर हल्ला करण्यात येईल, अशी धमकीचा मेसेज आल्याने मोठी खळबळ उडाली होती. या प्रकरणी वरळी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. या धमकेच्या मेसेजमुळे पोलीस यंत्रणा अलर्ट मोडवर आली असून धमकी देणाऱ्याचा शोध पोलीस

» पान ७ वर

### भाषा आणि भूमीसाठी सतत संघर्ष करणार

**चेन्नई :** तीन भाषा धोरणाविरुद्ध लढण्याची गरज आणि लोकसभा, विधानसभा मतदारसंघांचे सीमांकन यामुळे राज्यातील वातावरण अशांत होत चालले आहे. सीमांकन हा राज्याच्या स्वाभिमान, सामाजिक न्याय आणि लोककल्याणकारी योजनांशी संबंधित विषय आहे. स्वातंत्र्यानंतर ७५ वर्षांनाही याच मुद्द्यावर लढायचे असेल, तर दक्षिण

» पान ७ वर

# आरोपी दत्ता गाडेच्या मुसक्या आवळल्या

## पण 'कहानी में ट्विस्ट': आरोपी म्हणतो, बलात्कार नाही; पूर्वीपासूनचे संबंध

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** स्वारगेट बसस्थानकात तरूणीवर बलात्कार करणारा बलात्कारी नराधम दत्तात्रय गाडे याच्या मुसक्या आवळण्यात पुणे पोलीसांना अखेर यश आले आहे, स्थानिक नागरिकांच्या मदतीने पोलीसांनी ही कामगिरी केली. अटक करण्याच्या आधी त्याने तीनवेळा आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक माहिती उघडकीस आली असून त्याला जेरबंद करण्यात आले त्यावेळी त्याच्या हातात पोलीसांना विषारी औषधाची बाटली सापडली आहे. त्याला आज न्यायालयात हजर केले असता १२ दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले.

परंतु आरोपीने ताब्यात आल्यानंतर केलेल्या काही धक्कादायक खुलासाने हे संपूर्ण प्रकरणच बदलण्याची शक्यता आहे. संबंधित महिलेवरती मी कुठलाही अत्याचार बलात्कार केला असून आमचे पूर्वीपासूनचे संबंध आहेत आणि ठरवूनच ही वेळ आणि ठिकाण ठरवले होते, असे त्यांनी सांगितले. म्हणूनच महिलेने कुठलाही प्रतिकार केला नाही, आरडाओरडा केला नाही, असे तो म्हणाला.

गाडे याने बुधवारी (दि. २६) स्वारगेट बसस्थानकात उभ्या असलेल्या

» पान ७ वर



"महिलांवरील अत्याचारांच्या गुन्ह्यात अटक करण्यात आलेल्या आरोपींची नियमित तपासणी करण्यात यावी. बलात्कार आणि विनयभंगाचे गुन्हे दाखल असलेल्या सराइतांना पोलीस ठाण्यात बोलावून त्यांची चौकशी करण्यात यावे, असे आदेश शहरातील सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रमुखांना देण्यमात आले आहेत."

— **अमितेश कुमार,** पोलीस आयुक्त, पुणे

## युवक काँग्रेसचे आंदोलन

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**पुणे :** स्वारगेट बलात्कार प्रकरणातील आरोपी दत्ता गाडे याला फाशीची शिक्षा व्हावी तसेच गृहमंत्री, पालकमंत्री यांनी राजीनामा द्यावा यासाठी कँप पोलीस स्टेशनबाहेर युवक काँग्रेसने आंदोलन केले.

# कदमही विरोधकांच्या रडारवर

## राजीनाम्याच्या मागणीचा जोर वाढला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मंत्री धनंजय मुंडे, माणिकाराव कोकाटे यांच्या पाठोपाठ महायुती सरकारमधील आणखी एका मंत्र्याच्या राजीनाम्याची मागणी जोर धरू लागली आहे. पुण्यातील बलात्कार प्रकरणी राज्याचे गृहमंत्री योगेश कदम यांचे वक्तव्ये अतिशय बेजबाबदारपणाचे आणि असंवेदनशील असल्याने त्यांचा राजीनामा घ्यावा, अशी मागणी खासदार अमर काळे यांनी केली आहे.


पुण्यातील बलात्काराच्या घटनेनंतर आरोपी तीन दिवसानंतर पकडला गेला असला तरी या सरकारचे हे मोठे अपयश आहे. अशा घटना सावधपणे आणि संवेदनशीलपणे हाताळाव्या लागतात. मात्र मंत्रीच बेजारपणाचे वक्तव्य करतात, आरोपीलाच पाठीशी घालण्याचे काम करीत असतील त्याचा जाव विचारणे मुख्यमंत्र्यांना आवश्यक आहे.

राज्याचे गृहमंत्री योगेश कदम यांचा आम्ही निषेध करतो. पुणे हे सांस्कृतिक वारसा जपणारे शहर आहे. मात्र आता येथील प्रचंड गुन्हेगारी वाढत चालली आहे. बलात्कार, चोरीच्या घटना वाढत चालल्या आहेत. काही गुंडाची दहशत वाढत चालली आहे. त्यामुळे पुण्याची ओळख पुसल्या जात आहे. या सर्व घटनांमुळे पुण्याचा नावाला काळीमा फासण्याचा काम होत आहे.

राज्याचे गृहमंत्री तथा मुख्यमंत्री यांनी नैतिक जबाबदारी या निमित्ताने घेतली पाहिजे. बेजवाबदार वक्तव्य करणारे योगेश कदम यांच्यावर कारवाई केली पाहिजे त्यांचा राजीनामा घेतला पाहिजे, अशी मागणी अमर काळे यांनी केली. अमर काळे वर्धा मतदारसंघाचे आमदार आहेत. शरद पवार यांनी काळे यांना काँग्रेसमधून आयात करून राष्ट्रवादीकडून उमेदवारी दिली होती. त्यांनी धक्कादायक विजयाची नोंद केली होती.







### रामदास कदमांना टोला

- गंगेत जाऊन स्नान करणे हीच काही हिंदुत्वाची खरी ओळख नाही. प्रत्येकाची हिंदुत्वाची व्याख्या वेगवेगळी राहू शकते. त्यामुळे रामदास कदम यांच्या वक्तव्याला फार गांभीर्याने घेण्याची गरज नाही. कोणी कुठे आंघोळ करावी, प्रार्थना करावी हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे असे सांगून खासदार काळे यांनी कदमांना टोला लगावला.

## सेबीचे नवे प्रमुख तुहिन कांत पांडे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने वित्त सचिव तुहिन कांत पांडे यांची सेबीचे ११ वे प्रमुख म्हणून नियुक्ती केली. पांडे ओडिशा-केडरचे भारतीय प्रशासकीय सेवा (आएएस) अधिकारी आहेत. त्यांची तात्काळ प्रभावाने नियुक्ती करण्यात आली असून पुढील तीन वर्ष त्यांचा कार्यकाळ असेल, असे केंद्र सरकारने नियुक्तीच्या आदेशात नमूद केले आहे. सेबीच्या १० व्या प्रमुख माधबी पुरी बुच यांचा ३ वर्षांचा कार्यकाळ शुक्रवारी पूर्ण झाला आहे. त्यामुळे नव्या प्रमुखांची नियुक्ती करण्यात आली आहे. गुरुवारी रात्री उशिरा जारी करण्यात आलेल्या केंद्र सरकारच्या आदेशानुसार मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने पांडे यांची सेबीच्या प्रमुखपदी नियुक्ती करण्यास मान्यता दिली आहे.

# फडणवीसांच्या कृती कार्यक्रमावर पवारांच्या टास्क फोर्सचा 'वॉच'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १०० दिवसांचा कृती कार्यक्रम जाहीर केला आहे. सरकारने १०० दिवसाच्या कार्यक्रमाचा कृती कार्यक्रम जाहीर करताच माजी केंद्रीय मंत्री शरद पवार सक्रिय झाले आहेत. शरद पवार यांनी सरकारच्या या कृती कार्यक्रमावर वॉच ठेवण्यासाठी एक टास्क फोर्सच तयार केली आहे. पक्षातील आमदार आणि खासदारांना विभागनिहाय जबाबदारी देऊन सरकारच्या कामांवर लक्ष ठेवण्यास सांगितले आहे. त्यामुळे शरद पवार हे येत्या काळात राज्य सरकारला घेरण्याच्या तयारीत असल्याचे सांगितले जात आहे.

शरद पवार यांच्या गटाचे खासदार अमोल कोल्हे यांनी पत्रकार परिषद घेऊन या बाबतची माहिती दिली आहे. आज शरद पवार यांनी खासदारांची बैठक बोलावली होती. या बैठकीत सरकारच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमाचे मूल्यमापन करण्यासाठी टीम तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच विभागनिहाय जबाबदारीचंही वाटप करण्यात आले आहे. येत्या ७-८ ताखेपासून विभागनिहाय दौरे करण्यात येतील, अशी माहिती अमोल कोल्हे यांनी दिली. येत्या ७ ते ८ तारखेपासून राष्ट्रवादीचे दौरे सुरू होतील. यात वीज दरवाढ, महिलांवरील अत्याचार, पाणीपट्टी वाढ आदी विषयांवरून लोकांच्या भूमिका जाणून घेतल्या जाणार आहेत.

शरद पवार गटाने हंड्रेड डेज ट्रॅकिंग टास्क फोर्स तयार केली आहे. सरकारच्या १०० दिवसीय कार्यक्रमावर लक्ष ठेवण्यासाठी पवार गटाने शॅडो कॅबिनेट तयार केली आहे. राज्यभरात या प्रभारींची नियुक्ती करण्यात आली आहे. यावेळी शरद पवार यांनी

» पान ७ वर

### पवार गटाचा टास्कफोर्स



- **मराठवाडा**- राजेश टोपे आणि जयप्रकाश दांडेगांवकर
- **विदर्भ**- राजेंद्र शिंगणे आणि अनिल देशमुख
- **कोकण**- जितेंद्र आव्हाड आणि सुनिल भुसारा
- **पश्चिम महाराष्ट्र**- हर्षवर्धन पाटील, शशिकांत शिंदे
- **उत्तर महाराष्ट्र**- हर्षवर्धन पाटील

## कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** देशातील कोट्यवधी नोकरदार वर्गासाठी आनंदाची बातमी असून ईपीएफओने कर्मचारी भविष्य निर्वाह निधीवर ८.२५ टक्के व्याजदर कायम ठेवला आहे. गेल्या आठवड्यात कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या गुंतवणूक व लेखा समितीने संस्थेच्या उत्पन्न आणि खर्चाचा आढावा घेतला. ज्यामध्ये बोर्डाने ठेवीवरील व्याजदरात कपात करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर पीएफच्या व्याजदरातही कपात होण्याची शक्यता होती. प्रत्यक्षात सेवानिवृत्ती संस्था ईपीएफओने कर्मचारी भविष्य निर्वाह निधीवर ८.२५ टक्के व्याजदर कायम ठेवला आहे.

ईपीएफओ बोर्डाच्या बैठकीत सूत्रांनुसार,


» पान ७ वर

वैशाली हॉटेल फसवणूक प्रकरण

# आरोपी पतीचा जामीन अर्ज फेटाळला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** हॉटेल वैशालीचे मूळ मालक जगन्नाथ शेट्टी यांची मुलगी आणि वैशाली हॉटेलच्या मालक निकिता शेट्टी यांच्या नावे बनावट सह्या, कोरे धनादेश आणि कागदपत्रांच्या आधारे तब्बल पाच कोटी रुपयांचे कर्ज काढून त्यांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी आरोपी पतीसह बँक अधिकाऱ्यांचा अटकपूर्व जामीन अर्ज मा. उच्च न्यायालयाने फेटाळून लावला आहे. मूळ फिर्यादी यांच्यावतीने जेष्ठ विधिज्ञ अ‍ॅड. राजू पाटील, अ‍ॅड. निरंजन मुंदरगी, अ‍ॅड. हर्षद साठे व अ‍ॅड. निखिल मालाणी यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरत या तिघांचा अटकपूर्व जामीन अर्ज न्यायमूर्ती श्री. शीवकुमार दिघे साहेब यांच्या समोर झालेल्या अंतिम सुनावणीमध्ये फेटाळून लावला. त्यामुळे आरोपींच्या अटकेचा मार्ग मोकळा झाला आहे.



उच्च न्यायालयाने सत्र न्यायालयाचा आदेश कायम करत आरोपींचा जामीन अर्ज फेटाळताना निरीक्षण नोंदवले की, या कर्ज प्रकरणामध्ये कोटक महिंद्रा बँकेचे कोणीही अधिकारी अथवा बँकेने नेमलेल्या एजंटनी फिर्यादी निकिता शेट्टी यांची कधीही चौकशी केली नाही, त्यांना प्रत्यक्ष भेटले नाही. या उलट ते आरोपी विश्वजित व निकिता हॉस्पिटॅलिटी एलएलपी याचे कर्मचारी यांनाच भेटले. या कर्जप्रकरणातील कागदपत्रावर निकीताची स्वाक्षरी नव्हती, हे हस्ताक्षर तज्ज्ञांच्या अहवालावरून प्रथमदर्शनी सिद्ध झालेले आहे. या कर्ज प्रकरणाच्या अर्जावर 'निकीता हॉस्पिटॅलिटी एलएलपी'चा बनावट शिक्का मारण्यात आल्याचे निदर्शनास आले. बँक मॅनेजरने व डी.एस.ए. ने त्याच्या अर्जात उल्लेख केलेला आहे की मी निकिता यांना कर्ज प्रकरणावेळी एकदाही भेटलो नाही, त्यांच्याच पतीने सर्व गोष्टींची पूर्तता केली. तसेच, कर्ज हे हॉटेल वैशालीचे सेंट्रलाईज्ड किचन तयार करण्यासाठी घेतले होते. मात्र, आरोपी विश्वजित याने ते स्वतःच्या आर्थिक लाभासाठी वापरून निकिता हिची मिळकत व पैसे यांचा गैरलाभ घेण्याचे, बळकावून घेण्याचे हेतूनेच हे कर्ज प्रकरण केले. विश्वजितच्या इतर गुन्ह्यातील सह-आरोपी वकील इरफान शेख यांनी मोदिबाग को-ऑप हौसिंग सोसायटीचा ना-हरकत दाखला घेतला. सोसायटीचे

» पान ७ वर

## बालकांच्या आरोग्य तपासणीची राज्यस्तरीय मोहिम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्यस्तरीय राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (आरबीएसके) अंतर्गत दीड कोटीपेक्षा अधिक बालकांची सर्वांगीण आरोग्य तपासणी होणार असून, या मोहिमेचा शुभारंभ एका मेळाव्याद्वारे १ मार्च रोजी उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालक मंत्री अजित पवार यांच्या हस्ते होणार आहे. राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांचे संकप्रेतून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमला मुरलीधर मोहोळ, राज्यमंत्री, सहकार आणि नागरी उड्डाण, भारत सरकार, शरद पवार, राज्यसभा सदस्य, सुनेत्रा पवार, राज्यसभा सदस्य, सुप्रिया सुळे, लोकसभा सदस्य, मा.श्रीरंग बारणे, लोकसभा सदस्य,

» पान ७ वर

# पुणे जिल्ह्यातून दररोज १४ महिला बेपत्ता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** एकीकडे शहरात बलात्काराच्या घटनांमुळे महिला खरेच किती सुरक्षित आहेत का, असा प्रश्न उपस्थित होत असताना, शहरातून महिला व तरुणी बेपत्ता होण्याच्या घटनांमध्येही मोठी वाढ होताना दिसून येत आहे. १ जानेवारी ते २७ फेब्रुवारीदरम्यानच्या कालावधीत पुणे जिल्ह्यातून (पुणे शहर, पिंपरी-चिंचवड आणि ग्रामीण) तब्बल ७६७ तरुणी आणि महिला बेपत्ता झाल्या आहेत.



पुणे जिल्ह्याचा मोठा विस्तार आहे. तसेच, पिंपरी- चिंचवड आणि पुणे शहर या दोन महत्त्वाच्या महानगरांचा समावेश या जिल्ह्यात आहे. नोकरी, शिक्षण आणि व्यवसायाच्या निमित्ताने राज्यातील नागरिकांबरोबरच परप्रांतियांचा देखील मोठा ओढा या शहरांकडे आहे.

पुणे शहरातून २४३, पिंपरी- चिंचवडमधून २७१ तर पुणे ग्रामीणमधून २५३ महिला आणि तरुणी बेपत्ता झाली आहे. या बेपत्ता महिलांचा विचार केला, तर दिवसाला सुमारे चौदा तरुणी बेपत्ता झाल्याचे पोलिसांच्या नोंदीवरून दिसून येते. काही बेपत्ता घटनांच्या नोंदीमध्ये काही महिला पुन्हा घरी परतल्याची माहिती आहे. परंतु, अनेक महिलांचा अद्यापही पत्ता लागला नसल्याचे वास्तव यानिमित्ताने समोर आले आहे.

## विरोधी पक्षनेते पदावर उद्धव ठाकरे करणार दावा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** ठाकरेंची शिवसेना लवकरच विरोधी पक्षनेते पदाचा दावा विधानसभा अध्यक्षांकडे करणार आहे. मातोश्रीवर शुक्रवारी आमदारांची बैठक झाली. या बैठकीमध्ये अर्थसंकल्पीय अधिवेशनात पक्षाशी रणनीती आणि विरोधी पक्ष नेते पदासंदर्भात चर्चा झाली. विरोधी पक्षनेते पदासाठी भास्कर जाधव, आदित्य ठाकरे आणि सुनील प्रभू यांच्या नावावर विचार झाल्याची माहिती मिळत आहे. अनुभव आणि विषय मांडण्याची आक्रमकता पाहता भास्कर जाधव यांचं नाव विरोधी पक्षनेते पदासाठी आघाडीवर असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

» विधानसभा

विरोधी पक्षनेते पदा संदर्भात विधानसभा विधान परिषद आमदारांसोबत तासभर उद्धव ठाकरे यांनी चर्चा केली. आपणच आपल्यापैकी नाव विरोधी पक्षनेते पदासाठी सांगावं, असं उद्धव ठाकरे यांनी आपल्या आमदारांना सांगितलं. विरोधी पक्षनेते पदासाठी ठाकरेंच्या शिवसेनेकडून दावा केला जात असताना नाव जरी समोर आलं नसलं तरी पत्रावर सर्व आमदारांच्या सह्या घेण्यात आल्या आहेत.

# परिवहन सेवेची दयनीय अवस्था

## आगारांचे तातडीने सुरक्षा लेखापरीक्षण करण्याचे आदेश

### सुरक्षा

आगारात प्रवाशांना सोडल्यानंतर चालक-वाहकाने एसटीच्या गाड्यांना आतून लॉक करावे, असे आदेश एसटीच्या पुणे विभागाचे विभाग नियंत्रक प्रमोद नेहुल यांनी दिले



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** एसटी स्थानके आणि आगारांमधील सर्व बसना प्रवासी उतरल्यावर लॉक करण्याचे आदेश विभागातील १४ डेपोंना पुणे विभाग नियंत्रकांनी दिले आहेत. त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षेत कोणतीही बाधा येणार नाही, असा विश्वास एसटीच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला. खरेतर स्वारगेट डेपो बलात्कार प्रकारानंतर महिला सुरक्षा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला.

एसटी महिला प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता बसस्थानकावर असलेल्या सुरक्षा रक्षकांमध्ये महिला सुरक्षा रक्षकांची संख्या वाढविण्याकडे कल असला पाहिजे.



स्वारगेट आगारात घडलेल्या घटनेच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांच्या सुरक्षेबाबत आता प्रशासनाकडून काय उपाययोजना केल्या जाणार आहेत, याचा आढावा गुरुवारी घेण्यात आला. या मध्ये आगारात प्रवाशांना सोडल्यानंतर चालक-वाहकाने एसटीच्या गाड्यांना आतून लॉक करावे, असे आदेश एसटीच्या पुणे विभागाचे विभाग नियंत्रक प्रमोद नेहुल यांनी दिले.

या घडलेल्या घटनेनंतर तरी एसटी प्रशासन जागे होणार आहे का? आगारात, स्थानकांमध्ये बस लागल्यावर आणि त्यातून प्रवासी उतरून गेल्यावर अनेक चालक-वाहक गाडीचे दरवाजे उघडे ठेवून जात असल्याचे समोर आले आहे. त्यातच स्वारगेट आगारात दरवाजे उघडे राहिल्यामुळेच अशी घटना घडली आहे. यामुळे विभाग नियंत्रकांनी दरवाजे आतून लॉक करण्याचे चालक-वाहकांना सक्त आदेश दिले आहेत.

याचे पालन होत आहे की नाही, हे पाहण्यास सुरक्षारक्षकांना सांगण्यात आले आहे.

### आढावा बैठकीतील प्रमुख आदेश

- चालक-वाहकांनी बस आणल्यानंतर बस लॉक केली आहे की नाही, याची तपासणी सुरक्षारक्षक करणार आहेत.
- याची नोंद दफ्तरी केली जाणार आहे.
- बेफिकीर चालक-वाहकांबाबत माहिती मिळाल्यावर कडक कारवाई करण्यात येणारआहे
- बसगाड्यांचे खराब लॉक बदलणार आणि नवी यंत्रणा कार्यान्वित करणार

#रा



वेल्हे तालुक्यातील शिरकोली येथील सुप्रसिद्ध शिरकाई देवीच्या अत्यंत प्रसन्न व मंगलमय रूप



## गुरुजन कृतज्ञता सन्मान सोहळ्यासाठी पुण्यात बैठक

**पुणे :** दयानंद विज्ञान महाविद्यालयात अध्यापनाने अनेक विद्यार्थ्यांच्या जीवनाचा कायापालट करणाऱ्या तसेच संस्थेच्या नावलौकिक वाढवण्यामध्येही मोलाचा वाटा असणा-या गुरुजनांचा माजी विद्यार्थ्यांच्या वतीने कृतज्ञता सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला आहे. सोहळ्याच्या तयारीसाठी पुण्यात शासकीय विश्रामगृह येथे बैठक नुकतीच आयोजित करण्यात आली.न्या.शिवकुमार डिगे (मुंबई उच्च न्यायालय),डॉ. सुहास कोंडेकर,ॲडव्होकेट टी.ए.पटेल,रेवणसिद्ध कुंभार,राम सागरे,प्रा.योगेश बेलोलकर,श्री. किणीकर,गिरीश कुलकर्णी,डॉ.कोरे,डॉ.दिलीप माने,श्रीमती वर्षा उपस्थित होते.डॉ.सुहास कोंडेकर यांच्या पुढाकाराने ही बैठक पार पडली.

रविवार, दि. २ मार्च २०२५ रोजी सकाळी १० वाजता दयानंद विज्ञान महाविद्यालय(लातूर)येथे हा कृतज्ञता सन्मान सोहळा होणार आहे.न्या.शिवकुमार डिगे (मुंबई उच्च न्यायालय) हे अध्यक्ष म्हणून उपस्थित राहणार आहेत.लक्ष्मीरमण लाहोटी,रमेश बियाणी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.पुण्यातील माजी विद्यार्थ्यांनी देखील उपस्थित राहावे,असे आवाहन करण्यात आले आहे.



## भारतीय विद्या भवनमध्ये आज 'लक्ष्य' नृत्य कार्यक्रम

**पुणे :** भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाऊंडेशनच्या सांस्कृतिक प्रसार उपक्रमांतर्गत 'लक्ष्य 'हा नृत्य कार्यक्रम पुण्यात आयोजित केला आहे.ज्येष्ठ ओडिसी नृत्य प्रशिक्षक झेलम परांजपे (मुंबई) या ओडीसी नृत्य सादर करणार आहेत ,धनश्री नातू-पोतदार (पुणे) या कथक नृत्य सादर करणार आहेत ,सागरिका पटवर्धन(पुणे) या भरतनाट्यम नृत्य सादर करणार आहेत.हा कार्यक्रम शास्त्रीय नृत्य संवर्धन संस्था,पुणे प्रस्तुत करणार आहे.शनीवार,दि.१ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता भारतीय विद्या भवन (सेनापती बापट रस्ता) सभागृहात होणार आहे. हा कार्यक्रम विनामूल्य असून भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाऊंडेशनच्या सांस्कृतिक प्रसार कार्यक्रमांतर्गत होणारा २३५ वा कार्यक्रम असल्याची माहिती भारतीय विद्या भवनचे सचिव प्रा.नंदकुमार काकिर्डे यांनी दिली.

## रसिकलाल धारीवाल यांच्या जन्मदिनानिमित्त रक्तदान शिबीर

**पुणे :** दरवर्षी १ मार्च रोजी श्री रसिकलाल धारीवाल यांच्या जन्मदिनानिमित्त “रक्तदान सोहळा” आयोजित



केला जातो या आधीही त्यांच्या जन्मदिनानिमित्त पुण्यामध्ये विविध रक्तदान केंद्रांवर एकाच दिवशी २४ हजार ब्लड बॅग्स संकलन करण्याचा विक्रम आर एम डी फाउंडेशनने केलेला आहे, हि परंपरा आजही नियमितपणे पाळल्या जाते .

तसेच आर एम डी फाउंडेशन द्वारा मागील ३० वर्षांपासून वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन कार्यक्रम निरंतर चालू आहे . श्री रसिकलाल धारीवाल यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त “एक लाख झाडं लावण्याची योजना” असेल किंवा "पुलकछाया योजने" अंतर्गत भारतभर वृक्ष लागवड असेल किंवा "एक झाड आईच्या नावाने" योजना असेल तेव्हा आर एम डी फाउंडेशन द्वारा शेकडो वृक्ष लागवड व संवर्धन कार्यक्रम राबविण्यात आलेले आहे . आज काळाच्या बदलत्या गरजेनुसार "ट्री ट्रान्सप्लांटेशन योजना" पुणे रिंग रोड प्रकल्पातील शेकडो वृक्षांना कापण्यापासून वाचवून उपलब्ध जागेत स्थानांतर करून अनेक वृक्षांचे प्राण वाचविण्याचे काम जान्हवी धारीवाल बालन अध्यक्षा आर एम डी फाऊंडेशन यांच्या संकल्पनेतून सुरु झालेले आहे . या प्रसंगी " वृक्ष लागवड आणि रक्तदान वाचवी मानवाचे प्राण" अशी भावना उपाध्यक्षा शोभाताई रसिकलाल धारिवाल यांनी व्यक्त केली .

आज दिनांक १ मार्च रोजी श्री रसिकलाल साहेबांच्या जन्मदिनानिमित्त जास्तीत जास्त पुणेकरांनी आर एम डी बंगला नंबर ६४, लेन नंबर ३ ,कोरेगाव पार्क-पुणे येथे उपस्थित राहून रक्तदान करावे असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

# पूरनियंत्रण निधीला राज्य शासनाचा ‘बांध’..!

## दोनशे कोटींचा निधी मंजूर; पण निधीच ‘अडवला’

गेल्या काही वर्षांच्या कालावधीत पुणे शहर आणि जिल्ह्यासह शहराला पाणीपुरवठा करत असलेल्या धरण साखळीत पावसाने अक्षरश: थैमान घातले आहे, ही बाब समाधानकारक आहे. मात्र; या पावसामुळे शहरातील पूरस्थिती अतिशय गंभीर होत असून नागरीकांवर त्याचा विपरीत परिणाम होत आहे. त्याची गंभीर दखल घेऊन राज्य शासनाने या सुधारणेसाठी तब्बल दोनशे कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे, परंतु हा निधी राज्य शासनाने प्रशासनाकडे अद्याप सुपूर्तच केलेला नाही. त्यामुळे आगामी पावसाळयात पुणेकरांची अवस्था ‘येरे माझ्या मागल्या’ अशीच होण्याची भीती व्यक्त होत आहे.



राज्य शासनाने यासंदर्भात निधी मंजूर केला आहे; हा निधी मिळण्यासाठी महापालिका प्रशासनाच्या वतीने युध्दपातळीवर प्रयत्न करण्यात येत आहेत. हा निधी लवकरात लवकर मिळविण्यासाठी आगामी काळात प्रशासनाच्या वतीने सातत्याने पाठपुरावा करण्यात येणार आहे, त्यामध्ये निश्चितपणे यश येणार आहे.

**-डॉ. राजेंद्र भोसले,** आयुक्त, पुणे महापालिका

**कशासाठी वापरणार निधी...!**

- नाले, ओढ्यांना घालणार सिमाभिंती
- पूरग्रस्तांचे पुनर्वसन करणार
- आंबील ओढा परिसराला होणार सर्वाधिक फायदा
- नागरिकांना पूराच्या काळातही मिळणार दिलासा





**राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** पूरनियंत्रणासाठी शहरातील नाले, ओढे यांच्या बाजूला सीमाभिंती बांधण्यासाठी पुणे महापालिकेला २०० कोटी रुपयांचा विशेष निधी राज्य सरकारने मंजूर केला होता. मात्र, सहा महिन्यांहून अधिक काळ उलटल्यानंतरही हा निधी अद्यापही महापालिकेला मिळालेला नाही. त्यामुळे यंदाच्या पावसाळ्यापूर्वी नाले, ओढे यांच्याभोवती सीमाभिंत बांधण्याचे काम पूर्ण होणार का? असा प्रश्न विचारला जात आहे.

सहा वर्षांपूर्वी २०१९ मध्ये शहरात झालेल्या अतिवृष्टीमुळे आंबिल ओढ्याला पूर आला होता. यामध्ये अनेक सोसायट्यांच्या सीमाभिंती पडल्या होत्या. तसेच, अनेक सोसायट्यांमध्ये पाणी शिरले होते. पार्किंगमध्ये उभी वाहने वाहून गेली होती. या सोसायट्या खासगी असल्याने त्याच्या दुरुस्तीसाठी महापालिकेला खर्च करण्यास अडचण येत होती. परिणामी ही कामे रखडली होती.

ही कामे करण्यासाठी राज्य सरकारने मदत द्यावी, अशी मागणी महापालिकेत त्यावेळी सत्ताधारी असलेल्या भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी केली होती. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे वारंवार पाठपुरावादेखील केला जात होता. याची दखल घेऊन ‘महापालिका क्षेत्रात मूलभूत सोयीसुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद’ याअंतर्गत राज्य सरकारने २०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करून दिला.

या निधीमुळे शहरातील नाल्यांच्या कडेने संरक्षणभिंती बांधण्यात येणार आहेत. विशेषतः याचा फायदा आंबील ओढा परिसराला होणार होता. गेल्या वर्षी २०२४ मध्ये राज्य सरकारकडून या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली.

## अभिवाचनातून उलगडली स्वातंत्र्यवीर सावरकरांची 'माझी जन्मठेप'



**राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी मरणासन्न यातना सोसून देशाच्या स्वातंत्र्यासाठी दिलेले महत्त्वपूर्ण योगदान त्यांच्याच धारदार शब्दात तरुण कलाकारांनी आपल्या अमोघ वाणीने, आणि तितक्याच जिवंत अभिनयाने बालगंधर्व रंगमंदिराच्या रंगमंचावर अभिवाचनाच्या माध्यमातून सादर केले. या अभिवाचनाच्या द्वारे एका प्रकारे स्वातंत्र्यवीर सावरकरांचे बलिदान आणि त्यांचा जीवनपट 'माझी जन्मठेप' मधून पुन्हा एकदा रसिकांना अनुभवला.

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त ग्राहक पेठेतर्फे आणि स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक यांच्या सहयोगाने 'माझी जन्मठेप' अभिवाचनाचा रंगमंचीय नाट्य अविष्काराचे आयोजन करण्यात आले होते. ग्राहक पेठेचे कार्यकारी संचालक सूर्यकांत पाठक, विद्याधर नारगोळकर, संदीप खर्डेकर, श्रीकांत जोशी आदी यावेळी उपस्थित होते. या स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा सामाजिक समरसतेचा संदेश पुढे नेत, कार्यक्रमात हिंदू खाटीक समाजाचे नेते नरेंद्र सदाशिव घोणे यांचा उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला.

या अभिवाचन नाट्यविष्काराची संकल्पना अनंत वसंत पणशीकर यांची होती. तरी दिग्दर्शन डॉ. अनिल बांदिवडेकर, संकलन अलका गोडबोले, नेपथ्य संदेश बेंद्रे, शब्दाचार मार्गदर्शन सुभाष सावरकर, संगीत मयुरेश माडगावकर यांनी केले. जान्हवी दरेकर, मुग्धा गाडगीळ बोपर्डीकर, गौरव निमकर, समर्थ कुलकर्णी, शंतनू अंबाडेकर, नवसाजी कुडव हे कथन कलाकार होते.

# 'एमईए एक्झिबिशन २०२५' आजपासून

MARATHA ENTREPRENEURS ASSOCIATION'S EXPO

रविवार दिनांक २ मार्च रोजी सायंकाळी ६:३० वाजता भीमथडी च्या संस्थापक सुनंदा पवार यांना एमईए चे आयकॉन म्हणून गौरविण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे एमईए प्राईड हा पुरस्कार तेजराज पाटील यांना देण्यात येणार आहे. तसेच विविध पुरस्कारांचे वितरण केपीआयटीचे अध्यक्ष रवी पंडित यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. दोन्ही कार्यक्रम आणि एमईए एक्झिबिशन २०२५ सर्वांसाठी विनामूल्य खुले असून पुणेकरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन असोसिएशनतर्फे करण्यात आले आहे.




**राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** व्यावसायिकांमध्ये उद्योजकता व कल्पकता यांचा विकास व्हावा, याउद्देशाने मराठा आंत्रप्रिन्युअर्स असोसिएशन तर्फे 'एमईए एक्झिबिशन २०२५' चे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक १ व २ मार्च २०२५ रोजी महालक्ष्मी लॉन्स, डीपी रस्ता, कर्वेनगर येथे हे प्रदर्शन होत असून सर्वांसाठी विनामूल्य खुले आहे, अशी माहिती असोसिएशनचे अध्यक्ष अरुण निम्हण यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पत्रकार परिषदेला सचिव राजेश कुराडे, उपाध्यक्ष नितीन भोसले, कमिटी मेंबर सायली काळे, महेश घोरपडे, अभिजित जाधव आदी उपस्थित होते.

बांधकाम, वित्त, कंपनी सेक्रेटरी, डॉक्टर्स, हॉस्पिटॅलिटी, इंडस्ट्रियल, ऑटोमोबाईल, एफएमसीजी, ॲर्व्हटायझिंग, ऊर्जा, सौंदर्य, फॅशन, आयटी, हॉटेल इंडस्ट्री, हेल्थकेअर, फायनान्स यांसह गृहसजावटीपासून प्रवासापर्यंत आणि सौंदर्यापासून वित्तव्यवस्थेपर्यंत सर्व क्षेत्रातील सेवा व उत्पादने एकाच छताखाली पुणेकरांना पाहायला मिळणार आहेत. महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात उद्योजक यामध्ये सहभागी होत आहेत.

नवीन व्यवसायाच्या संधी, उत्पादने व सेवांचे स्टार्टअप्स, व्यवसायवृद्धीचे नवे पर्याय, दर्जेदार उत्पादनांची खरेदी व माहिती अशी अनेक उद्दिष्टे येथे साध्य होणार आहेत. दिनांक १ मार्च रोजी सकाळी ११ वाजता प्रदर्शनाचे उदघाटन कॅबिनेट मंत्री दत्तात्रय भरणे, विशेष सरकारी वकील ॲड. उज्वल निकम , पुणे महानगरपालिका आयुक्त राजेंद्र भोसले, सारथी चे व्यवस्थापकीय संचालक अजित निंबाळकर तसेच प्रसिद्ध उद्योगपती पुनीत बालन उपस्थित राहणार आहेत. व त्याच दिवशी सायंकाळी ६ वाजता फ्लूट अँड फिडल हा श्रुती भावे आणि अमर ओक यांचा सांगीतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हॉटेल संदीप चे संदीप कोटकर यांनी या सांगीतिक कार्यक्रमाला सहकार्य केले आहे. दोन्ही दिवस खाद्यपदार्थांचे विविध स्टॉल्स तसेच लहान मुलांसाठी प्ले एरिया देखील उपलब्ध असणार आहे.

## गड्या आपली ग्रामपंचायतच बरी...! पाण्याचा समस्येने नागरिक हैराण

**राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** हद्दीलगतच्या गावांचा महापालिकेत समावेश होउन तब्बल चार वर्षांचा कालावधी उलटला आहे, हे वास्तव असतानाच नागरी सुविधांपासून नागरिकांना वंचित ठेवले जात आहे. धक्कादायक बाब म्हणजे या गावांना शुध्द आणि पुरेसा पाणीसाठा करण्यास महापालिका प्रशासनाला सपशेल अपयश आले असून त्यांच्या घशाला ‘कोरड’ पडली आहे. त्यामुळे ‘गड्या आपली ग्रामपंचायतच बरी’ असे म्हणण्याची वेळ येथील नागरिकांवर आली आहे.

महापालिकेत समावेश होऊन चार वर्षांचा कालावधी उलटला असतानाही ज्या प्रमाणात मूलभूत सुविधा मिळायला हव्या होत्या, त्या प्रमाणात मिळत नसल्याची खंत नागरिकांकडून व्यक्त होत आहे. पूर्वी महापालिकालगतच भाग असल्याने येथे मोठी संकुले झाली. लोकसंख्या वाढल्याने मूलभूत सुविधांवरील भार वाढून त्या अपुऱ्या पडू लागल्या आणि पिण्याचा पाण्याचा गंभीर प्रश्न उभा ठाकला आहे. पूर्वी ग्रामपंचायत काळात कमी लोकसंख्या असल्याने जुन्या नळधारकांना बंद नलिकेने पाणी मिळत होते. ते अजूनही मिळतच आहे, परंतु गावठाणाव्यतिरिक्त इतर भागात जलवाहिनी नसल्याने टँकरने पाणी विकत घ्यावे लागत आहे. ग्रामपंचायतीने दूरदृष्टीने त्याचवेळेस जलवाहिनीचे जाळे पसरविणे आवश्यक होते; परंतु तसे झाले नाही.

उन्हाळ्यामध्ये टँकरची भाववाढ होत असल्याने कौटुंबिक खर्चात वाढ होऊन आर्थिक घडी विस्कळित होत आहे. महापालिकेने बंद नलिकेने पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीने पावले उचलावीत, अशी मागणी हडपसर येथील रहिवासी छाया दत्त, लीलाबाई जगदाळे, चंद्रकला कुंभार, रेखा नरवाडे, यशोदा कवठेकर, ज्योती धावारे आदींनी केली आहे.

हांडेवाडीचा भाग महापालिकेच्या जुन्या हद्दीलगत असल्याने येथे जलवाहिनीचे जाळे पसरविणे अवघड नाही. पालिकेच्या जुन्या हद्दीपर्यंत जलवाहिनी आहे. त्याच वाहिनीला जोड देऊन पाणी आणणे सहज शक्य आहे. इतर गावांच्या मानाने हे गाव लवकर टँकरमुक्त होईल, केवळ प्रशासनाने सकारात्मकता दाखवून काम करणे आवश्यक आहे.

**— अमृता पंडीत,** स्थानिक रहिवासी, हांडेवाडी

समान पाणीपुरवठा अंतर्गत समाविष्ट गावांसाठी नवीन तपशीलवार प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याचे काम सुरू आहे. ते पूर्ण झाल्यावर येथे जलवाहिनी संदर्भातील कामे करण्यात येतील. सध्या जुन्या वितरणवाहिनीने पाणीपुरवठा सुरू आहे.

**— विलास मोराळे,** उपअभियंता, पाणीपुरवठा विभाग, पुणे महापालिका

## आंतर महाविद्यालयीन “स्टडीटूर स्पर्धा ” संपन्न

**राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** सिंहगड कॉलेज ऑफ अर्किटेक्चर महाविद्यालयाच्या रौप्यमहोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या आंतर महाविद्यालयीन "स्टडीटूर" अर्थात अभ्यास दौरा वास्तुशास्त्र प्रकल्प स्पर्धेस विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सदर स्पर्धेत महाराष्ट्रातील १७ वास्तुशास्त्र महाविद्यालयातील संघांनी प्रथम व द्वितीय वर्षातील अभ्यासदौऱ्यातील निरीक्षणे, अनुभव, ऐतिहासिक वास्तूचे डॉक्युमेंटेशन व संकलित केलेली माहिती यांचे दृकश्राव्य सादरीकरण केले. नुकत्याच झालेल्या स्पर्धेला शहरनियोजन व वास्तुशास्त्र या विषयातील तज्ञ परीक्षक लाभले होते.

प्रथम वर्ष विजेता संघ ब्रिक्स स्कूल ऑफ आर्किटेक्चर व उपविजेता संघ एम.आय.टी स्कूल ऑफ आर्किटेक्चर आणि द्वितीय वर्ष विजेता संघ डॉ भानूबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, पुणे व उपविजेता संघ भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ आर्किटेक्चर या स्पर्धेचे विजेते ठरले. सहभागी विद्यार्थ्यांना इतर महाविद्यालयाच्या सादरीकरणामुळे एक अनुभव विश्व खुले झाले. सिंहगड कॉलेज ऑफ अर्किटेक्चरच्या प्राचार्या डॉ. बनानी बॅनर्जी यांनी नमूद केले की विद्यार्थ्यांच्या अभ्यासदौऱ्यातील



ज्ञान आणि कौशल्य दर्शविण्यासाठी अनुभव समृद्धता यावी यासाठी हे व्यासपीठ आहे. यापुढे दरवर्षी स्पर्धा घेण्याचा महाविद्यालयाचा मानस आहे. सिंहगड टेक्निकल एज्यूकेशन सोसायटीच्या प्रोत्साहनामुळे प्रियांका चव्हाण, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-याचे सहकार्य लाभले.

# अन्य भाषांपेक्षा मराठी भाषा जगात अव्वलच : डॉ.अभय फिरोदिया




**राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** ‘माझे बालपण मुंबईत गेले. माझे काही शिक्षण गुजराती, तर काही शिक्षण हिंदी, इंग्रजी आणि मराठी माध्यमात झाले. त्यामुळे मी या चारही भाषा अस्खलितपणे बोलू लागलो. या चारही भाषांमध्ये शिकल्यानंतर मराठी माध्यमातून जे शिकायला मिळाले, ते कोणत्याच माध्यमाच्या शाळांमध्ये मिळाले नाही, हे मला जाणवले,’ अशी भावना ‘फोर्स मोटार’चे अध्यक्ष उद्योगपती डॉ. अभय फिरोदिया यांनी गुरुवारी व्यक्त केली. जनसेवा फाउंडेशन पुणेतर्फे ‘भेटूया एका दिग्गजाला’ या उपक्रमांतर्गत फोर्स मोटारचे अध्यक्ष उद्योगपती डॉ. अभय फिरोदिया यांचा सन्मान आणि प्रकट मुलाखतीचे आयोजन करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते. या वेळी डॉ. अभय फिरोदिया यांच्याशी उद्योगपती प्रताप पवार यांनी संवाद साधला. या कार्यक्रमाला ‘देसाई ब्रदर्स उद्योग समूहा’चे प्रमुख नितीन देसाई, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, जनसेवा फाउंडेशन पुणेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. विनोद शहा, जनसेवा फाउंडेशनचे खजिनदार राजेश शहा, जनसेवा फाउंडेशनचे विश्वस्त नितीन कोठारी, विकफिल्ड उद्योग समूहाचे व्यवस्थापकीय संचालक मुकेश मल्होत्रा आणि अश्विनी मल्होत्रा आदी उपस्थित होते.

डॉ. फिरोदिया म्हणाले, ‘मी खूप भाग्यशाली समजतो, की मला आजोबा कुंदनमल फिरोदिया आणि वडील नवलमल फिरोदिया या दोघांचे संस्कार आणि मूल्यांची रुजवण करणारी शिकवण लाभली. वडील आजारी असताना मी त्यांना असे विचारले तुम्ही इंजिन विकसित केले आणि दूरदृष्टी ठेवून फोर्सचे साम्राज्य उभे केले. कालांतराने तुम्ही दानधर्म केला, तर या दोन्हीपैकी तुम्हाला सगळ्यात जास्त काय भावले. वडिलांनी दानधर्मात आत्मिक समाधान लाभले,’ असे उत्तर मला दिले.



‘आजोबा आणि वडील यांचा नेतृत्व, कर्तृत्व आणि दातृत्वाचा अंश माझ्यात उतरला आहे. १९६७ च्या काळात भारतात उद्योग-व्यवसायांना अनेक बंधने आणि जटील अटी-शर्थींना सामोरे जावे लागत होते. सरकारचे सर्व कडक नियम आणि अटी पाळून त्या काळात वडिलांनी इंजिन विकसित करून ते यशस्वी करून दाखवले.

**— डॉ. अभय फिरोदिया,** ज्येष्ठ उद्योगपती

# ‘लाख’ मोलाच्या श्रेयवादावरून चढाओढ...!



## पोलीस आयुक्त काढणार तोडगा; गावाला भेट देऊन स्थानिकांचा करणार सत्कार

**‘बलात्काराच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर शहरातील अंधाऱ्या आणि निर्जन जागांची पाहणी करण्यात आली. या भागात पथदिवे बसविण्याच्या सूचना महापालिका प्रशासनाला केल्या आहेत. पथदिवे बसविण्यासाठी पाठपुरावा करण्यात येणार आहे. स्वारगेटसह शहरातील भागांची पाहणी करण्यात आली. ज्या भागात दिवे नाहीत. निर्जन रस्ते आहेत. अशा भागात पोलिसांना गस्त घालण्याच्या सूचना दिल्या आहेत,’ असे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले.**



**पुणे :** वासनांध आणि बलात्कारी दत्तात्रय गाडे याला जंग जंग पछाडूनही तो पोलीसांच्या हाती लागत नव्हता; त्यामुळे त्याची माहिती दिल्यास संबधिताला एक लाखांचे बक्षिस देण्याचा निर्णय पोलीसांनी जाहीर केला होता. मात्र; त्याला जेरबंद केल्यानंतर आता ‘लाख’ मोलाचा वाद सुरु झाला असून श्रेयवादाची चढाओढ सुरु आहे.

मात्र; त्यावर खुद्द पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनीच उभयमान्य तोडगा काढला असून शेवटची माहिती ज्याने दिली त्याला हे बक्षिस देण्यात येणार आहे. विशेष म्हणजे स्वत: गुनाट गावात जाऊन स्थानिक नागरिकांचा सत्कार करणार आहे, अशी मोठी घोषणाही त्यांनी आज पत्रकार परिषदेत केली.

पुण्यातील स्वारगेट एसटी बस स्थानकातील एका नादुरुस्त शिवशाही बसमध्ये एका २६ वर्षीय तरुणीवर मंगळवारी (२५ फेब्रुवारी) पहाटे बलात्कार झाला. हा प्रकार बुधवारी सकाळी उजेडात आला. सर्वपक्षीय नेते आणि संघटनांनी या प्रकरणी आंदोलन केल्यानंतर तपासाला वेग आला अन् आज पहाटे त्याला त्याच्या गावातून अटक करण्यात आली आहे. ड्रोनची नजर, पोलीस पथकांचं शौर्य अन् श्वान पथकांच्या कामगिरीमुळे उसाच्या शेतात लपून बसलेला आरोपी दत्तात्रय गाडे याला पोलिसांनी अटक केली. मात्र, आता यावरून श्रेयवाद सुरू असल्याची चर्चा आहे.

स्वारगेट पोलीस आणि गुन्हे शाखा यांच्यात आरोपीला पकडण्यावरून श्रेयवाद सुरू असल्याची चर्चा आहे, त्यावर ते म्हणाले, “यात कोणाचाही श्रेयवाद सुरू नाही. मी सांगितलं की हे सांघिक प्रयत्न आहे. पुणे शहर पोलीस दलाचे अधिकारी आणि कर्मचारी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरित्या सहभागी होते. गुन्हे शाखा विभाग, स्वारगेट पोलीस पथक, झोन २ चे पथक गुणाट गावात तळ ठोकून बसले होते. काही अधिकारी तिथून तीन दिवसांत हलले नाहीत. दिवसरात्र काम करत होते. रात्री झोपलेही नाहीत. अशाप्रकराची कामगिरी पोलीस दलाने केली आहे.



राष्ट्रसंचार EXCLUSIVE

“एसटी स्थानकातील २३ सीसीटीव्ही कॅमेरा आणि स्थानकाबाहेरील ४८ सीसीटीव्ही फुटेज तपासल्यानंतर दीड ते दोन तासांत आम्ही आरोपीची ओळख पटवली होती. गेल्या दोन दिवसांपासून आम्ही आरोपीच्या गावात जावून शोधमोहिम घेत होतो. पण आरोपी तेव्हा सापडला नाही. अखेर तो आज सापडला आहे. याकरता मी गावातील नागरिकांना धन्यवाद देतो. त्या गावात भेट देऊन नागरिकांचा सत्कार करणार आहोत. तिथे ज्या-ज्या लोकांनी मदत केली, त्यांचं विशेष अभिनंदन करणार आहोत”,

“शेवटच्या माहितीवरून आम्ही आरोपीला पकडलं. शेवटची माहिती आली की तो कुठेतरी पाणी पिण्यासाठी आला होता. तो कोणालातरी दिसला आणि मग तो तिथून पळाला.



> प्राथमिक वैद्यकीय चाचणीनुसार आरोपीच्या गळ्यावर दोरीचे वळ आहेत, या वळानुसार त्याने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता, असं आरोपीने सांगितलं आहे. परंतु, दोरी तुटल्यामुळे आणि इतर लोक आल्यामुळे त्याचा जीव वाचला.” “त्याने खरंच आत्महत्येचा प्रयत्न केला होता का याची चौकशी करण्याकरता पथक तिथे पाठवण्यात येणार आहे. परंतु प्राथमिक वैद्यकीय चाचणीनुसार त्याच्या गळ्यावर दोरीचे वळ होते.
>
> **-अमितेश कुमार,** पोलीस आयुक्त, पुणे

ड्रोनच्या सहाय्याने जी दिशा दिसली, त्यातून त्याला अटक करण्यात आली. ज्याने शेवटची माहिती दिली, त्याला एक लाखांचं बक्षिस देण्यात येणार आहे. त्याव्यतिरिक्त गावासाठी काय करता येणार, याचाही आम्ही विचार करणार आहोत.



### अवघ्या ४० दिवसात बलात्काराच्या ५६ घटना

# सांस्कृतिक राजधानीला विकृत घटनांचा ‘काळीमा’

**पुणे :** देशातच नव्हे तर जगभरात सांस्कृतिक राजधानी असलेल्या पुण्याला विकृत घटनांनी ‘काळीमा’ फासल्याचे दाहक वास्तव उजेडात आले आहे. धक्कादायक बाब म्हणजे नव्या वर्षांमध्ये अवघ्या ४० दिवसांच्या कालावधीत पोलीस दप्तरी बलात्काराच्या ४० तर विनयभंगाच्या तब्बल १२५ घटनांची लाजीरवाणी नोंद झाली आहे.

पुण्यात महिलांवर होणाऱ्या अत्याचाराच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. नुकताच स्वारगेटमध्ये शिवशाही बसमध्ये तरुणीवर बलात्कार झाल्याची घटना घडली आहे. याशिवाय धावत्या कारमध्ये आयटी कंपनीतील महिलेसमोर कॅब चालकाने अश्लील कृत्य केल्याचा संतापजनक प्रकारही समोर आहे.

महत्त्वाचे म्हणजे काही दिवसांपूर्वी बोपदेव घाटातही एका तरुणीवर बलात्काराची घटना घडली होती. या घटनानंतर आता सर्वत्र संताप व्यक्त होतो आहे. महिला सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत. अशातच पुण्यात महिलांवर होणाऱ्या अत्याचाराची धक्कादायक आकडेवारी आता समोर आली आहे.

ही आकडेवारी समोर आल्यानंतर विद्येचं माहेर घर असलेलं पुणे आता महिलांवरील अत्याचाराचं माहेर घर झालंय का? असा प्रश्न विचारला जातो आहे. पोलीस ही विकृती ठेचण्यासाठी पोलिसी खाक्या कधी दाखवणार आणि या विकृतांच्या मुसक्या कधी आवळणार? याकडे लक्ष लागलंय.

**अशी आहे लाजीरवाणी आकडेवारी...!**

| वर्ष | बलात्कार | विनयभंग |
|---|---|---|
| २०२३ | ४१० | ७३८ |
| २०२४ | ५०५ | ८६६ |
| २०२५ (जानेवारी ते फेब्रुवारी) | ५६ | १२५ |




# महामंडळ खासगी ठेकेदारांच्या दावणीला



### महिन्याकाठी लाटली जातेय लाखोंची ‘मलई’; अधिकारी ठेकेदारांमध्ये मिलीभगत

**पुणे :** सुरक्षेच्या कारणास्तव केवळ पुण्यातच नव्हे तर राज्यभरात सुरक्षा रक्षकांचे ठेकेदार आणि महामंडळाचे अधिकारी यांची केवळ पुण्यातच नव्हे तर राज्यभरात ठेकेदार आणि महामंडळाचे अधिकारी यांच्यात चक्क ‘मिलिभगत’ झाल्याची माहिती उघडकीस आली आहे; विशेष म्हणजे हे बडे अधिकारी खासगी ठेकेदारांच्या दावणीला बांधले असल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. त्यामाध्यमातूनच हे अधिकारी आणि ठेकेदार महिन्याकाठी लाखो रुपयांचा ‘मलिदा’ लाटत आहेत; त्यातूनच लाखो प्रवाशांची सुरक्षा ‘रामभरोसे’ अशीच झाली आहे.

दोन दिवसांपूर्वी एसटी महामंडळाच्या स्वारगेट बसस्थानकात दत्ता गाडे या नराधमाने बसस्थानकावर उभ्या असलेल्या ‘शिवशाही’ बसमध्ये बलात्कार केल्यानंतर सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे; त्यातूनच एसटी स्थानकावरील सुरक्षा व्यवस्था अतिशय ‘पुळचट’ असल्याची बाब पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.



राज्यातील सर्व स्थानकांवर सुरक्षा पुरविण्यासाठी महामंडळाच्या वतीने निविदा काढण्यात येतात, परंतु या निविदा केवळ नावापुरत्याच असल्याचे आतापर्यंतच्या घटनांवरुन स्पष्ट झाले आहे. त्यातील बहुतांशी ठेके हे एकाच व्यक्तीच्या नावावर असलेल्या विविध एजन्सीला देण्यात येत असल्याचे स्पष्ट झाले आहे, त्यासाठी ठेकेदार आणि महामंडळातील बडे अधिकारी यांची एकप्रकारे साखळीच तयार झाली आहे. त्यामुळे याठिकाणी अन्य ठेकेदाराला साधा शिरकावही करु दिला जात नाही, त्यातूनच ही यंत्रणा आणि महामंडळाचे अधिकारी ठेकेदारांच्या दावणीला बांधले आहेत अशी माहिती सूत्रांनी दैनिक ‘राष्ट्रसंचार’ शी बोलताना दिली.



> महामंडळाचे अधिकारीच या दुरावस्थेला खतपाणी घालत आहेत, त्यातूनच राज्यभरातील एसटी स्थानकांवरील सुरक्षा व्यवस्थेचे अक्षरश: तीन तेरा वाजले आहेत. त्यामुळे सर्वसामान्य प्रवाशांना जीव मुठीत धरुन स्थानकांवर थांबावे लागत आहे, त्याची प्रशासन आणि राज्य शासनाने गंभीर दखल घेऊन संबधित अधिकारी थेट निलंबित करण्याची गरज आहे.
>
> **-योगेश घोरपडे देशमुख,** जिल्हाप्रमुख शिवसेना सहकार सेना

# एकाच दिवशी 5 सराईत गुंडांना केले तडीपार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** परिमंडळ ५ चे पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांनी एकाच दिवशी ५ सराईत गुंडांना पुणे शहर, पिंपरी चिंचवड आणि पुणे जिल्ह्यातून २ वर्षासाठी तडीपार केले आहे. आणखी १०० हून अधिक गुंड रडारवर असल्याचे सांगण्यात आले. किशोर अमर सोळंकी (वय २१, रा. बिराजदारनगर, वैदुवाडी, हडपसर) याच्यावर जबरी चोरी, गंभीर दुखापत, बेकादेशीर शस्त्र बाळगणे, विनयभंग यासारखे ४ गंभीर गुन्हे दाखल आहेत.

अक्षय अनिल पवार (वय २७, रा. वेताळबाबा वसाहत, हडपसर) याच्यावर दुखापत, जबरी चोरी यासारखे ३ गुन्हे दाखल आहेत. कादीर ऊर्फ काजु आरीफ अन्सारी (वय २१, रा. भाग्योदयनगर, कोंढवा खुर्द) याच्याविरुद्ध खुनाचा प्रयत्न, दुखापत, जबरी चोरी, चोरी, बेकादेशीर शस्त्र बाळगणे यासारखे ७ गुन्हे दाखल आहेत.

साहील रफीक कलादगी (वय २१, रा. राजीव गांधीनगर, अप्पर बिबवेवाडी) याच्या विरुद्ध खासगी मालमत्तेचे नुकसान करणे, मारहाण, धमकावणे, दहशत निर्माण करणे, बेकायदेशीर शस्त्र बाळगणे, विनयभंग यासारखे ३ गुन्हे दाखल आहेत.

करण हरीदास जाधव (वय २४, रा. सर्वोदय कॉलनी, मुंढवा) याच्याविरुद्ध जबरी चोरी, दरोडा तयारी, चोरी, बेकायदेशीर शस्त्र बाळगणे, विनयभंग यासारखे एकूण ७ गुन्हे दाखल आहेत.

हे पाचही तडीपार गुंड हे २१ ते २५ वयोगटातील सराईत गुन्हेगार आहेत. २०२५ मध्ये यापूर्वी ६ गुन्हेगारांना तडीपार करण्यात आले आहे. त्याचबरोबर परिमंडळ ५ मधील १०० हून अधिक गुन्हेगारांच्या हालचालींवर पोलिसांचे बारकाईने लक्ष आहे. सराईत गुन्हेगारांना गुन्हे करण्यापासून परावृत्त करण्यासाठी व गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी आमचे रडारवरील आणखी १०० हून अधिक गुन्हेगारांवर मोक्का, एमपीडीए, तडीपारीची कारवाई करणार असल्याचे पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांनी सांगितले.

हे तडीपार करण्यात आलेले सराईत गुन्हेगार पुढील २ वर्षांच्या काळात पुणे शहर, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, पुणे जिल्ह्यामध्ये दिसून आल्यास तात्काळ पोलीस नियंत्रण कक्षाला कळवावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# कालवा सल्लागार समितीची बैठक आज

## पाण्याबाबत होणाऱ्या निर्णयाकडे पुणेकरांचे लक्ष

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सध्या खडकवासला प्रकल्पात १७ टीएमसी पाणीसाठा शिल्लक आहे. महापालिका निर्धारित कोट्यापेक्षा जादा पाणी वापर करत असल्याच्या कारणावरून जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी महापालिकेला दंड ठोठावला होता, तर लोकसंख्या वाढत असल्याने महापालिकेला पाणी कोटा वाढवून द्यावा, अशी मागणी महापालिकेने जलसंपदा विभागाकडे केली होती. त्यामुळे पाण्याबाबत होणाऱ्या निर्णयाकडे पुणेकरांचे लक्ष लागून आहे. पालकमंत्रीपदाची जबाबदारी सांभाळल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार शनिवारी (दि. १ मार्च) कालवा सल्लागार समितीची बैठक घेणार आहेत. त्यात पुण्याच्या पाणीप्रश्नासंदर्भात महत्त्वाचा निर्णय होणार आहे.

खडकवासला प्रकल्पातील पाण्याचे दरवर्षी नियोजन १५ ऑक्टोबरच्या सुमारास केले जाते. कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत शहराचा जिल्ह्यातील शेती आणि पिण्याच्या पाण्याच्या संदर्भात निर्णय घेतला जातो. मात्र, गेल्या वर्षी विधानसभा निवडणुकांची रणधुमाळी असल्याने कालवा सल्लागार समितीच अस्तित्वात नव्हती.

तत्पूर्वी जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी पुणे महापालिका निर्धारित कोट्यापेक्षा ज्यादा पाणी वापरत असून पाणीदेखील प्रदूषित करत असल्याच्या कारणावरून महापालिकेला नोटीस बजावली होती. या नोटिशीतून महापालिकेने ७१४ कोटी रुपये जलसंपदा विभागाला द्यावेत, अशी मागणी करण्यात आली होती.

राज्य सरकारने ठरवून दिलेल्या कोट्यानुसार महापालिकेला साडेअकरा टीएमसी पाणी जलसंपदा विभागाकडून दिले जाते. मात्र, प्रत्यक्षात महापालिका मंजूर कोट्यापेक्षा सुमारे साडेपाच ते आठ टीएमसी पाणी जादा उचलत असल्याचे जलसंपदा विभागाचे म्हणणे आहे, तर लोकसंख्या वाढत असल्याने जलसंपदा विभागाने महापालिकेला पाणी कोटा वाढवून द्यावा.

सध्या खडकवासला प्रकल्पात एकूण १७.१६ टीएमसी अर्थात ५८.८८ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. गेल्या वर्षी हाच साठा १५.९४ टीएमसी अर्थात ५४.६७ टक्के इतका होता. ग्रामीण भागातील शेतीसाठी पहिले उन्हाळी आवर्तन दहा दिवसांपूर्वीच सुरू करण्यात आले असून एप्रिलपर्यंत साडेपाच टीएमसी पाणी ग्रामीण भागाला दिले जाणार आहे.



> जिल्ह्याच्या कालवा सल्लागार समितीची बैठक शनिवारी होत आहे. यात पुणे, पिंपरी आणि ग्रामीण भागाच्या पाण्याबाबत निर्णय होईल. या बैठकीत जो निर्णय होइल तो निर्णय जलसंपदा विभागाला मान्य असणार आहे.
>
> **— श्वेता कुऱ्हाडे,** कार्यकारी अभियंता, खडकवासला प्रकल्प

# ‘आरटीई’ प्रवेशासाठी १० मार्चपर्यंत मुदतवाढ

**पुणे :** शिक्षण हक्क कायद्यानुसार (आरटीई) खासगी शाळांमधील २५ टक्के राखीव जागांवर प्रवेशासाठी निवड झालेल्यांपैकी आतापर्यंत केवळ ४६.५७ टक्के बालकांचे प्रवेश निश्चित झाले आहेत. या जागांवर बालकांच्या प्रवेशासाठी आणखी संधी मिळावी, म्हणून प्राथमिक शिक्षण विभागाने निवड यादीतील बालकांच्या प्रवेशासाठी आता मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे पालकांना निवड यादीतील बालकांचे प्रवेश १० मार्चपर्यंत निश्चित करता येणार आहेत.

प्राथमिक शिक्षण संचालनालयातर्फे ‘बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९’ नुसार (आरटीई) शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी केंद्रीय पद्धतीने ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. त्यानुसार राज्यातील आठ हजार ८६३ शाळांमधील एकूण एक लाख नऊ हजार ८७ रिक्त जागांसाठी तीन लाख पाच हजार १५२ अर्ज आले होते.

# सहकार क्षेत्राला केंद्र शासनाचे मोठे पाठबळ : दीपक तावरे



बँकिंग

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सहकार विषयासंदर्भात यापूर्वी केंद्र शासनाशी संबंध येत नव्हता. सर्व अडी-अडचणींसंदर्भात आम्ही राज्य शासनाशी संपर्कात असायचो. मात्र, सन २०१८ पासून केंद्राशी संबंधात आहोत. दररोज चांगले निर्णय होत आहेत. सहकार क्षेत्राला केंद्र शासनाचे मोठे पाठबळ आहे. नवनवीन ठिकाणी नागरी सहकारी बँकांची स्थापना व्हावी, याकरिता केंद्र शासन प्रयत्नशील असून सहकार्य देखील करीत असल्याचे मत राज्याचे सहकार आयुक्त व निबंधक दीपक तावरे यांनी व्यक्त केले.

पुणे नागरी सहकारी बँक असोसिएशन लि., पुणे (महाराष्ट्र) च्या वतीने आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त 'सहकारी बँकांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता- एक गेम चेंजर' या विषयावर राज्यस्तरीय परिषदेचे आयोजन हॉटेल शेरेटन ग्रँड येथे करण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्र राज्य हौसिंग सोसायटी फेडरेशनचे लि. चे अध्यक्ष सुहास पटवर्धन, पुणे नागरी सहकारी बँक्स असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. सुभाष मोहिते, संचालक निलेश ढमढेरे, रमेश वाणी, बाळकृष्ण उंदरे, मंगला भोजने, डॉ. प्रिया महिंद्रे, मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत शेळके आदी उपस्थित होते.

परिषदेचे उद्घाटन सहकार व तंत्रज्ञानरुपी रोपाला पाणी घालून करण्यात आले. कार्यक्रमात सहकार क्षेत्रात अनेक वर्षांपासून कार्यरत असलेले नवनियुक्त आमदार हेमंत रासने, पुणे बार असोसिएशनचे नवनियुक्त अध्यक्ष ॲड.हेमंत झंझाड यांचा विशेष सन्मान करण्यात आला. महाराष्ट्रातील विविध भागातील ३५० बँकांच्या प्रतिनिधींचा सहभाग या परिषदेमध्ये होता. दीपक तावरे म्हणाले, सहकारी बँकांची क्षमता केवळ आकडयांमध्ये न मोजता त्यांचे सोशल ऑडिट होणे गरजेचे आहे.



> बँकिंग क्षेत्रातील अडचणी आपल्याला माहित आहेत. केंद्र सरकारला सहकार व ही चळवळ वाढवायची आहे. त्यामुळे सहकार खात्याची निर्मिती करण्यात आली. सर्वसामान्यांना बँकिंग खुले करणारे हे क्षेत्र असल्याने केंद्राचे सहकाराकडे विशेष लक्ष आहे. सहकाराशिवाय उद्धार नाही, असे आपण मानतो. त्यामुळे सहकार वाढविणे आणि टिकविणे हे आपले काम आहे.
>
> **— हेमंत रासने,** आमदार कसबा

# पालिकेत कोट्यवधींचा डक्ट घोटाळा

## शरद पवार गटाचे सुनिल माने यांचा आरोप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुणे महानगरपालिका, महाप्रीत आणि दिनेश इंजिनिअर्स लि. यांनी संगनमताने त्रि पक्षीय करार करून पुणेकर नागरिकांची २६ हजार कोटींची आर्थिक फसवणूक केलेली आहे. याप्रकरणी, पुणे महानगरपालिकेने येत्या ८ दिवसांत खुलासा न केल्यास आम्ही पोलीस आणि मुंबई उच्च न्यायालयात जावू, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सरचिटणीस व प्रवक्ता सुनील माने यांनी दिला आहे.

पुणे महानगरपालिकेत आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी लक्ष घालावे असे आवाहनही त्यांनी केले आहे.

त्रि-पक्षीय करारामध्ये दिनेश इंजिनिअर्स ली. कंपनीस ७०० कि.मी. अंतराचे खोदाई शुल्काचे ८५० कोटी माफ करण्यात आले आहेत. बाजूच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका याच पद्धतीने ६०० किमी केबलसाठी वार्षिक ३२ कोटी आकारत असताना, पुणे महानगपालिका दिनेश इंजिनिअर्स लि. कडून मात्र वार्षिक ६ कोटी आकारत आहे. त्यातून वार्षिक २४ कोटी कमी आकारून २० वर्षासाठी ४८० कोटींचे नुकसान करत आहे.

महाप्रीत ने ज्या दिनेश इंजिनिअर्स लि. कंपनीस त्रि- पक्षीय करारामध्ये सामील करून घेतले आहे, त्या दिनेश इंजिनिअर्स लि. कंपनीवर विविध राज्यांमध्ये बेकायदेशीर केबल टाकणं, निविदा भरताना खोटी प्रमाणपत्रे देण इ. बाबत तक्रारी झाल्या असून त्याबाबत त्या राज्यांमध्ये चौकशीचे आदेश देण्यात आलेले आहेत. तर अशा बेकादेशीर कामे करणाऱ्या दिनेश इंजिनिअर्स लि. कंपनीसोबत पुणे महानगरपालिकेने त्रि- पक्षीय करार कसा केला याबाबतची एसआयटी नेमून चौकशी करण्यात आली पाहिजे अशी आमची प्रमुख मागणी आहे.

महाप्रीत आणि दिनेश इंजिनिअर्स लि. पुणे महानगरपालिकेस हाताशी धरून पुणेकर नागरिकांचे १३३० कोटींचे प्रत्यक्षपणे नुकसान करत आहे. त्याचबरोबर टेलीकॉम कंपन्यांचा १ हजार ८०० कोटी रुपयांचा दंड आणि फायबर केबल यांचे काम करण्यासाठी आकारले जाणारे २३ हजार कोटी रुपयांचे शुल्क मनपाने आकारणे अपेक्षित असताना याप्रकरणी माहिती लपवून पुणेकरांचे कोट्यावधी रुपयांचे नुकसान महानगरपालिकेने केले आहे.

परंतु त्रि- पक्षीय करारामध्ये दिनेश इंजिनीअर्स लि. कंपनीस खोदाई शुल्क माफ करून त्यांनी अंडर ग्राउंड केलेली ओएफसी केबल लिज -सबलिज करून ती केबल भाड्याने देण्याचा अमर्याद अधिकार देण्यात आल्यामुळे मुख्य सभेच्या ठरावाची अंमलबजावणी न करता, दिनेश इंजिनिअर्स लि. कंपनी सोबत तडजोड करून/ सबलीज करून बेकायदेशीर ओएफसी केबल टाकणाऱ्या कंपन्यांना दंड भरण्यास व खोदाई शुल्कातून पूर्ण अभय मिळणार असून एकूण २६ हजार कोटींचे नुकसान होणार आहे.

या संदर्भात महापालिकेने संबंधित कंपन्यांना खुलासा करण्याबाबत पत्रव्यवहार केला होता. त्यानुसार सर्व कंपन्यांनी किती किलोमीटरच्या बेकायदा केबल टाकल्या आहेत, त्याची माहिती संबंधित कंपन्यांना महापालिकेने दिली होती. त्यानुसार संपूर्ण पुणे शहरात विविध दूरसंचार कंपन्यांच्या सुमारे १८ हजार ८८५ किलोमीटर ओव्हरहेड केबल आढळून आल्या आहेत. याबाबतचे शुल्क जमा करण्याची नोटीस महापालिकेतर्फे कंपन्यांना देण्यात आली होती, तथापि कंपन्यांकडून महापालिकेला कुठलाही प्रतिसाद मिळाला नाही. महापालिकेच्या मुख्य सभेच्या आदेशानुसार कंपन्यांना दंड व शुल्क वसूल करणे अपेक्षित होते.

तथापि तत्कालीन आयुक्तांकडून कारवाईच्या मान्यतेसाठी हे प्रकरण स्थगित ठेवण्यात आले. या बाबतचे पत्र पथविभागाने आयुक्तांच्या मान्यतेस ३ नोव्हेंबर २०२३ रोजी पाठवले आहे. या पत्रानुसार मुख्य सभेच्या मान्यतेद्वारे नियमितीकरण व शुल्क भरणा होत नाही तोवर कंपन्यांना नवीन कामे भरण्यास स्थगिती देण्यात आली होती.

> पुणे महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या सल्लागाराच्या अभ्यासातून उघड झालेल्या माहितीनुसार टेलिकॉम कंपन्यांनी बेकायदा 'ओव्हरहेड आणि अंडरग्राउंड' केबल टाकून शहर विद्रुप करण्याबरोबरच महापालिकेचा कोट्यावधी रुपयांचा महसूल बुडवत आहेत. महापालिकेचा महसूल बुडवल्याबाबत, पाहणीनुसार बेकायदेशीर भूमिगत व ओव्हरहेड केबल टाकणाऱ्या केबल कंपन्यांना १ हजार ८०० कोटी रुपये दंड लावण्याचा निर्णय महापालिकेने घेतला होता. या केबल जमिनीखाली टाकल्यास २३ हजार कोटी रुपये शुल्क मिळाले असते.
>
> — **सुनिल माने,** सरचिटणिस व प्रवक्ता, राष्ट्रवादी काँग्रेस, शरद पवार गट.



## कात्रज-कोंढवा रस्त्यावरील ई-लर्निंग लवकरच सुरू

**पुणे :** कात्रज-कोंढवा रस्त्यावरील सर्वे नंबर १९ पार्ट येथील ॲमेनिटी स्पेसवर ई-लर्निंग शाळेचे काम मागील आठ वर्षांपासून सुरु आहे. मात्र, आता नागरिकांची प्रतिक्षा संपली असून ही शाळा जूनमध्ये सुरु होणार असल्याचे महापालिकेकडून स्पष्ट करण्यात आहे. तशा पद्धतीने तयारीचे आदेश महापालिका आयुक्तांकडून विद्युत विभाग आणि शिक्षण विभागाला देण्यात आलेले आहेत. संबंधित शाळेच्या इमारतीला २०१५ मध्ये तळ मजल्याव्यतिरिक्त ५ मजले अशी परवानगी देण्यात आली होती. त्यानंतर २०१६मध्ये सदर कामाचे भूमीपूजन करण्यात आले आणि प्रत्यक्ष कामास सुरवात झाली. सद्यस्थितीत याठिकाणी लोअर ग्राउंड, लोअर पार्किंग, अप्पर ग्राउंड व पहिला मजला पूर्ण झाला आहे. दुस-या मजल्याचे काम सुरु आहे. २०१६ ते २०२४ पर्यंत टप्प्याटप्प्यांत निधी उपलब्ध झाल्याने हे काम रेंगाळले होते. आता एकुण १८ वर्गखोल्या व स्वच्छतागृहाचे कामे पुर्ण करण्यात येणार आहे.

## आचार्य अत्रे साहित्यरत्न पुरस्कार' वितरण सोहळा उद्या

**पुणे :** विदिशा विचार मंचतर्फे प्रसिद्ध साहित्यिक, वक्ते, माजी संपादक आणि महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणेचे कार्यवाह वि. दा. पिंगळे यांना साहित्य क्षेत्रातील त्यांच्या चौफेर योगदानाबद्दल 'आचार्य अत्रे साहित्यरत्न पुरस्कार' दिनांक २ मार्च रोजी प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती विदिशा विचार मंचच्या संस्थापक-संचालक ममता क्षेमकल्याणी यांनी प्रसिद्धी पत्रकाव्दारे कळविली आहे. ज्येष्ठ लेखिका मंगला गोडबोले यांच्या हस्ते पुरस्कार वितरण होणार असून या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. पी. डी. पाटील भूषविणार आहेत. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष सुनील चांदेरे आणि विधानभवन, मुंबई येथील माहिती व संशोधन अधिकारी आणि माजी ग्रंथपाल बा. बा. वाघमारे उपस्थित राहणार आहेत.हा कार्यक्रम रविवार, दिनांक २ मार्च २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता माधवराव पटवर्धन सभागृह, महाराष्ट्र साहित्य परिषद, टिळक रस्ता, पुणे येथे होणार असून यावेळी उपस्थित राहण्याचे आवाहन विदिशा विचार मंचतर्फे करण्यात आले आहे.



## वारजे कर्वेनगर कार्यालया अंतर्गत अतिक्रमण कारवाई

**पुणे :** वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत उपायुक्त, अतिक्रमण/ अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग संदिप खलाटे, महापालिका सहाय्यक आयुक्त दिपक राऊत यांचे अतिक्रमण निरीक्षक भिमाजी शिंदे, सहाय्यक अतिक्रमण निरीक्षक सागर विभुते, प्रथमेश पाटील, आयुब शेख, अविनाश बागुल, अतुल ब्राम्हणकर, सुरज सरवदे, करण पौळे, संदीपान भागडे, पंकज आवाड, सोनाली बोरगावकर तसेच पुते महानगरपालिकेकडील बिगारी सेवक, पोलीस स्टाफ, एम एस एफ स्टाफ व स्थानिक पोलीस यांच्या पथकाने १ जेसीबी, १ गॅस कटर, व ३ ट्रक यांच्या सहाय्याने महर्षी कर्वे भाजी मंडई कॅनॉल रस्ता येथील अनधिकृत व्यवसाय करणाऱ्या व्यवसायीकांवर तसेच अटी व शर्तींचे भंग करणारे व थकबाकीदार प्रमाणपत्र धारकांवर कारवाई करण्यात आली. कारवाई मध्ये नागरिकांच्या विरोधाला न जुमानता हातगाडी, लोखंडी काउंटर १ स्टॉल ३ ट्रक साहित्य जमा करण्यात आले व व ४८ कच्चे पक्के शेड पाडण्यात आले. भविष्यात कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण करू नये अन्यथा कारवाई करण्यात येईल असे आवाहन पुणे महानगरपालिकेकडून करण्यात आलेले आहे.

## 'श्रीविष्णूंचे अंशावतार' पुस्तक प्रकाशन सोहळा २ मार्चला

**पुणे :** डॉ. आनंद बर्वे लिखित 'श्रीविष्णूंचे अंशावतार' पुस्तक प्रकाशन सोहळा रविवार दिनांक २ मार्च रोजी सकाळी ११ वाजता एरंडवण्यातील सेवा भवन येथे होणार आहे. राष्ट्रीय कीर्तनकार चारुदत्त आफळे यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन होणार आहे.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ए.एस. पी. मेडिकल फाउंडेशनच्या संचालिका अनुराधा पाटणकर तर प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्त मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष राजू बलकवडे उपस्थित राहणार आहेत.

श्री विष्णूंचे पृथु, यज्ञ, धन्वंतरी, मोहिनी अंशावतार विविध कथांमधून वर्णन केले गेले आहेत. या अवतारांची फारशी माहिती अनेकांना नसते, ही माहिती व्हावी, यासाठी श्री विष्णूंचे अंशावतार पुस्तकाची निर्मिती करण्यात आली आहे. यामध्ये पृथु, यज्ञ, कपिल, ऋषभदेव, हयग्रीव, धन्वंतरी, मोहिनी, हंस, वेदव्यास या ९ अंशावतारांचे कथा संकीर्तन केले आहे. हरीकथा संकीर्तन व्हावे, या उद्देशाने लेखन केले आहे. यात विविध ग्रंथांमधील संदर्भ वापरले आहेत. काही ठिकाणी मूळ संदर्भ संस्कृत मध्ये दिले आहेत.

# 'पोलीसी खाक्या' दाखविणे पडले महागात

## पोलीस शिपायाची शेजाऱ्याला बेदम मारहाण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्याच्या पोलीस दलात कार्यरत एका पोलीस कर्मचाऱ्याने त्यांच्या बहीण, भाऊ अन्य काही जणांना सोबत घेऊन एका जनाला बेदम मारहाण करण्यात आल्याची घटना घडली होती. या प्रकरणी दाखल तक्रारीची दखल घेण्यात आली असून पुणे पोलिस मुख्यालयात कार्यरत असलेल्या या शिपायावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. तर अन्य दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुणे पोलीस मुख्यालयात कार्यरत विजय जाधव असे या निलंबित करण्यात आलेल्या कर्मचाऱ्याचे नाव आहे. विजय जाधव या पोलीस कर्मचाऱ्याने मारहाण केल्याप्रकरणी निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. विजय जाधव हे आर कंपनी पोलीस मुख्यालय, पुणे शहर या ठिकाणी कार्यरत आहेत. त्यांच्यासह त्यांचा भाऊ विकी जाधव, बहिण आणि बहिणीचे पती आणि इतर २ सहकारी यांचेसोबत संगनमत करुन बेकायदेशीर जमाव जमवून हातात लोखंडी रॉड व लाकडी दांडके घेवून मारहाण केल्याची तक्रार ओंकारसिंग गुलचंदसिंग भौड यांनी दिली होती. पोलिसात तक्रार दाखल झाल्यानंतर पोलिसांनी सदर प्रकरणी चौकशी केली. यात विजय जाधव यांनी मारहाण केल्याचे स्पष्ट झाले. यानंतर त्यांच्यावर बेशिस्त, बेजबाबदार, पोलीस दलाची प्रतिमा मलीन करणारे व गंभीर गुन्हेगारी स्वरुपाचे वर्तन केल्याप्रकरणी निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. तर विजय जाधव यांच्यासह त्यांचा भाऊ आणि बहीण यांच्या विरोधात विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात एकाला मारहाण केल्याचा गुन्हा दाखल आहे.

निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. मात्र दुसऱ्या बाजूला पोलीस आमच्या बाजूने तक्रार दाखल करून घेत नाहीत, म्हणून या शिपायाने पोलीस स्टेशनमध्ये गोंधळ घातला. इतकेच नाही तर तक्रार घेतली नाही म्हणून पोलिस ठाण्यात पोलिस शिपायाने जाळून घेण्याचा प्रयत्न केला. सदर प्रकरणी पोलिसांकडून चौकशी सुरु आहे.

# कचरा जाळाल तर याद राखा

## महापालिकेची तंबी; खास स्क्वॉड

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महापालिकेने आता शहरात कुठेही कचरा जाळत असतील, तर त्यावर कारवाई करण्यासाठी 'स्पेशल स्क्वॉड' तयार केला आहे. नागरिकांनी त्यांना संपर्क केल्यास त्वरीत घटनास्थळी जाऊन ते कारवाई करणार आहेत.

कचरा जाळल्याने प्रदूषणात वाढ होत आहे. शहरातील वाढलेली वाहनांची संख्या, बांधकामे यामुळे प्रदूषणात भर पडत आहे. त्यात कचरा जाळला जातो. परिणामी त्याचा नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. याविषयी 'परिसर'संस्थेने सर्वेक्षण करून महापालिकेच्या परिसरात सर्रास कचरा जाळत असल्याचे समोर आणले होते. रस्त्यालगत कचरा साठून ठेवला की, त्याचे काय करायचे ? म्हणून तो जाळला जातो. त्यामध्ये प्लास्टिकच्या पिशव्याही असतात. परिणामी कार्बन डॉयऑक्साइड व इतर विषारी वायू वातावरणात जातात. म्हणून कचरा जाळू नये यासाठी परिसर संस्था काम करत आहे. महापालिकेने वॉर्डनिहाय स्पेशल स्क्वॉडची नियुक्ती केली आहे. दोन किंवा तीन शिफ्टमध्ये हे लोक काम करतील. याविषयी भोसले नगरमध्ये नुकतेच काहीजण पानांचा ढिग करून तो जाळत होते. तेव्हा एका नागरिकाने महापालिकेला फोन केला. तेव्हा तत्काळी त्याची दखल घेऊन घटनास्थळी हे स्क्वॉड पोचले. त्यांनी नागरिकांना समज देखील दिली, अशी माहिती 'परिसर'च्या शर्मिला देव यांनी दिली.

दरम्यान, कोंढवा परिसरात नागरिकांनी फोन केल्यास त्यांना प्रतिसाद मिळाला नाही, अशीही घटना समोर आली. याविषयी नागरिकांनी संबंधित वॉर्ड ऑफिसमध्ये संपर्क साधून त्याची नोंद करायल लावावी, असे आवाहन देव यांनी केले.

**पालिकेची तयारी**

- १५ वॉर्डनिहाय स्क्वॉड
- स्क्वॉडमध्ये दोन ते तीन व्यक्ती
- तीन शिफ्टमध्ये काम

> राष्ट्रीय हरित प्राधिकरणाने (एनजीटी) गेल्यावर्षी कचरा जाळण्याच्या प्रकाराबद्दल सूचना दिल्या होत्या. त्यामध्ये महापालिकेला सांगितले होते की, प्रत्येक महिन्याला वॉर्डनिहाय किती तक्रारी आल्या आणि त्या किती सोडविल्या याविषयीचा अहवाल संकेतस्थळावर अपलोड करावा. परंतु, महापालिकेच्या वतीने तसे अजून तरी काही होत नाही.
>
> — **पुष्कर कुलकर्णी,** पुणे एअर ॲक्शन हब

## राजमाता जिजाऊ आदर्श पुरस्कार अलका सोनवणे यांना प्रदान


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**वाघोली :** केसनंद (ता.हवेली) गावच्या महिला नेत्या समाजकार्यात काम करणाऱ्या शिवसेना(उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या रणरागिणी महिला आघाडीच्या पदाधिकारी तसेच केसनंद जय महाराष्ट्र बचत गटाच्या संस्थापिका/ अध्यक्षा तर पुणे जिल्हा महिला मंचच्या अध्यक्षा तथा स्वाभिमानी मराठा महासंघाच्या महिला आघाडीच्या पच्छिम महाराष्ट्राच्या अध्यक्षा अलका सोनवणे(हरगुडे) पाटील यांना राजमाता जिजाऊ आदर्श पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. स्वाभिमानी मराठा महासंघ महाराष्ट्र राज्याच्या वतीने राजमाता जिजाऊ आदर्श पुरस्कार वितरण सोहळ्याच्या भव्य आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अलका सोनवणे(हरगुडे) यांचा याआधी केलेल्या समाजकार्याचा आढावा घेऊन हा पुरस्कार स्वाभिमानी मराठा महासंघाचे संस्थापक अध्यक्ष डॉ.कृषीराज टकले यांच्या हस्ते सन्मानपत्र व सन्मानचिन्ह याने सन्मानित करीत देण्यात आला.

## गांधी विचार साहित्य संमेलन विशेषांकाचे उद्या प्रकाशन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** 'सत्याग्रही विचारधारा' या मासिकाने तयार केलेल्या गांधी विचार साहित्य संमेलन विशेषांकाचे प्रकाशन रविवार,दि.२ मार्च २०२५ रोजी आयोजित करण्यात आले आहे.ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ.बाबा आढाव,राष्ट्र सेवा दलाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष राजा कांदळकर यांच्याहस्ते हे प्रकाशन होणार आहे.महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष आणि 'सत्याग्रही विचारधारा' या मासिकाचे संपादक डॉ.कुमार सप्तर्षी हे या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी असणार आहेत.हा कार्यक्रम गांधी भवन,कोथरुड येथे दि.२ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता होणार आहे.गांधी विचार साहित्य संमेलन विशेषांकाचे गांधी भवन येथे दि.७ ते ९ मार्च २०२५ रोजी होणार असून त्यानिमित्ताने तयार करण्यात आलेल्या या विशेषांकात गांधीजींच्या जीवन आणि संदेशाविषयी लेखन समाविष्ट करण्यात आले आहे.

## 'खयाल' अंतर्गत रंगली शुभारंभाची सुरेल मैफल



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** "अभिजात संगीताच्या क्षेत्रात महाराष्ट्र हे जागरुक राज्य आहे, कारण इथे म्यूझिक सर्कल ही संकल्पना रुजली आहे. देशात इतरत्र फारशी म्यूझिक सर्कल आढळत नाहीत. कलाकार कलेच्या माध्यमातून जे सांगतो, ते ऐकण्याची संधी म्यूझिक सर्कल देतात. त्यामुळे सर्वत्र म्यूझिक सर्कल वाढावीत", अशी अपेक्षा आचार्य पं. मुकुल शिवपुत्र यांनी गुरुवारी येथे व्यक्त केली.

निमित्त होते श्रीराम लागू रंग अवकाश येथील 'खयाल' या नव्या सांगीतिक उपक्रमाच्या शुभारंभाचे. 'समीप मैफली'ची संकल्पना घेऊन सुरू करण्यात आलेल्या 'खयाल' या उपक्रमाची सुरवात पं. मुकुल शिवपुत्र यांच्या मैफलीने गुरुवारी रात्री झाली. यावेळी पं. मुकुल शिवपुत्र बोलत होते. ज्येष्ठ अभिनेत्री दीपा लागू यांनी पं. शिवपुत्र यांचे स्वागत केले.

पं. शिवपुत्र म्हणाले, "संगीत ही सूर, लयीची भाषा आहे. रागसंगीताच्या माध्यमातून तिचा विस्तार झाला. लोकसंगीतातूनही ती प्रवाहित झाली. प्रत्येक कलाकार, संगीतकार जे सांगत असतो, ते ऐकण्याची क्षमता निर्माण करण्यासाठी म्यूझिक सर्कल साह्यभूत ठरतात. संगीत नादमय आहे. तो नाद रसिकांसमोर दृष्यरूप साकार करू शकतो. नादामध्ये ते सामर्थ्य असते. त्यामुळे रसिकांनी नादाचे अवगाहन केले पाहिजे. आजचा काळ दृष्यमाध्यमाच्या अतिरेकाचा झाल्याने आपण श्रवण विसरत चाललो आहोत", याची खंत शिवपुत्र यांनी व्यक्त केली. मैफलीला प्रारंभ करण्याआधी पं. मुकुल यांनी उस्ताद झाकीर हुसेन यांचे स्मरण केले आणि आजची मैफल मी उस्तादजींच्या स्मृतींना समर्पित करतो, अशी भावना व्यक्त केली.

# आधुनिकीकरणपेक्षा संस्कृती रक्षण महत्त्वाचे : शोभा धारिवाल




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** आजच्या काळामध्ये आपण टीव्ही सुरू केल्यानंतर अनेक नकारात्मक बातम्या पाहायला मिळतात, अशा गोंधळलेल्या आणि नकारात्मक वातावरणात आपल्या संस्कृतीचे संवर्धन करण्याचे महत्त्वाचे कार्य श्री वृद्धेश्वर सिद्धेश्वर देवस्थान ट्रस्ट करत आहे. त्यामुळेच या देवस्थानच्या विविध उपक्रमांच्या मी पाठीशी कायमच उभी असते. आधुनिकीकरणापेक्षा संस्कृती रक्षण करणे आज अधिक महत्त्वाचे आहे, अशी भावना ज्येष्ठ उद्योजिका आणि सामाजिक कार्यकर्ता शोभा धारिवाल यांनी व्यक्त केली.

शिवाजीनगर मधील श्री वृद्धेश्वर सिद्धेश्वर देवस्थान ट्रस्ट तर्फे आयोजित करण्यात आलेल्या महाशिवरात्र संगीत महोत्सवात वृद्धेश्वर सिद्धेश्वर जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आले, त्यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून शोभा धारिवाल बोलत होत्या. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील मुख्य चोपदार राजाभाऊ रंधवे, शिवाजीनगर चे आमदार सिद्धार्थ शिरोळे, ट्रस्टचे अध्यक्ष हनुमंत बहिरट पाटील, सचिव सुधीर दुर्गे, खजिनदार शशिकांत भोसले, विश्वस्त महेश दुर्गे, संजय सातपुते, आर्किटेक्ट शिरीष केंभवी यावेळी उपस्थित होते. स्थायी समितीचे माजी अध्यक्ष बाळासाहेब बोडके यांना सामाजिक क्षेत्रातील जीवनगौरव पुरस्कार तर परमपूज्य श्री योगीराज भाऊ महाराज परांडे यांना धार्मिक क्षेत्रातील जीवनगौरव पुरस्कार यावेळी प्रदान करण्यात आले.

शोभा धारिवाल म्हणाल्या, छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांसारख्या महान व्यक्तीने बलिदान देऊन आपली संस्कृती टिकवण्याचे काम केले. आज याच संस्कृतीचे संवर्धन करण्याची मोठी जबाबदारी आपल्यावर आहे. केवळ आधुनिकीकरण करून संस्कृतीकडे दुर्लक्ष करता येणार नाही. संस्कृती टिकली तर आपण टिकणार आहोत, हे आपण लक्षात घेतले पाहिजे.



> समाजामध्ये अनेक व्यक्ती आपापल्या परीने राष्ट्र निर्मितीचे काम करीत असतात हे काम करणाऱ्या व्यक्तींना प्रकाशात आणण्याचे महत्त्वाचे कार्य वृद्धेश्वर सिद्धेश्वर देवस्थान करत आहे, त्यांचे हे कार्य समाजासाठी निश्चितच महत्त्वाचे आहे.
>
> — **आमदार सिद्धार्थ शिरोळे**

# वल्लभनगर स्थानकावर सुरक्षेची वानवा

## सीसीटीव्ही व प्रवेशद्वारास गेटची आवश्यकता





■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**वल्लभनगर :** पुण्यातील स्वारगेट स्थानकात तरुणीवर झालेल्या अत्याचार प्रकरणानंतर पिंपरी चिंचवड शहरातील आगाराची सुरक्षितता वाढवावी, या मागणीसाठी शहरातील महिला कार्यकर्त्या आणि पोलीस प्रशासनाने वल्लभनगर आगाराची भेट घेतली. दरम्यान, सुरक्षा व्यवस्था सक्षम करावी, पोलीस नियंत्रण स्थापन करावा, हेल्पलाइन व पोलीस स्थानकाचे नंबर दर्शनी भागात लावावे, आगारातील देखभाल विभाग परिसरात स्थानिकांना मज्जाव करण्यात यावा, आगारात थांबलेले रिक्षा चालक आणि वाहनधारकांचे मोबाईल क्रमांक घ्यावेत, यासह महिलांच्या सुरक्षिततेसाठी आगाराने पुढाकार घ्यावा, अशी मागणी करण्यात आली

वल्लभनगर आगरातील सुरक्षेमध्ये अनेक त्रुटी असल्याचे समोर आले आहे. परिसरात मद्यपींचा वावर आणि सुरक्षेची सहा सीसीटीव्हींवर भिस्त असल्याचे चित्र आहे. एसटी प्रशासनाकडून स्थानक परिसरात अधिक सीसीटीव्ही बसविण्यासाठी महामेट्रोला पत्र देण्यात येणार आहे.

शहरातील वल्लभनगर स्थानकातून मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्राला ३२७, मुंबईला १८३ एसटी बस ये-जा करतात. वल्लभनगर आगराच्या ३० बस येथून सुटतात. दररोज हजारो प्रवासी या ठिकाणाहून प्रवास करतात. स्थानकात पुरेशी सुरक्षा नसल्याने प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर झाला आहे. स्थानक आणि परिसरात मद्यपींचा वावर वाढला आहे. छोट्या-मोठ्या चोरीच्या घटना वाढल्या आहेत. स्थानकात प्रवेश करण्यासाठी दोन मुख्य मार्ग आहेत. तेथे प्रवेशद्वार नाही. अनेक गंभीर प्रकार टाळण्यासाठी येथे रात्रीच्या वेळी पोलिस गस्त आवशयक आहे. त्याचप्रमाणे या ठिकाणी सीसीटीव्ही, प्रवेशद्वारास गेट बसवणे आवश्यक आहे;

# अखेर तब्बल ८७७ मालमत्ता जप्त

## आता थकबाकीदारांच्या मालमत्तांची लिलावाची प्रक्रिया सुरु करणार

उपरोक्त प्रक्रियेस अजून ५ दिवसांचा कालावधी जावयाची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे थकीत मालमत्तांचे मालमत्ताधारकांना कराचा भरणा करण्यासाठी ५ मार्च २०२५ रोजी पर्यंत अंतिम मुदत देण्यात आली आहे.५ मार्च २०२५ पूर्वी जे मालमत्ताधारक संपूर्ण कराचा भऱणा करणार नाहीत अशा मालमत्ताकरावर अधिकचा १५ टक्के लिलाव खर्च लावण्यात येणार आहे. त्यामुळे दि. ५ मार्च २०२५ पर्यंत कराचा भरणा करावा अन्यथा सदर मालमत्तांचा महानगरपालिकेकडून ५ मार्च २०२५ नंतर लिलाव करण्यात येणार आहे. त्याचबरोबर जर सदर मालमत्ता लिलावामध्ये विकली गेली नाही तर १ रुपयाच्या नाममात्र बोलीवर महानगरपालिका सदर मालमत्ता खरेदी करणार आहे



"शहरामध्ये मालमत्ताकराची थकबाकी असणाऱ्या मालमत्तांवर जप्तीची कारवाई सुरु असून तात्काळ कर भरुन जप्तीची कारवाई टाळण्याचे आवाहन वारंवार करण्यात येत आहे. जप्त केलेल्या मालमत्तांपैकी ज्या मालमत्ताधारकांनी अद्यापही कराचा भरणा केला नाही अशा मालमत्तांच्या लिलावाची प्रक्रिया सुरु करणेत आली आहे. ज्या मालमत्ताधारकांच्या मालमत्ता जप्त करण्यात आल्या आहेत अशा मालमत्ताधारकांनी थकीत कराचा संपूर्ण भऱणा ५ मार्च २०२५ पूर्वी करुन आपल्या मालमत्तेचा लिलाव टाळावा."

**-प्रदीप जाभंळे – पाटील,** अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या करसंकलन विभागाकडून महानगरपालिकेच्या हद्दीतील मालमत्ता कर थकविणाऱ्या बिगरनिवासी, व्यावसायिक व मिश्र मालमत्तांवर माहे डिसेंबर २०२४ ते माहे फेब्रुवारी २०२५ या दरम्यानच्या कालावधीत अखेर तब्बल ८७७ मालमत्ता जप्त केल्या आहेत. १० फेब्रुवारीपर्यंत जप्त करण्यात आलेल्या ७५९ बिगरनिवासी, व्यावसायिक व मिश्र मालमत्तापैकी ३२१ बिगरनिवासी, व्यावसायिक व मिश्र मालमत्ताधारकांनी मालमत्ताकराची संपूर्ण थकीत रक्कम महानगरपालिकेकडे जमा केल्याने जप्त केलेल्या त्यांच्या मालमत्ता मुळ मालकाच्या ताब्यात देणेत आल्या आहेत.

उर्वरित ४३८ बिगरनिवासी, व्यावसायिक व मिश्र मालमत्ताधारकांच्या मालमत्तेची यादी लिलावाचा भाग म्हणून प्रसिद्ध करण्यात आली. या यादीतील थकबाकीदार मालमत्ताधारकांकडून २५ फेब्रुवारी २०२५ पर्यंत थकीत कर भरण्याची संधी देण्यात आली होती. या संधीचा लाभ घेऊन ३६ मालमत्ताधाराकांनी थकीत कराचा संपूर्ण भरणा केला असून ३६ मालमत्ताधारकांनी आंशिक भरणा केला आहे. उर्वरित, मालमत्ताधारकांच्या मालमत्तांची लिलावाची प्रक्रिया वेगाने सुरु करण्यात आली आहे.

- लिलाव प्रक्रियेमध्ये असणाऱ्या मालमत्तांपैकी ज्या मालमत्तांच्या मालमत्ताधारकांनी थकीत कराचा आंशिक भरणा केला आहे, अशा मालमत्ता लिलाव प्रक्रियेतून वगळल्या जाणार नसून मालमत्तेचा लिलाव टाळण्यासाठी संपूर्ण थकीत कराचा भरणा करणे आवश्यक आहे.
- लिलाव प्रक्रियेमध्ये असणाऱ्या मालमत्तेच्या थकीत करावर अधिकचे १५ टक्के लिलाव खर्चही जोडण्यात येणार
- सदर मालमत्तेच्या कराच्या थकीत रकमेमध्ये सुध्दा वाढ होणार आहे.




# अटल विनामूल्य महाआरोग्य शिबीर

**नवी सांगवी :** लोकनेते आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या ६२व्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र शासन, आरोग्य विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, प्रतिभा महिला प्रतिष्ठान, चंद्ररंग चॅरिटेबल ट्रस्ट आणि अटल चॅरिटेबल फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने २८ फेब्रुवारी ते एक मार्च दरम्यान नवी सांगवी येथील पीडब्ल्यूडी मैदानावर अटल विनामूल्य महाआरोग्य शिबिर २०२५ चे सकाळी ९ ते संध्याकाळी ६ पर्यंत आयोजन करण्यात आले आहे.

महा शिबिराचे मुख्य संयोजक व पिंपरी-चिंचवड भाजपचे अध्यक्ष आमदार शंकर जगताप यांनी ही माहिती दिली.

### शिबिरामध्ये उपलब्ध असणाऱ्या मोफत सेवा

- मोफत कॅन्सर तपासणी
- मोफत X-Ray
- मोफत सोनोग्राफी
- सर्व रक्त तपासण्या
- मोफत डायलिसीस आणि उपचार
- दिव्यांगासाठी कृत्रिम अवयव व आवश्यक उपकरणे

### शस्त्रक्रिया व उपचार

- हृदय रोग: शस्त्रक्रिया व प्रत्यारोपण
- किडनी विकार: किडनी प्रत्यारोपण
- लिव्हर व कॅन्सर उपचार: लिव्हर प्रत्यारोपण, कॅन्सर शस्त्रक्रिया, केमोथेरपी, रेडिएशन
- हाडांचे विकार: गुडघे प्रत्यारोपण, हिप प्रत्यारोपण, मणक्यांचे आजार
- नेत्ररोग: मोफत चष्मे वाटप, डोळ्यांवरील शस्त्रक्रिया
- बालरोग व स्त्रीरोग: लहान बालकांच्या हृदयातील छिद्राची शस्त्रक्रिया, किशोरवयीन मुलींचे समुपदेशन, गरोदर माता तपासणी
- दिव्यांगांसाठी सहाय्य: अत्याधुनिक कृत्रिम हात व पाय तसेच कॅलीपर्सचे मोफत वाटप
- आयुर्वेदिक उपचार: न्युरोथेरेपी, योगा, युनानी, सिद्धा, होमिओपॅथी, नॅचरोथेरपी

### सहभागी होणारी रुग्णालये

- ससून हॉस्पिटल, जिल्हा रुग्णालय, औंध
- टाटा मेमोरिअल हॉस्पिटल (मुंबई)
- आदित्य बिर्ला हॉस्पिटल, जहांगीर हॉस्पिटल, दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल
- डॉ. डी. वाय. पाटील हॉस्पिटल, लोकमान्य हॉस्पिटल (चिंचवड)
- एम्स हॉस्पिटल, पुणे हॉस्पिटल, सिल्व्हर बर्च मल्टी-स्पेशालिटी हॉस्पिटल
- – भारती हॉस्पिटल, रुबी हॉस्पिटल, आयसीटीआरसी वाघोली, वेदांत सेंट्रल हॉस्पिटल (मुंबई)

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते आयुक्त शेखर सिंह यांचा सन्मान



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** महाराष्ट्र शासनाच्या १०० दिवसांचा कृती आराखडा उपक्रमात पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही सर्वोत्तम कामगिरी करणारी महापालिका ठरली आहे. राज्यभरातील महापालिकांचे आणि अन्य क्षेत्रीय कार्यालयांचे मूल्यमापन करण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने १०० दिवसांचा कृती आराखडा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाचा मध्यावधी आढावा २७ फेब्रुवारी २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक आणि वरिष्ठ राज्य व क्षेत्रीय प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत घेण्यात आला. यावेळी १०० दिवसांचा कृती आराखडा उपक्रमात पिंपरी चिंचवड महापालिकेने केलेल्या सर्वोत्तम कामगिरीमुळे आयुक्त शेखर सिंह यांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

महानगरपालिका संचालनालयाने राज्यातील २२ महापालिकांपैकी सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या सहा महापालिकांची यासाठी निवड केली होती. त्यामध्ये अंतिम मूल्यमापनामध्ये पिंपरी चिंचवड महापालिकेने प्रथम क्रमांक पटकावला असून ठाणे महानगरपालिकेने दुसरा क्रमांक पटकावला आहे. ई-प्रशासन, पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा, स्वच्छता, अनावश्यक कार्यालयीन कागदपत्रांची विल्हेवाट, नाविन्यपूर्ण कार्यक्रम आणि आधुनिक सार्वजनिक तक्रार निवारण प्रणाली यांसारख्या अनेक क्षेत्रांमध्ये सुधारणा केल्याने महापालिकेला हे यश प्राप्त झाले आहे.

# रुग्ण हक्क परिषदेच्या पाठपुराव्याला यश

## महिला पोलीस कर्मचाऱ्यांचे ऑपरेशन मोफत

**मोलाच्या सहकार्याने यशप्राप्ती**

**संस्थापक अध्यक्ष उमेश चव्हाण, परिषदेचे मुख्य समन्वयक राजेंद्र (राजाभाऊ) कदम, मुख्यमंत्री सहाय्यता निधीचे प्रमुख रामेश्वरजी नाईक, भारतीय जनता पार्टीचे अमोल शुक्ला, तत्कालीन भाजपचे आणि आताचे राष्ट्रवादीचे वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार बापूसाहेब पठारे, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, दूरदर्शनचे ज्येष्ठ पत्रकार मिलिंद लिमये, रुग्ण हक्क परिषदेच्या पुणे शहर अध्यक्ष अपर्णा मारणे - साठ्ये, पुणे शहर पोलीस अतिरिक्त आयुक्त अरविंद चावरिया यांनी अत्यंत तळमळीने लक्ष घातले.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पुणे शहर पोलीस दलातील महिला पोलीस कर्मचारी स्मिता कीरतकर यांच्यावर फुफ्फुस प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करण्याचे गेल्या वर्षी फेब्रुवारीमध्ये निश्चित झाले होते. दुर्मिळ एबी रक्तगट असणाऱ्या स्मिता किरतकर यांच्यासाठी गेले वर्षभर अवयव उपलब्ध होत नसल्याकारणाने महिला पोलीस कर्मचारी स्मिता यांच्यावरचे ऑपरेशन होऊ शकत नव्हते. मात्र गेल्याच आठवड्यात स्मिता किरतकर यांच्यावरील ५० लाख रुपये खर्चाची शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत झाली. ५० लाखांपैकी किरतकर यांनी स्वतः भरलेली १५ लाख रुपयांच्या रकमेचा परतावा देखील त्यांना शासन स्तरावरून परत देण्यात येणार आहे.



रुग्ण हक्क परिषदेने वारंवार लेखी पाठपुरावा करून गेल्या वर्षी २०२४ मध्ये देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री असताना ऑपरेशन करिता सुमारे ५० लाख रुपये मंजूर करून घेतले होते.

सद्यस्थितीत स्मिता यांची तब्येत आता स्थिर असली तरी आणखी पंधरा दिवस त्यांच्यावर डी. वाय. पाटील हॉस्पिटल, पिंपरी पुणे येथे उपचार सुरू राहणार आहेत. त्यांच्या उपचारांसाठी पिंपरी येथील डी. वाय. पाटील हॉस्पिटलचे सर्वेसर्वा मुख्य संचालक यशराज पी. पाटील, हॉस्पिटलचे प्रमुख हनुमंत चव्हाण, प्रमोद पाटील यांचे शस्त्रक्रिया करण्याबद्दल रुग्ण हक्क परिसराचे अध्यक्ष उमेश चव्हाण, स्मिता किरतकर यांचा भाऊ समाधान कीरतकर, रुग्ण हक्क परिषदेचे समन्वयक राजाभाऊ कदम यांनी आभार मानले.

"स्मिता किरतकर यांची ५० लाख रुपयांची शस्त्रक्रिया मोफत व्हावी, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करण्यासाठी रुग्ण हक्क परिषदेचे च्या वतीने पुढाकाराने प्रचंड प्रयत्न केले. ."

**—उमेश चव्हाण,** अध्यक्ष, रुग्ण हक्क परिषद



# राजभाषा दिनी मराठी पुस्तकांचे वाटप

**पिंपळे सौदागर :** पिंपरी चिंचवड शहरातील विविध सामाजिक कामांसाठी प्रसिद्ध असलेल्या उन्नती सोशल फाऊंडेशनतर्फे मराठी राजभाषा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. पिंगळे सौदागर आणि रहाटणी मधील वाचनप्रेमी नागरिकांनी या पुस्तक वाटपाचा लाभ घेतला.

या उपक्रमामागील संकल्पना विशद करताना उन्नती सोशल फाऊंडेशनचे संस्थापक संजय भिसे म्हणाले, "मराठी वाचन संस्कृतीला गती देण्यासाठी फाउंडेशन नेहमीच कटीबद्ध आहे त्याचाच एक भाग म्हणून ५००० हून अधिक पुस्तकांचा संग्रह असलेले विठाई वाचनालय उन्नती सोशल फाउंडेशन तर्फे मोफत चालवले जाते. आज मराठी राज्यभाषा दिनाच्या निमित्ताने कवी कुसुमाग्रजांचे स्मरण करताना याच वाचन संस्कृतीला गती देण्यासाठी आणि नागरिकांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी आम्ही अग्रनामांकित मराठी साहित्य वाचक प्रेमींमध्ये वाटप आहोत." यानिमित्ताने सखाराम ढाकणे म्हणाले "मराठी भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नाही, तर आपली संस्कृती, आपली परंपरा आणि आपली ओळख आहे. छत्रपती शिवाजी महाराजांपासून ते लोकमान्य टिळक, बाबासाहेब पुरंदरे, पु.ल. देशपांडे यांसारख्या महान व्यक्तींनी मराठीच्या माध्यमातून समाजाला दिशा दिली. आजच्या डिजिटल युगात इंग्रजी आणि इतर भाषांचा प्रभाव वाढत असताना, आपण मराठीचा अभिमान बाळगला पाहिजे. मराठीतून विचार मांडणे, लेखन करणे आणि तिचा प्रचार व प्रसार करणे ही आपली जबाबदारी आहे."

# पिंपरीत उड्डाणपुलाखाली पुन्हा 'पे अ‍ॅण्ड पार्क'

**पिंपरी :** सशुल्क वाहनतळ धोरण राबविण्यात अपयश आल्यानंतर पिंपरी-चिंचवड महापालिकेने आता पुन्हा शहरातील उड्डाणपुलाखाली स्मार्ट सिटीअंतर्गत सशुल्क वाहनतळ (पे अ‍ॅण्ड पार्क) सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. आता पुन्हा स्मार्ट सिटीअंर्तगत सशुल्क धोरण राबविण्यात येणार आहे. यावेळी पदपथ, मोकळ्या रस्त्याऐवजी उड्डाणपुलाखालील मोकळ्या जागेत वाहनतळाचे नियोजन केले आहे. पहिल्या टप्प्यात पुणे-मुंबई महामार्गावरील कासारवाडी येथील भारतरत्न जेआरटी टाटा उड्डाणपूल, चिंचवड येथील संत मदर तेरेसा उड्डाणपूल आणि निगडीतील मधुकर पवळे पुलाखाली सशुल्क वाहनतळ सुरू केले जाणार आहे. मार्चच्या पहिल्या आठवड्यात अंमलबजावणीला सुरुवात करण्याचे महापालिकेचे नियोजन आहे. दुसऱ्या टप्प्यात डांगे चौक, काळेवाडी फाटा, जगताप डेअरी येथील साई चौक, चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चापेकर चौकात सशुल्क वाहनतळ धोरण राबविण्याचे नियोजन आहे.

पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या आणि त्या लोकसंख्येच्या तुलनेत वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे वाहतूक कोंडीत भर पडत असून रस्तेही अपुरे पडत आहेत. शहरातील ठिकठिकाणी रस्त्यावर अनधिकृतपणे तसेच, वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशाप्रकारे वाहने उभी केली जातात. यामुळे शहरातील नागरिकांना वाहतूक कोंडीच्या समस्येस तोंड द्यावे लागते.

# ब्लॉक ट्रेडिंगच्या बहाण्याने एक कोटी नऊ लाखांचा गंडा

**पिंपरी :** ब्लॉक ट्रेडिंग आणि आयपीओ खरेदी केल्यास जास्त पैसे मिळतील, असे सांगत अनोळखी व्यक्तींनी पिंपरी चिंचवड शहरातील एका व्यक्तीची १ कोटी ९ लाख ४७ हजार ४०० रुपयांची फसवणूक केली. ही घटना १ डिसेंबर ते २४ जानेवारी या कालावधीत ऑनलाइन माध्यमातून घडली याप्रकरणी फसवणूक झालेल्या व्यक्तीने बुधवारी (दि. २६ फेब्रुवारी) पिंपरी – चिंचवड सायबर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार राशी अरोरा नाव सांगणारी महिला आणि अकरा बँक खातेधारक, नऊ मोबाइल क्रमांकधारक या संशयितांच्या विरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला. संशयित राशी अरोरा हिने त्यांच्याशी संपर्क करून त्यांना एका व्हॉटस्‌अ‍ॅप ग्रुपमध्ये सहभागी केले. राशी अरोरा यांनी दिलेल्या सल्ल्यानुसार व अ‍ॅक्सीस कस्टमर एक्झिक्युटिव्ह यांनी दिलेल्या वेगवेगळ्या बँक खात्यावर ब्लॉक ट्रेड व आयपीओ खरेदीच्या नावाखाली ७५ लाख आठ हजार रुपयांची गुंतवणूक करण्यास भाग पाडले. भरलेल्या रकमेवर २.६६ कोटी रुपये नफा झाल्याचे दाखविण्यात आले.

# सेवानिवृत्त अधिकारी कर्मचाऱ्यांचा सन्मान



**पिंपरी :** सेवानिवृत्त होणा-या अधिकारी,कर्मचा-यांनी अनेक वर्षांपासून प्रामाणिकपणाने आणि जबाबदारीने केलेल्या कार्यालयीन कामकाजामुळे महापालिकेचे काम उत्तम पध्दतीने पार पडले आहे या त्यांच्या कामाचा आदर्श महापालिकेत सध्या कार्यरत असलेल्या कर्मचा-यांनी घ्यावा असे प्रतिपादन अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांनी केले. पिंपरी येथील महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनातील मधुकर पवळे सभागृह येथे माहे फेब्रुवारी २०२५ अखेर नियमित वयोमानानुसार सेवानिवृत्त होणा-या ११ आणि स्वेच्छानिवृत्ती होणाऱ्या २ अशा एकुण १३ कर्मचा-यांचा अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला, त्यावेळी मार्गदर्शन देताना ते बोलत होते.

संपादकीय विशेष

# आरोपी सापडला पण प्रवृत्तीचे काय ?

स्वारगेट पोलिस स्टेशन पासून हाकेच्या अंतरावर असणाऱ्या या स्थानकातील शिवशाही बसमध्ये नराधमाने केलेल्या अत्याचारामध्ये गावी निघालेल्या एका तरुणीने बलात्काराचा घृणास्पद प्रसंग अनुभवला आणि सर्वत्र नव्या चर्चेला तोंड फुटले. ४८ तास पोलिसांना आरोपीने गुंगारा दिल्याबद्दल आरोप देखील झाले. परंतु आज त्याच्या मूळ गावी आरोपीला पकडण्यात पोलिसांना यश आले. संबंधित आरोपीवर शारीरिक अत्याचार बलात्कार यासारखी कलमे लागतील आणि त्याची न्यायालयीन प्रक्रिया सुरू होईल. परंतु प्रत्यक्ष असे कित्येक अत्याचार्य प्रवृत्तीचे आरोपी आजही आपल्या आजूबाजूला फिरत असतील. या संपूर्ण घटनेची पार्श्वभूमी पाहिली तर त्या महिलेने संबंधित आरोपीवर ठेवलेला अंधविश्वास हा सर्वात मोठा कळीचा मुद्दा समोर येतो.

महिला परक्या व्यक्तीवर, त्याच्या मिठास वाणीवर किती भोळा विश्वास ठेवतात हे अशा घटना दाखवतातच, खेरीज आगारातील बंद गाड्यांमध्ये नेमके कोणकोणते गैरप्रकार चालतात, त्याला सुरक्षारक्षकांची मूक साथ कशी लाभते, लाखो रुपये खर्च करुन बसवण्यात येणाऱ्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची स्थिती काय आहे, तरुणीने लगेचच मदत मागत आरडाओरडा केला असता तर तिला साथ मिळाली असती का अशा एक ना अनेक प्रश्नांना ही घटना जन्म देते. संबंधित प्रकरणानंतर पीडित तरुणी दुसऱ्या एसटीने आपल्या गावी जाण्यास निघाली होती. मात्र वाटेमध्ये तिने हा सगळा प्रकार आपल्या मित्राला सांगितला आणि त्याच्या सल्ल्यानुसार उतरुन पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली. त्यानंतर तपासाची सूत्रे वेगाने हलली आणि सीसीटीव्ही फुटेजद्वारे मिळालेल्या माहितीवरुन दत्तात्रय गाडे नामक सराईत गुन्हेगाराची ओळख पटली. या सगळ्या पार्श्वभूमीवर महिलांकडून वारंवार होणाऱ्या चुकांचा, दुसऱ्यावर अनाठायी विश्वास ठेवण्याच्या वृत्तीचाही विचार व्हायला हवा.

सदर घटनेमध्ये आरोपीने एकटीने प्रवास करणारी ही तरुणी हेरुन 'ताई' अशी साद घालत पाशवी कृत्य केले. खरे तर हे स्थानक वर्दळीचे ठिकाण असून चोहीकडे सुरक्षा यंत्रणाही आहे. सुरक्षारक्षकांची केबिनही आहेत. मात्र अशा ठिकाणी खातरजमा करुन न घेता संबंधित तरुणीने अनोळखी व्यक्तीशी काही काळ संवाद साधला आणि बसमध्ये बसली. म्हणजेच इथे सुरक्षारक्षकांनी आपले काम चोख केले असते आणि संबंधित मुलीनेही अपरिचित व्यक्तीवर विश्वास न ठेवता संबंधित यंत्रणेकडे विचारपूस केली असती, तर कदाचित या दुर्घटनेतून वाचली असती. आगारात बंद पडलेल्या बसेसची तपासणी करताना अनेक आक्षेपार्ह गोष्टी सापडल्या. त्यात महिलांचे कपडे, दारुच्या बाटल्या, गुटख्याची पाकिटे, शर्ट, अंतर्वस्त्र आणि गर्भनिरोधके सापडल्यानंतर इथे रोज काय घडत असावे, हा प्रश्न समोर येतो. हे चित्र विदारक स्थिती समोर आणत असून त्यात एसटीचे कर्मचारीही सहभागी आहेत का, हा प्रश्न विचारला जात आहे. सार्वजनिक ठिकाणी जागोजागी बंद पडलेल्या बसेस वा अन्य वाहने बघायला मिळतात. गैरकृत्य करणारे त्यांचा अयोग्य कारणासाठी सर्रास वापर करताना दिसतात. मात्र यंत्रणा वा स्थानिक त्याकडे दुर्लक्ष करतात. स्वाभाविकच त्यांना रान मोकळे मिळते आणि अनेक दुर्दैवी जीव त्यात अडकतात. हे गांभीर्य आता तरी लक्षात घ्यायला हवे.

पुरुषांची स्त्रीकडे बघण्याची मानसिकता बदलण्याची गरज आज तीव्रतेने जाणवतेच, खेरीज तरुणींनी अशा घटनांपासून वाचण्यासाठी काही काळजी घेणे गरजेचे वाटते. एकटीने बाहेर पडताना सार्वजनिक ठिकाणी नेहमी लोकांसोबत रहावे. बरोबर कोणी नसले तरी ते दर्शवून देऊ नये. परक्या माणसावर विश्वास ठेवणे, त्याला वैयक्तिक माहिती सांगणे, त्याच्याबरोबर मैत्रीपूर्ण वागणूक ठेवणे संकटाला आमंत्रण ठरु शकते. मुख्य म्हणजे प्रवेश करण्याआधी त्या ठिकाणाची सुरक्षा आणि सुरक्षेसाठीचे मापदंड तपासून पहावेत. दुसरी बाब म्हणजे आपले रक्षण करण्यासाठी काही आत्मसुरक्षा तंत्र शिकणे महत्त्वाचे आहे. मार्शल आर्टस कवा स्वयंविकसन अभ्यास ही सध्याच्या काळाची मुख्य गरज बनली आहे. यामुळे तुम्ही कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत त्वरित प्रतिसाद देऊ शकता. पळून जाणे, मोठ्याने आवाज काढणे आणि आसपासच्या लोकांची मदत घेणे यातूनही तुम्ही स्वतःचे संरक्षण करू शकता.

आज स्मार्टफोनमध्ये सुरक्षा वाढवण्यासाठी अनेक ॲप्स उपलब्ध आहेत. तेव्हा खात्रीशीर ॲप्स वापरून तपासणी करत राहणे आणि संकटाच्या वेळी संबंधित लोकांना त्वरित सूचित करणे हादेखील एक कामी येणारा उपाय आहे. यामध्ये लोकेशन इतर लोकांसोबत शेअर करणे कवा एका क्लिकमध्ये मदतीसाठी कॉल करणे ही सुविधा असू शकते. प्रसंगावधान राखून, चातुर्याने त्याचा उपयोग करता येईल. आपल्यावर वाईट प्रसंगाला तोंड देण्याची वेळ येऊ शकते हे लक्षात घेत सुरक्षिततेसाठी शारीरिक आणि मानसिक तयारी महत्त्वाची आहे. तुम्ही कुठेही असला तरी तिथली परिस्थिती, लोकांची मानसिकता आणि वातावरण कसे आहे यावर लक्ष ठेवणे आज अत्यावश्यक बनले आहे. कुठेही असुरक्षित वाटत असल्यास संबंधित ठिकाण त्वरित सोडून बाहेर पडणे योग्य ठरते. हे आणि असे इतर उपाय महत्वाचे आहेत

बलात्कार कवा अत्याचाराच्या इतर घटनांमध्ये कायदेशीर अधिकारांची माहिती असणेही आवश्यक आहे. आपल्या हक्कांचा वापर कसा करावा, मदतीसाठी कसे आणि कोठे पोहोचावे आणि कायद्यानुसार त्याची प्रक्रिया काय आहे, याबद्दल प्रत्येक महिलेला माहिती असणे आवश्यक आहे. यासाठी आपल्याला पोलिसांकडून, संस्थांकडून कवा सामाजिक कार्यकर्त्यांकडून मार्गदर्शन मिळवता येईल. त्यासाठी आंतरराष्ट्रीय आणि देशी महिला सुरक्षा धोरणे, त्यातील कायदेशीर तरतुदी, संरक्षण कायदे आणि संरक्षणासाठी असणारे उपाय याबद्दल महिलांनी माहिती घेतली पाहिजे. महिलांच्या हक्कांची कायदेशीर संरचना सशक्त केल्यास अशी दुष्कृत्ये करणारे गुन्ह्याला धजावणार नाहीत. समाजातील सर्व घटकांनीही एकत्रितपणे महिलांच्या सुरक्षेसाठी काम करणे आवश्यक आहे. हे साधले तर कदाचित या प्रश्नाची दाहकता कमी होऊ शकते.

# विकासाबरोबरच शून्य उत्सर्जनावरही भर

**भारत २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनण्याच्या आणि २०७० पर्यंत निव्वळ शून्य उत्सर्जनाचे लक्ष्य गाठण्याच्या दुहेरी संकल्पनेसह पुढे जात आहे. त्यासाठी हवामानबदलामुळे जाणवणाऱ्या उष्णतेच्या लाटा आणि पूर, पुरवठा साखळीतील व्यत्यय आदी घटनांमधून टिकाऊपणाच्या उद्दिष्टांना सामोरे जावे लागेल. अशा परिस्थितीत देशाला विकसित राष्ट्र बनवण्याच्या प्रयत्नांच्या केंद्रस्थानी काही उपाय ठेवणे आवश्यक आहे.**

पर्यावरण

मिलिंद बेंडाळे
पर्यावरण अभ्यासक

गेल्या वष मॉन्सूनमध्ये आसाम ते बिहार आणि गुजरात ते आंध्र प्रदेशपर्यंत अनेक ठिकाणी देशाने विनाशकारी पूर पाहिला. याआधी उत्तर भारतातील बहुतांश भागात कडक उन्हाचा सामना करावा लागत होता. २०२५ हे वर्षही तसेच राहण्याची शक्यता आहे. ऊर्जा, पर्यावरण आणि पाणी परिषदे (सीईईडबल्यू) च्या अभ्यासानुसार ७५ टक्के भारतीय जिल्हे पूर, दुष्काळ आणि चक्रीवादळासारख्या तीव्र हवामानाच्या परिणामांचे केंद्र आहेत. तीव्र हवामानातील घटनांची वारंवारता वाढत जाते, तसतसे असुरक्षिततेचे सूक्ष्म मूल्यांकन करून स्थानिक स्तरावरील अनुकूलन योजना विकसित करण्याची तातडीची गरज आहे. देशाच्या काही भागात यावर काम सुरू झाले आहे. भारताची स्वच्छ ऊर्जेची कहाणी कौतुकास्पद आहे. अजीवाश्म ऊर्जेची स्थापित क्षमता नोव्हेंबर २०२४ पर्यंत २०५.५ गीगावॅटवर पोहोचली आहे, जी एकूण स्थापित क्षमतेच्या सुमारे ४५ टक्के आहे. तथापि, एकूण ऊर्जा मिश्रणामध्ये मोठ्या प्रकल्पांवर आधारित अक्षय ऊर्जा क्षमता अधिक प्रमाणात जोडण्यासाठी नावीन्यपूर्ण अंदाज आणि ऊर्जा साठवण, लवचिकता आणि बाजार यंत्रणा आवश्यक असेल. ग्रामीण भागात सौर ड्रायर (मूल्यवर्धनासाठी फळे आणि भाजीपाला सुकविण्यासाठी) आणि सौर यंत्रमाग यांसारख्या विकेंद्रित नवीकरणीय ऊर्जेसाठी मोठ्या संधी आहेत. 'सीईईडबल्यू डेटा'नुसार, ग्रामीण भारतातील आजीविका सक्षम करणाऱ्या स्वच्छ ऊर्जा तंत्रज्ञानासाठी ५० अब्ज डॉलरहून अधिक बाजारपेठेची संधी आहे.

आज देश ऊर्जा सुरक्षा निर्माण करण्यासाठी आणि संक्रमणाला गती देण्यासाठी कमी-कार्बन तंत्रज्ञानाचा समावेश असलेल्या पुरवठा साखळींच्या स्वदेशीकरण आणि विविधीकरणावर लक्ष केंद्रित करत आहे. २०७० पर्यंत निव्वळ शून्य उत्सर्जन लक्ष्य गाठण्यासाठी भारतातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांमध्ये (एमएसएमई) कार्बन उत्सर्जन कमी करण्यावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. व्यवसाय सुलभता, कौशल्य विकास आणि निर्यात लवचिकता यासाठी सरकारने 'डिजिटल एमएसएमई डेटाबेस' तयार केला पाहिजे. शिवाय, भारताच्या 'इनोव्हेशन इकोसिस्टीम'लाही मोठ्या प्रमाणावर चालना देण्याची गरज आहे. उत्सर्जन कमी करण्याच्या दृष्टीने (पोलाद, सिमेंट, खते किंवा ॲल्युमिनियमसारखे जड उद्योग) घट्ट मानल्या जाणाऱ्या क्षेत्रांना 'डीकार्बोनाइज' करण्यासाठी संशोधन आणि विकासावरील खर्चात लक्षणीय वाढ केली पाहिजे. यामध्ये ग्रीन हायड्रोजन आणि कार्बन कॅप्चर, युटिलायझेशन आणि स्टोरेज यासारख्या नवीन आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. याची अंमलबजावणी करण्यासाठी अतिरिक्त, कमी जोखीम, कमी खर्च आणि दीर्घकालीन वित्तपुरवठा याद्वारे आर्थिक संसाधनांच्या कमतरतेवर मात करणे आवश्यक आहे.

'सीईईडबल्यू'च्या 'सेंटर फॉर एनज फायनान्स'च्या २०२१ च्या अंदाजानुसार, भारताला 2070 पर्यंत निव्वळ-शून्य लक्ष्य साध्य करण्यासाठी १०.१ ट्रिलियन डॉलर (२०२० च्या किमतीनुसार)ची आवश्यकता असेल. या प्रमाणात वित्तपुरवठा करण्यासाठी विविध उदयोन्मुख वित्तपुरवठा साधने आणि यंत्रणांचा अवलंब करणे आवश्यक आहे. ग्रीन बाँड, वित्तपुरवठा, निसर्गसंवर्धन कार्यासाठी कर्जाची अदलाबदल आणि इकोसिस्टीम सेवांसाठी देयके आदींचा त्यात समावेश होतो. एकंदरीत, विकसित भारत म्हणजे सर्व भागधारकांनी एकत्रितपणे विकासाभिमुख, हरित आणि शाश्वत भविष्याकडे वाटचाल करणे. यामध्ये स्थानिक समुदाय आणि स्थानिक सरकार तसेच स्थानिक कृतीसाठी राज्यस्तरीय नियोजन, ऊर्जा सुरक्षेसाठी केंद्रीय धोरण, कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी खासगी क्षेत्राची भूमिका आणि शाश्वत गुंतवणुकीला गती देण्यासाठी तसेच जोखीम कमी करण्यासाठी धोरणात्मक मदतीचा समावेश आहे. चांगल्या भविष्याची कल्पना करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे त्यास आकार देणे. भारत ही एक उदयोन्मुख अर्थव्यवस्था आहे. येथे विकास आणि गरिबी निर्मूलनाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी हरितगृह वायू उत्सर्जन वाढण्याची शक्यता आहे. १८५० ते २०१९ पर्यंत भारताचे ऐतिहासिक संचयी उत्सर्जन हे पूर्व-औद्योगिक कालखंडातील जगातील एकत्रित कार्बन डायऑक्साइड उत्सर्जनाच्या चार टक्क्यांपेक्षा कमी आहे. जगातील १७ टक्के लोकसंख्या येथे राहत असूनही उत्सर्जन कमी ठेवण्यात आपल्याला यश आले. आजही आपले वार्षिक दरडोई उत्सर्जन जागतिक सरासरीच्या केवळ एक तृतीयांश इतके आहे.

नोव्हेंबर २०२१ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या फ्रेमवर्क 'कन्व्हेन्शन ऑन क्लायमेट चेंज' (सीओपी)मध्ये भारताने २०७० पर्यंत शून्य उत्सर्जनाचे उद्दिष्ट गाठण्याचे जाहीर केले. पॅरिस कराराच्या कलम ४ मधील परिच्छेद १९ ओळखून भारताचे दीर्घकालीन कमी-कार्बन विकास धोरण संयुक्त राष्ट्रांच्या हवामानबदलाच्या फ्रेमवर्क कन्व्हेन्शनला सादर केले आहे आणि ते २०७० पर्यंत निव्वळ-शून्य उत्सर्जन पातळी गाठण्याच्या उद्दिष्टाची पुष्टी करते. देशाच्या यासंदर्भातील धोरणामध्ये ऊर्जा प्रणालींचा कमी-कार्बन विकास, एकात्मिक, कार्यक्षम आणि सर्वसमावेशक वाहतूक प्रणाली विकसित करणे, इमारतींमध्ये शहरी रचना, ऊर्जा आणि भौतिक कार्यक्षमता आणि शाश्वत शहरीकरणाला चालना देणे, आणि सामाजिक-आर्थिक आणि पर्यावरणीय विचारांच्या अनुषंगाने जंगल आणि वनस्पतींचे आच्छादन वाढवणे या उपाययोजनांचा समावेश आहे. यातील प्रत्येक संक्रमणाच्या संदर्भात, भारताच्या 'लो-कार्बन ग्रोथ स्ट्रॅटेजी' दस्तावेजात संबंधित आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय संदर्भ, विद्यमान धोरणे आणि कार्यक्रम आधीच अंमलात आणले जात आहेत. हवामानबदलाच्या आव्हानाचा सामना करताना देशांच्या कामगिरीच्या आधारे अनेक निर्देशांक तयार करण्यात आले आहेत. तथापि, भारत आणि जगासाठी या निर्देशांकांची कार्यपद्धती, संकल्पनात्मक चौकट आणि परिणाम याबाबत अनेक मतभेद आहेत.

देशातील वेगाने वाढणाऱ्या पर्यावरणीय समस्या सोडवण्यासाठी सरकारने अनेक पावले उचलली आहेत. २४ राज्ये/केंद्रशासित प्रदेशांमधील १३१ शहरांमध्ये हवेची गुणवत्ता सुधारण्यावर भर आहे. २०२५-२६ पर्यंत हवेची गुणवत्ता मानके साध्य करण्याचे उद्दिष्ट ठरवण्यात आले आहे. आतापर्यंत हवेच्या गुणवत्तेचे परीक्षण करण्यासाठी १,३६६ 'मॉनिटरिंग स्टेशन' स्थापित करण्यात आली आहेत. 'कमिशन फॉर एअर क्वालिटी मॅनेजमेंट इन एनसीआर' आणि संलग्न क्षेत्रांनी (सीएक्यूएम) 'एनसीआर'मधील वायू प्रदूषण रोखण्यासाठी एक धोरण तयार केले आहे तसेच 'एनसीआर'साठी औद्योगिक आणि इतर अनुप्रयोगांसाठी मान्यताप्राप्त इंधनांची मानक यादी तयार केली आहे. देशाने एक एप्रिल २०२० पासून इंधन आणि वाहनांसाठी बीएस ४ ते बीएस ६ नियम लागू केले आहेत. परवडणाऱ्या वाहतुकीसाठी शाश्वत पर्याय हा कॉम्प्रेस्ड बायोगॅस असून, तो बाजारात उपलब्ध करून देण्यावर भर आहे.


राज्य आणि केंद्र सरकारने मनरेगा आणि अन्य योजनांमधून वृक्षारोपणावर भर दिला आहे. आंध्र प्रदेश, आसाम, हरियाणा, ओडिशा, राजस्थान, तामिळनाडू आणि उत्तर प्रदेश या सात राज्यांमध्ये पाच वर्षांच्या कालावधीसाठी २५ दशलक्ष डॉलर खर्चातून आंतरराष्ट्रीय विकास एजन्सी (यूएसएड)द्वारे 'ट्री आऊट ऑफ फॉरेस्ट'कार्यक्रम भारतात सुरू करण्यात आला आहे. पर्यावरणीय सेवा, विशेषत: कार्बन जप्ती आणि ग्रामीण लोकसंख्येसाठी सर्वसमावेशक उपजीविका आणि आर्थिक संधी वाढवण्यासाठी जंगलांच्या बाहेर वृक्षलागवडीचा विस्तार करणे हे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे.

**" भारतात (हायब्रीड आणि) इलेक्ट्रिक वाहनांचा जलद अवलंब आणि उत्पादन करण्यासाठी ई-वाहनांवर सबसिडी दिली जात आहे. जलशक्ती मंत्रालय राष्ट्रीय नदी संवर्धन योजना राबवते. भारताने 'रामसर कन्व्हेन्शन'च्या चौकटीत पाणथळ जमिनींच्या यादीत दहा पाणथळ जागा जोडल्या आणि ऑगस्ट २०२२ पर्यंत भारतातील रामसर साइट्सची एकूण संख्या ७५ वर पोहोचली. ती आशियामध्ये सर्वोच्च आहे. सरकारने 'सिंगल यूज प्लॅस्टिक' नष्ट करण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. १ जुलै २०२२ पासून ओळखल्या जाणाऱ्या एकेरी वापराच्या प्लास्टिकच्या वस्तूंवर बंदी घालण्यात आली आहे. राष्ट्रीय वन धोरण (एनएफपी), १९८८ च्या अनुषंगाने देशाच्या डोंगराळ आणि पर्वतीय प्रदेशातील एकूण भूभागाच्या किमान एक तृतीयांश क्षेत्रफळ वृक्षाच्छादित करण्याचे उद्दिष्ट आहे.**

फिटनेस फंडा

## मेंदू तल्लख राहण्यासाठी...

दोस्तांनो, तुमच्यापैकी बऱ्याचजणांना सुडोकू, शब्दकोडी सोडवायची सवय असेल. तुम्हीही वेळ मिळेल तेव्हा वा खास वेळ काढून सुडोकू, शब्दकोडी सोडवत असाल. यामुळे मेंदूला खाद्य मिळतं, मेंदू तल्लख बनतो, हेही तुम्हाला माहीत असेल. परंतु सगळेच शब्दकोडी, सुडोकू सोडवत नाहीत. अशा वेळी मेंदू तल्लख बनवण्यासाठी काही व्यायामही करता येतील. त्याविषयी... ✻ धावल्यामुळे शरीर तंदुरूस्त होतं. शिवाय मेंदूही तल्लख होतो. धावल्यामुळे मेंदूत नव्या पेशींची निर्मिती होते. यामुळे मेंदू नव्या गोष्टी लवकर आत्मसात करतो. शिवाय स्मरणशक्तीही सुधारते. धावल्यामुळे मेंदू ताण सुलभपणे हाताळतो. मेंदूची कार्यक्षमताही सुधारते. ✻ मेंदूचं आरोग्य सुधारण्यासाठी एअरोबिक्स करता येईल. आठवड्यातली १५० मिनिटं सौम्य ते मध्यम स्वरूपाचा एअरोबिक्स व्यायाम केल्यामुळे मेंदूला खूप लाभ होतात. ✻ सायकल चालवल्यामुळे मेंदूला होणाऱ्या रक्तपुरवठ्यात सुधारणा होते. यामुळे नव्या पेशींची निर्मिती होऊन मेंदूला चालना मिळते. ✻ ध्यानधारणेमुळे मेंदूला बरेच लाभ होतात. मेडिटेशन केल्यामुळे मन शांत होते, एकाग्रता वाढते. स्मरणशक्ती सुधारणं आणि ताण कमी करण्यासाठी मेडिटेशन करावं.




खेचाखेची

## मालक कसा ?

फक्त मोबाईललाच माहीत असतं...

.
.
.
.
.
.
.
.
.

आपला मालक काय गुणाचा आहे...!

वेगळं काही

राजस्थानातल्या उदयपूरमध्ये एक मुलगी जन्माला आली. जन्मली तेव्हा तिचं वजन होतं अवघं ४०० ग्रॅम. तिला नीट श्वासही घेता येत नव्हता. शरीर काळं-निळं पडत चाललं होतं. त्यामुळे सर्वांनी तिच्या जगण्याची आशा सोडून दिली होती. पण डॉक्टरांनी त्या लहानग्या जीवाला जीवनदान देण्याचा जणू चंगच बांधला होता. प्रयत्नांती परमेश्वर असं म्हटलं जातं. अखेर डॉक्टरांची मेहनत, प्रयत्न फळाला आले आणि आज ही मुलगी गोड हसून डॉक्टरांना जणू 'थँक यू' म्हणते आहे. डॉक्टर सुनिल जांगड यांनी ही अनोखी कामगिरी पार पाडली. हे बाळ दक्षिण आशियातलं सर्वात कमी वजनाचं ठरलं आहे. त्याला जीवनदान देऊन जांगड यांनी विक्रमच केला आहे.




राशीभविष्य

- **मेष** : रखडलेल्या कामांना गती येईल. मानसिक, कौटुंबिक स्वास्थ लाभेल. आर्थिक आवक उत्तम राहील.
- **वृषभ** : अर्धवट माहितीवर विसंबून राहू नका. व्यावसायिक प्रश्नातून मार्ग निघेल. प्रकृतीची काळजी घ्यावी.
- **मिथुन** : प्रियजनांचा सहवास लाभेल. विवाहाच्या प्रयत्नांना वेग येईल. जुनी येणी सहज वसूल होतील.
- **कर्क** : व्यवसायात नवे करार होतील. वैवाहिक सौख्य लाभेल. विद्यार्थ्यांची प्रगती होईल.
- **सिंह** : ज्ञानार्जनाच्या संधी लाभतील. दूरच्या प्रवासाचे बेत आखाल. कौटुंबिक वाद-विवाद संभवतात.
- **कन्या** : अनपेक्षित घटना दिलासा देतील. ठरवलेलं उद्दीष्ट साध्य करू शकाल. मानसिक सौख्य लाभेल.
- **तूळ** : महत्त्वाची कामं आयत्या वेळी रखडतील. खर्चाचं प्रमाण वाढेल. भागीदारी व्यवसायात काळजी घ्या.
- **वृश्चिक** : इतरांच्या भूलथापांना बळी पडू नका. विश्वासूंची पारख करायला हवी. ज्येष्ठांचं सहकार्य लाभेल.
- **धनु** : सांस्कृतिक, क्रीडा क्षेत्रात संधी लाभतील. नव्या विचारांना चालना मिळेल. प्रियजनांच्या भेटी होतील.
- **मकर** : कामाचा योग्य मोबदला मिळेल. धार्मिक स्थळाची यात्रा घडेल. इतरांशी स्नेह वृध्दींगत होऊ शकेल.
- **कुंभ** : अपेक्षित यश प्राप्त करता येतील. थोरामोठ्यांचा सहवास लाभेल. जुनी येणी सहज वसूल होतील.
- **मीन** : बोलण्यातून गैरसमज संभवतात. गेलेल्या संधी पुन्हा लाभतील. विचारांना कृतीची जोड द्यायला हवी

सल्ला मोलाचा

## महत्त्वाच्या मोबाईल सेटिंग्जविषयी

✻ आपण अनेक ॲप्लीकेशन्स डाऊनलोड करत असतो. पण डाऊनलोड झाल्यानंतर स्क्रोल करून ॲप कुठे डाऊनलोड झालंय हे शोधावं लागतं. हे करावं लागू नये यासाठी एक सोपं सेटिंग करा. गुगल प्ले स्टोअरमध्ये जा. डाव्या बाजूच्या तीन लाईन्सच्या आयकॉनवर जाऊन 'सेटिंग' हा पर्याय उघडा. तेथील 'ॲड आयकॉन टू होम स्क्रीन' हा पर्याय निवडा. आता तुम्ही ॲप्लीकेशन डाऊनलोड केलं की ते थेट होम स्क्रीनवर दिसेल. ✻ फोन लॉक असला तरी अनेकदा येणारी नोटिफिकेशन्स वाचता येतात. अशा वेळी फोन दुसऱ्या व्यक्तीच्या हातात असेल तर खाजगी मेसेज वाचले जाण्याचा संभव असतो. हे टाळायचं असेल तर एक सोपं सेटिंग तुम्ही करू शकता. सेटिंग्जची विंडो ओपन करा. तेथील 'साऊंड अँड नोटिफिकेशन्स'चा पर्याय निवडा. त्यातील 'गिअर आयकॉन' निवडा. त्यातील 'हाईड सेंसिटिव्ह नोटिफिकेशन्स कंटेट' हा पर्याय सिलेक्ट करा. आता फोन तुम्ही अनलॉक करेपर्यंत कोणीही फोनमधील नोटिफिकेशन्स वाचू शकणार नाही. यासारख्या अनेक टिप्स अनुसरुन आपण या स्मार्ट मित्राची मदत घेऊ शकतो.

दिनविशेष

## १ मार्च

- **२००३** : प्रसिद्ध लेखिका गौरी देशपांडे यांचे निधन.
- **२०१३** : पुण्याचा बुद्धिबळपटू अक्षयराज कोरे भारताचा ३२ वा ग्रँडमास्टर बनला.
- **२०१६** : न्यायालयाने इरोम शर्मिला चानू यांची आत्महत्येच्या प्रयत्नाच्या आरोपातून निर्दोष मुक्तता केली.
- **२०१८** : छत्तीसगडमध्ये १२ नक्षलवादी ठार. 'ग्रे हाउंड'ची कारवाई.

महत्त्वपूर्ण काही...

## त्वचा राहील निरोगी

खरंतर त्वचा अत्यंत महत्त्वाची कामं करत असते. त्वचेमुळे शरीरातले इतर अवयव सुरक्षित राहतात. त्वचेमुळे जंतू शरीरात लवकर प्रवेश करू शकत नाहीत आणि तुम्ही आजारी पडत नाही. म्हणूनच लहान वयापासूनच त्वचेची काळजी घ्यायला हवी. यामुळे चेहऱ्यावर मुरूमं येणं, सुरकुत्या पडणं, खाज येणं अशा संभाव्य समस्या टाळता येऊ शकतात.

त्वचेची काळजी घेताना ती स्वच्छ ठेवायला हवी. हात स्वच्छ हवेत. घाणेरड्या, बरबटलेल्या हातांच्या स्पर्शामुळे त्वचेला जंतूसंसर्ग संभवतो. म्हणूनच कोमट पाण्याने हात धुवा. सौम्य साबणाचा वापर करा. हाताचा पंजा, बोटांच्या मधला भाग, मनगट नीट स्वच्छ करा. टॉवेलने हात कोरडे करा. आंघोळ करताना कोमट पाणी वापरा. कढत पाण्यामुळे त्वचा कोरडी पडू शकते. रसायनयुक्त साबण वापरू नका. चेहऱ्याच्या त्वचेची विशेष काळजी घ्या. त्वचा तेलकट असेल तर दिवसातून दोन ते तीन वेळा चेहरा धुवा. त्वचेची काळजी घेणारी बरीच क्रीम्स बाजारात उपलब्ध आहेत. पण ती सगळीच तुम्हा छोट्यांसाठी नसतात हे लक्षात घ्या.

आरोग्यमंत्र

## आरोग्यदायी अंजीर

अंजीर हे आरोग्यासाठी लाभकारक फळ आहे. इतर फळांच्या तुलनेत अंजीरामध्ये अनेक औषधी गुणधर्म अधिक प्रमाणात असतात. म्हणूनच अंजीर खाणं फायदेशीर मानलं जातं. आज याच्या सेवनानं मिळणारे लाभ पाहू या.



✻ वाळलेलं अंजीर उकळवा आणि ते बारीक वाटून तयार होणारी पेस्ट घश्याची सूज किंवा गाठीवर बांधा. यामुळे लवकर आराम मिळेल. ✻ साध्या बद्धकोष्ठतेचा त्रास असेल तर गरम दुधात वाळलेलं अंजीर उकळवून ते सेवन करणं लाभकारक ठरतं. या उपायानं सकाळी व्यवस्थितपणे पोट साफ होतं. ✻ ताजं अंजीर खाऊन त्यावर दूध पिणं शक्तिवर्धक आणि वीर्यवर्धक असतं. ✻ एक आठवडा सतत दूध आणि साखरेसोबत सुकलेलं अंजीर खाल्ल्यास रक्ताचे विकार नाहीसे होतात. ✻ कोणत्याही प्रकारचं फास्टफूड किंवा जंकफूड पोटात गेलं तर ते बाहेर येण्यासाठी अंजीर खाणं अत्यंत उपयुक्त आहे. ✻ दम्याच्या रुग्णांनी सकाळी वाळलेल्या अंजीराचं सेवन करणं योग्य ठरतं. ✻ क्षयरोग रोखण्यासाठी, क्षयरोगात कफाची उत्पत्ती कमी होण्यासाठी, ताजं अंजीर खाणं फायदेशीर मानलं जातं. अंजीर पित्त विकार, रक्तविकार, वात आणि कफ विकार दूर करणारं फळ आहे.

पंचांग

**शनिवार, १ मार्च २०२५**
क्रोधीनाम संवत्सर,
शके १९४६, फाल्गुन शु ०२,
नक्षत्र : पूर्व भाद्रपदा,
चंद्रराशी : मीन, योग: साध्य,
सूर्योदय : ७.००, सूर्यास्त : ६.४२

फॉरवर्डस

किती सत्य कथन करत आहेत या ओळी...

**चेहरे पर सुकून तो बस दिखाने भर का है,**
**वरना बेचैन तो हर शख्स ज़माने भर का है।**

वाचा तर खरं

✻ मॉंक स्ट्रॅप्स आणि डबल मॉंक स्ट्रॅप्स हा बुटांमधला फॅशनेबल प्रकार आहे. अरूंद किंवा लहान पावलं असतील तर डबल मॉंक स्ट्रॅप्स ट्राय करा. फॉर्मल ट्राउझर्स, चिनोज किंवा डेनिमसोबत ते कॅरी करता येतील. ✻ विंग टीप ब्रॉग्युज फॉर्मलवेअर सोबत कॅरी करता येतील. सूट आणि ट्राउझर्ससोबतही ते कॅरी करता येतील. ✻ चेल्सी बुटांना लेस नसते. हे बूट वेगवेगळ्या पद्धतींनी वापरता येतात. कॅज्युअल, सेमी फॉर्मल आणि फॉर्मलसोबत ते कॅरी करता येतात. ✻ काही तरी स्पोर्टी पण ट्रेंडी ट्राय करायचं असेल तर व्हाईट स्नीकर्स आहेतच.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

# तंत्रज्ञान हाच विकासाचा आधारस्तंभ

## फिनटेक आणि एआय क्षेत्रातील स्टार्टअप्सला गती देणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** महाराष्ट्र शासनाच्या धोरणांमुळे राज्य हे देशाच्या स्टार्टअप आणि तंत्रज्ञान क्षेत्रात आघाडीवर आहे. जेव्हा आपण ट्रिलियन-डॉलर अर्थव्यवस्थेचे स्वप्न पाहतो, तेव्हा तंत्रज्ञान हा विकासाचा मुख्य आधारस्तंभ असतो. फिनटेक आणि एआय क्षेत्रातील स्टार्टअप्सला गती देण्यासाठी शासन विशेष प्रयत्न करत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुंबई टेक वीक-२०२५ चा आज शुभारंभ झाला. या उद्घाटन प्रसंगी ऋषी दर्डा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची जियो कन्वेंशन सेंटर येथे मुलाखत घेतली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राच्या विकासाचे भविष्यातील रोडमॅप आणि राज्य सरकारच्या तंत्रज्ञान व पायाभूत सुविधा प्रकल्पांबाबत सविस्तर माहिती दिली.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, वॉर रूममुळे प्रकल्पांच्या निर्णय प्रक्रियेला वेग मिळाला आहे. पूर्वी मुंबईत एखादा प्रकल्प सुरू करण्यासाठी १८ विविध सरकारी यंत्रणांची परवानगी घ्यावी लागायची, त्यामुळे प्रकल्पांना विलंब होत असे. वॉर रूमच्या माध्यमातून सर्व संबंधित अधिका-यांना एकाच ठिकाणी एकत्र आणले आणि त्वरित निर्णय घेण्यास सुरुवात केली. याच कारणामुळे मेट्रो, कोस्टल रोड, अटल सेतू यासारख्या प्रकल्पांना गती मिळाली, असे फडणवीस म्हणाले.

आगामी पाच वर्षांत महाराष्ट्र सरकार तीन मोठ्या पायाभूत सुविधा प्रकल्पांवर विशेष लक्ष केंद्रीत करणार आहे. यात वाढवण बंदर हा प्रकल्प मुंबईच्या अर्थव्यवस्थेत मोठा बदल घडविणारा आहे. हा पोर्ट सध्याच्या जे.एन.पी.टी. पेक्षा तीनपट मोठा असून, २० मीटर खोल बंदर असल्यामुळे जगातील सर्वात मोठी जहाजे येथे थांबू शकतील. त्याच बरोबर नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व नव्या स्मार्ट सिटी उभारणीवर लक्ष केंद्रित करणार आहे. हे विमानतळ पूर्ण झाल्यावर आजूबाजूला एक नवीन व्यापारी आणि तंत्रज्ञान केंद्र विकसित केले जाणार आहे.

ही नवी शहरे मुंबईच्या तुलनेत तीनपट मोठी असतील आणि उद्योगांसाठी उत्तम संधी उपलब्ध करतील, असेही त्यांनी सांगितले. तसेच नदीजोड प्रकल्पामुळे विदर्भ आणि मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त भागांना कायमस्वरूपी पाणीपुरवठा करण्यासाठी वैनगंगा-नळगंगा आणि गोदावरी जलप्रकल्प हाती घेतले जात आहेत. या प्रकल्पांमुळे हजारो शेतक-यांना फायदा होईल आणि शेती उत्पादन वाढणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.



२००० ते २०१४ दरम्यान महाराष्ट्रात तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात गुंतवणूक कमी झाल्यामुळे अनेक आयटी कंपन्या बंगळुरू आणि हैदराबादकडे वळल्या. मात्र, अटल सेतूसारख्या प्रकल्पांमुळे नवी मुंबई आता एक नवे तंत्रज्ञान केंद्र बनत आहे.

— **देवेंद्र फडणवीस,** मुख्यमंत्री

### सायबर सुरक्षा केंद्र

● राज्यातील सायबर सुरक्षा उपाययोजना संदर्भात उत्तर देताना फडणवीस म्हणाले की, आज जगभरातील गुन्हेगारी सायबर जगतात शिफ्ट होत आहे. भविष्यात ७०% गुन्हे हे सायबर गुन्हे असतील. त्यामुळे आम्ही नवी मुंबईत भारतातील सर्वात आधुनिक सायबर सुरक्षा केंद्र उभारले आहे. सर्व बँका, सोशल मीडिया प्लॅटफॉर्म यांना या यंत्रणेशी जोडले असल्याने आता कोणत्याही आर्थिक फसवणुकीवर तत्काळ कारवाई केली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## At a Glance

### गुंतवणूकदार हादरले; व्यापक घसरण



**मुंबई :** व्यापक स्वरुपाच्या ट्रेड वॉरची भीती आणि अमेरिकेच्या मंदावलेल्या अर्थव्यवस्थेने गुंतवणूकदारांना हादरवून सोडले आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफबाबतच्या रोजच्या नव्या वक्तव्याचे तीव्र पडसादही आशियाईसह भारतीय शेअर बाजारात उमटत आहेत. यामुळे सेन्सेक्स २८ फेब्रुवारी रोजी तब्बल १,४१४ अंकांनी घसरून ७३,१९८ वर बंद झाला. तर निफ्टी ५० निर्देशांक ४२० अंकांच्या घसरणीसह २२,१२४ वर बंद झाला. सेन्सेक्स आणि निफ्टीची आजची घसरण अनुक्रमे १.९० टक्के आणि १.८ टक्के एवढी होती. सर्व १३ प्रमुख क्षेत्रीय निर्देशांक लाल रंगात बंद झाले. सर्वाधिक फटका निफ्टी आयटीला बसला. निफ्टी आयटी निर्देशांक ४.१ टक्के घसरून बंद झाला. बीएसई मिडकॅप २.१ टक्के आणि स्मॉलकॅप २.३ टक्के घसरला. २८ फेब्रुवारीच्या बाजारातील मोठ्या घसरणीमुळे बीएसई सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल ८.८२ लाख कोटींनी कमी झाले. त्याचबसोबत निफ्टी ५० निर्देशांक १९९६ नंतर पहिल्यांदाच सलग पाचव्या महिन्यांत घसरणीसह बंद झाला आहे. जागतिक कमकुवत संकेत, आणि ट्रेड वॉरच्या धास्तीने बाजारात आज चौफेर विक्रीचा मारा दिसून आला.

# भाजपच्या नव्या अध्यक्षांची लवकरच घोषणा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** भारतीय जनता पक्षाच्या नव्या राष्ट्रीय अध्यक्षाची घोषणा लवकरच होण्याची शक्यता आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, येत्या दोन आठवड्यांत ही घोषणा होऊ शकते. १२ राज्यांमध्ये संघटनात्मक निवडणुका पूर्ण झाल्या असून १५ मार्चपूर्वी भाजपच्या अध्यक्षांच्या नावाची घोषणा होऊ शकते, असे मानले जात आहे.

भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षनिवडीसाठी ५० टक्के राज्यांमध्ये पक्षाच्या संघटनात्मक निवडणुका पूर्ण होणे आवश्यक आहे. त्यापूर्वी बूथ, मंडळ आणि जिल्हास्तरीय निवडणुका आहेत. सध्या ३६ पैकी १२ राज्यांच्या निवडणुका पूर्ण झाल्या आहेत. म्हणजेच आणखी किमान सहा राज्यांमध्ये युनिट प्रमुखांच्या निवडणुका होणे आवश्यक आहे. ही प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करण्याचा पक्षाचा प्रयत्न आहे. विशेषत: तामिळनाडू, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, आसाम आणि गुजरात सारख्या पुढील वर्षी ज्या राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. बिहारमध्ये या वर्षाच्या अखेरीस निवडणुका होणार आहेत, त्यामुळे तेथे कोणताही बदल होणार नाही.

या पदासाठी संभाव्य नावांची यादी राज्य प्रभारींकडून मागविण्यात आली आहे. या विषयावर चर्चा आणि अटकळ बांधली जात असली तरी भाजपची धक्कादायक रणनीती पाहता नाव निश्चित करणे घाईचे ठरेल. अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. नवीन अध्यक्ष राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वैचारिक संलग्नतेसह पक्षाच्या सर्व घटकांना मान्य असावा, असे सर्वसाधारणपणे मानले जाते. त्याला संघटनात्मक मूल्यांची सखोल जाण असणे आवश्यक आहे. उत्तर प्रदेशात लोकसभा निवडणुकीत झालेल्या पराभवामुळे जातीय समतोल, भाषिक वाद, सीमारेषा आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे उत्तर प्रदेशात पक्षाचा पाया मजबूत करणे या मुद्द्यांवरही पक्ष लक्ष केंद्रित करेल.

### २०१९ मध्ये स्वीकारली होती जबाबदारी

● जेपी नड्डा यांनी २०१९ मध्ये पक्षाचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून जबाबदारी स्वीकारली होती. जानेवारी २०२० मध्ये त्यांची एकमताने भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाली आणि विद्यमान गृहमंत्री अमित शहा यांच्याकडून त्यांनी ही जबाबदारी स्वीकारली. त्यांचा कार्यकाळ लोकसभा निवडणूक २०२४ पर्यंत वाढवण्यात आला असून सरकारमध्ये सहभागी झाल्यानंतर पक्ष आपल्या नव्या अध्यक्षपदासाठी संभाव्य उमेदवारांचा विचार करत आहे. मात्र, पक्षाच्या नेत्यांकडून या विषयावर एकमत होण्याचा प्रयत्न सुरू असल्याने ही प्रक्रिया संथ गतीने सुरू आहे. विशेषत: काही राज्यांमध्ये जिथे अध्यक्षपदावरून मतभेद आहेत, अशा राज्यपातळीवरही ही प्रक्रिया सोपी राहिलेली नाही.

# पत्नीच्या छळाला कंटाळून 'टीसीएस' मॅनेजरची आत्महत्या

**मुंबई :** उत्तर प्रदेशातील आग्रा येथे एका टीसीएस मॅनेजरने पत्नीच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली. हे प्रकरण अतुल सुभाष सारखेच असल्याचे म्हटले जात आहे. अतुलप्रमाणेच, मानव शर्मानेही त्याच्या पत्नी आणि सासरच्या लोकांनी छळ केल्याचा आरोप केला. दरम्यान, आता त्याची पत्नी निकिता शर्माने स्पष्टीकरण दिले आहे. पत्नी निकिता यांनी सर्व आरोप फेटाळून लावले. निकिता यांच्या दाव्यामुळे आता हे प्रकरण वेगळे वळण घेत आहे.

मानव यांची पत्नी निकिता शर्मा यांनी आपल्या प्रत्युत्तरात म्हटले की, मानवने यापूर्वी तीनदा गळफास घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. एकदा मी स्वत: फास कापून त्याला वाचवले. त्याला वाचवल्यानंतर, मी २३ फेब्रुवारी रोजी त्याला आग्र्याला आणले. तो स्वत: आनंदाने मला घरी सोडला. पुरुषांचे कोणी ऐकत नाही असे म्हणणे चुकीचे आहे.

पत्नी निकिता यांनी सांगितले की, माझ्यावर लावलेले सर्व आरोप खोटे आहेत. माझ्यामुळे तो आत्महत्या करत असल्याचा आरोप त्याने केला आहे. पण त्या सर्व गोष्टी माझा भूतकाळ होत्या. त्या सर्व गोष्टी लग्नाआधी घडल्या होत्या.

दरम्यान आता टीएसच्या मॅनेजर मानव यांच्या वडिलांची प्रतिक्रिया समोर आली आहे. मानव यांचे वडील म्हणाले, त्यांचा मुलगा पत्नीच्या छळामुळे त्रस्त होता. निकिताचे अनेक बॉयफ्रेंड होते. लग्नापासून निकिताचा आमच्याबद्दलचा दृष्टिकोन बरोबर नव्हता. जेव्हा ती मानवला भेटण्यासाठी मुंबईला गेली तेव्हा तिथेही त्यांच्यात भांडणे सुरू झाली. ती मानवला सांगायची की मला तुझ्याशी लग्न करायला भाग पाडले आहे. मला तू आवडत नाहीस. माझे प्रेम दुसरेच कोणीतरी आहे.

# महाराष्ट्र एक्सेलन्स अवॉर्डने डॉ. बागवे सन्मानित


■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**मुंबई :** बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज इथे झालेल्या 'मी उद्योजक होणारचं' कार्यक्रमात हावरे बिल्डर्सचे डॉ. सुरेश हावरे यांच्या हस्ते अर्थसंकेतचे संस्थापक डॉ. अमित बागवे यांचा महाराष्ट्र एक्सेलन्स अवॉर्डने सत्कार करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाला महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे, आमदार श्री. प्रसाद लाड व अभिनेता संतोष जुवेकर यांची विशेष उपस्थिती लाभली. मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला महाराष्ट्रातून १,००० हुन अधिक उद्योजक उपस्थित होते.

मराठी माणूस हा विविध क्षेत्रात आघाडीवर असून उद्योग क्षेत्रात देखील तो अग्रेसर आहे. एरवी इतर ठिकाणी आयोजित करण्यात येणारा हा सोहळा यंदा बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज मध्ये आयोजित करण्यात आला, यावरुनच मराठी माणसाची झेप आपल्याला दिसून येते. मराठी उद्योगाची पाटी दुकानावर लावून भागणार नाही तर त्यामागे व्यवसाय करणारा उद्योजक देखील मराठी असायला हवा. मराठी उद्योजक वाढावे यासाठी मराठी माणसाने मराठी माणसाच्या पाठीशी ठामपणे उभे राहायला हवे, अशी अपेक्षा यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केली. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या उद्योजकांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

बॉम्बे स्टॉक एक्स्चेंजच्या व्यासपीठावरून बोलताना अमित बागवे यांनी सहज आणि ओघवत्या भाषेत उद्योजकांना मार्गदर्शन केले. २०१६ साली अर्थसंकेतने पहिल्यांदा बॉम्बे स्टॉक एक्स्चेंजमध्ये मराठी उद्योजकांसाठी कार्यक्रम केल्याचे व १००० उद्योजकांना बॉम्बे स्टॉक एक्स्चेंजमध्ये आणण्याचा अभिमान असल्याचे त्यांनी सांगितले.



राष्ट्र संचार छायाचित्र सेवा

## स्टारलिंकचे प्रक्षेपण...

**फ्लोरिडा:** फ्लोरिडातील केप कॅनावेरल येथून प्रक्षेपित झाल्यानंतर सेबॅस्टियन इनलेटवरून स्टारलिंक उपग्रह वाहून नेणारे स्पेसएक्स फाल्कन रॉकेट छायाचित्रात दिसून येते.

## पान १ वरून

### आरोपी दत्ता गाडेच्या मुसक्या आवळल्या

'शिवशाही' बसमध्ये एका तरुणीवर बलात्कार केल्याचा प्रकार उघडकीस आला होता, या घटनेने संपूर्ण राज्यात खळबळ उडाली होती. हा प्रकार घडल्यानंतर गाडे हा शिरूर तालुक्यातील गुणाट या त्याच्या गावी गेला होता, पोलीसांनी तपासामध्ये सीसी टीव्ही कॅमेर्याची तपासणी केली होती, त्यामध्ये सराईत गुन्हेगार असलेल्या गाडे यानेच हे विकृत कृत्य केल्याचे निष्पन्न झाले होते. त्यामुळे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या आदेशानुसार तपासासाठी तब्बल तेरा पथके तैनात केली होती, त्याशिवाय त्याची माहिती देणार्यास एक लाख रुपयांचे बक्षिस जाहीर करण्यात आले होते.

पोलीसांची काही पथके बुधवारपासून गुणाट या त्याच्या गावी ठाण मांडून बसले होते, त्यामुळे या गावाला पोलीस छावणीचे स्वरूप आले होते. गाडे हा ऊसाच्या शेतात लपून बसला असल्याची प्राथमिक माहिती पोलीसांना मिळाली होती, त्यामुळे त्याच्या तपासासाठी 'ड्रोन' आणि 'डॉग स्क्वॉड' ची मदत घेतली होती. विशेष म्हणजे राज्यात एखाद्या गुन्ह्यात ड्रोनची मदत घेण्याचा हा पहिलाच प्रकार होता, पोलीस मागावर असल्याचे समजताच गाडे हा गावाच्या एका बाजूला असलेल्या एका कॅनॉलमध्ये लपून बसला होता. शुक्रवारी पहाटे एक वाजण्याच्या सुमारास तो भूक आणि तहानेने व्याकूळ झाला होता, त्यामुळे तो जवळच असलेल्या एका घरात पाणी मागण्यासाठी गेला होता. त्यावेळी तेथे असलेल्या वृध्देने त्याला ओळखले आणि तातडीने पोलीसांशी संपर्क साधून ही माहिती दिली, त्यानंतर पोलीसांनी स्थानिक रहिवाशी असलेल्या प्रा. गणेश गव्हाणे याच्या आणि ' डॉग स्क्वॉड'च्या मदतीने त्याचा माग काढून त्याच्या मुसक्या आवळल्या.

### आरोपी पतीचा जामीन अर्ज फेटाळला

व्यवस्थापक व चेअरमन यांचे जबाबानुसार सदर अर्जावर निकिता शेट्टी यांनी सही केलेली नाही. याउपर अक्सिस बँकेकडून निकिता शेट्टी यांच्या सहीचा नमुना पडताळणी घेतलेला अर्ज ही खोटा असल्याचे तपासात आढळून आले आहे. अक्सिस बँकेच्या कर्मचारी यांचेकडे केलेल्या तपासात हे पुढे आले आहे की सदर अर्जावर वापरण्यात आलेला अक्सिस बँकेचा शिक्का देखील खोटा तयार करण्यात आलेला आहे व त्यावर असलेली बँक अधिकाऱ्याची सही देखील बोगस आहे. तसेच सर्व आरोपी हे संगनमताने काम करत असून याचा तपास होणे गरजेचे आहे.

आरोपी विश्वजित याने तो कर्जाचे हप्ते भरण्यास तयार असल्याचे नमूद केले मात्र खोट्या सह्या, खोटे शिक्के वापरून कर्ज घेतलेले आहे, हप्ते भरल्याने गुन्हा झाकोळला जाणार नाही असे स्पष्ट मत न्यायमूर्ती दिघे यांनी नोंदवत गुन्ह्याकामी त्यांचा पोलीस कोठडीत तपास होणे आवश्यक असल्याने सर्व आरोपींचे अटकपूर्व जामीन अर्ज नामंजूर केले. सर्व आरोपींच्यावतीने २ आठवड्यांची मुदत मागून सदरचा आदेश स्थगित करण्याची विनंती केली मात्र गुन्ह्याचे गंभीर स्वरूप लक्षात घेऊन न्यायालयाने ही विनंती धुडकावून लावली. सदर प्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेच्या एपीआय अर्चना गायकवाड, सरकारी वकील रंजना हुमने तर मूळ फिर्यादी यांचे वतीने अॅड. निखिल मालाणी व अॅड. हर्षद साठे यांनी काम पाहिले.

### भाषा आणि भूमीसाठी...

भारतीयांनी करायचे तरी कायंयासा सवाल तामिळनाडूचे मुख्यमंत्री एमके स्टॅलिन यांनी विचारला आहे. आपल्या ७२ व्या वाढदिवसाच्या पूर्वसंध्येला यासंदर्भातला एक व्हिडीओ त्यांनी सोशल मीडियावर शेअर केला आहे. आपले राज्य वाचवण्यासाठी लोकांनी एकत्र येण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. स्टॅलिन यांनी त्यांच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांना आवाहन केले आणि म्हणाले की, केंद्राकडून होत असलेले भाषचे आक्रमण आणि सीमांकनाबाबतचा संदेश तुम्हाला सर्व लोकांपर्यंत पोहोचवावा लागेल, जेणेकरून राज्यातील प्रत्येक नागरिक राज्य वाचवण्यासाठी एकत्र येऊ शकेल. द्रमुक हा अन्याय स्वीकारणार नाही आणि त्याविरुद्ध आवाज उठवेल. संसदीय जागा लोकसंख्येच्या आधारावर निश्चित केल्या जाऊ नयेत. लोकसंख्या नियंत्रणासाठी दक्षिणेकडील राज्यांना दंड आकारला जाऊ नये. आपण शपथ घेतली पाहिजे की आपण तामिळनाडूच्या कल्याणाशी आणि भविष्याशी तडजोड करणार नाही.

### बालकांच्या आरोग्य तपासणीची...

चंद्रकांत (दादा) पाटील, मंत्री उच्च व तंत्रशिक्षण, दत्तात्रय भरणे, मंत्री, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औ. का.फ., माधुरी मिसाळ, राज्य मंत्री, नगरविकास वैद्यकीय शिक्षण, या स्थानिक लोकप्रतिनिधींना कार्यक्रमासाठी निमंत्रित करण्यात आले आहे.
पुण्यातील इंदिरा गांधी मॉडेल स्कूल, औंध येथे या मोहिमेचा राज्यस्तरीय शुभारंभ होणार आहे. राज्यातील ० ते १८ वर्षापर्यंतच्या बालके तसेच किशोरवयीन मुला-मुलींच्या सर्वांगीण आरोग्य तपासणीसाठी सार्वजनिक आरोग्य विभाग, एकात्मिक बाल विकास विभाग, शिक्षण विभाग,आदिवासी विभाग,नगर विकास विभाग यांच्या समन्वयाने मोहीम राज्य स्तरावर राबविण्याचे निश्चित करण्यात आले आहे. या मोहिमेचे उद्घाटन तालुका, जिल्हा तसेच राज्य स्तरावर करण्यात येणार आहे.

### कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा!

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेने आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी ८.२५% व्याजदर निश्चित केला आहे. केंद्रीय विश्वस्त मंडळाच्या २८ फेब्रुवारीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. यापूर्वी मोदी सरकारने २०२२ वर्षात व्याजदरात मोठी कपात केली होती. ७ कोटींहून अधिक सदस्यांसाठी २०२१-२२ साठी व्याजदर ८.५% वरून ८.१% करण्यात आला होता. सीएनबीसीच्या अहवालानुसार, ईपीएफओची सर्वोच्च निर्णय घेणारी संस्था सेंट्रल बोर्ड ऑफ ट्रस्टीने शुक्रवारी झालेल्या बैठकीत २०२४-२५ साठी ईपीएफओवर ८.२५% व्याजदर देण्याचा निर्णय घेतला आहे. **व्याजदराचा दिलासा :** २०२०-२१ साठी ईपीएफवर ८.१% व्याज दर १९७७-७८ नंतर सर्वात कमी होता, जेव्हा ईपीएफ व्याजदर ८% होता. मार्च २०२० मध्ये, ईपीएफओने भविष्य निर्वाह निधी ठेवींवरील व्याज दर २०१८-१९ साठी प्रदान केलेल्या ८.६५% च्या तुलनेत २०१९-२० साठी ८.५% या ७ वर्षांच्या नीचांकावर आणला होता.

### दिल्लीच्या आरोग्यसेवांबाबत धक्कादायक खुलासे

**नवी दिल्ली :** दिल्लीच्या आरोग्य सेवांबाबत नियंत्रक आणि महालेखा परीक्षक (कॅग) च्या अहवालात अनेक धक्कादायक खुलासे समोर आले आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, कॅगच्या अहवालात गेल्या ६ वर्षांच्या कालावधीत दिल्लीच्या सार्वजनिक आरोग्य सेवा व्यवस्थेतील गंभीर गैरव्यवस्थापन, आर्थिक निष्काळजीपणा आणि जबाबदारीचा अभाव उघडकीस आला आहे.

## पान १ वरून

### मुख्यमंत्री कार्यालयावर...

घेत आहे. ही धमकी व्हॉट्सअॅप मेसेजद्वारे देण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, व्हॉट्सअॅपवरून मेसेज करणाऱ्या व्यक्तीचे नाव शहाबाज हुमायून राजा देव असे असल्याचे सांगितले जात आहे. एका पाकिस्तानी नंबरवरून ट्रॅफिक पोलिसांना व्हॉट्सअॅपवर हा धमकीचा मेसेज आला होता. बुधवारी दुपारच्या सुमारास हा मेसेज आला होता. या प्रकरणी पोलीस यंत्रणा अलर्ट झाला असून धमकीचा मेसेज पाठवणाऱ्या व्यक्तीचा शोध घेतला जात आहे.

### फडणवीसांच्या कृती...

सर्वांना विभागवार महाराष्ट्र पिंजून काढण्याचे आदेश दिले आहेत. तसेच तीन महिन्यात अहवाल सादर करण्याचे आदेशही दिले आहेत. पक्षसंघटनावाढीसाठी शरद पवार पक्षाचा नवा अजेंडा राबवताना दिसत आहे. पवार यांनी पदाधिका-यांना नव्या उमेदीनं कामाला लागा, असे आदेशही दिले आहेत.


## जाहीर निविदा

फिनिश सोसायटीद्वारे, शिरूर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा व अंगणवाडी मध्ये संरक्षण भिंत बांधकाम, नवीन शौचालय बांधकाम, शौचालय दुरुस्ती ,शाळा दुरुस्ती, अंगणवाडी दुरुस्ती, सांडपाणी प्रक्रिया युनिट इत्यादी कामाकरिता रजिस्टर्ड कंत्राटदाराकडून निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा जमा करण्याची तारीख १७/०१/२०२५ ते १९/०१/२०२५ असेल. इच्छुक कंत्राटदारांनी १०००/- फी देऊन निविदाची कागदपत्रे घेण्यासाठी खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा. सर्व निविदा बंद लिफाफ्यामध्ये खालील पत्त्यावर जमा कराव्यात. निविदा रद्द करण्याचा व निविदा प्रक्रिया थांबविण्याचा पूर्ण अधिकार संस्थेकडे राहील.

पत्ता:- फिनिश सोसायटी, आपले घर, फ्लॅट नंबर 106/A2 करंजावणे रोड, रांजणगाव गणपती, ता. शिरूर, पुणे. पिन कोड – ४१२२२० मो: ९९२२७५१६१७

## PUBLIC NOTICE

Known all men by this present that my client **i.e. Mr. Pranit Sharad Bhisade** desirous to purchase the **Flat No. 204 (As per Completion Certificate Unit No. 10)** on **Second Floor** in **Wing No. A admeasuring area 127 sq. mtrs.** equivalent to **1367 Sq.ft built-up area (together with the open sit-out adm. 16.82 sq. mtrs. appurtenant thereto)** together with the exclusive right of user of the **Car Parking Space bearing No. PP-1** situate under the **Stilts** of the **said Building "A"** and further together with an undivided 02.58% right, title, and interest in or common areas and facilities of the said Complex known as **'NYATI HERMITAGE'**, constructed on **Sub-Plot No. 1, 2, and 3 and 4** respectively out of the private layout of **Plot No.4** out of the sanctioned layout in respect of the land bearing **S.No.7+8** situate, lying and being at **Village Bavdhan Khurd** from **Mrs. Vandana Amol Karode and Mr. Amol Waman Karode**.
**Original Agreement to Sale bearing Sr. No. 2941/2000 dated 21/06/2000 alongwith its Registration Receipt & Index II - Mulshi (Paud) and Deed of Apartment bearing Sr. No. 5117/2004 dated 07/09/2004 alongwith its Registration Receipt & Index II- Mulshi (Paud** ) are lost or misplaced.
If any person is possessed the said page/document he may return the said document to the undersigned or if any person having any right, interest, title by way of sale, gift, charge, loan, exchange, etc. shall inform & raise their objection and satisfy me along with documentary evidence within **10 days** from the date of publication of this notice. Thereafter my client will presume that interested party waive rights and complete the transaction of the said property.

**Pune**
**Date: - 01/03/2025**

MRS. SUCHITA A. SHAH
ADV. & NOTARY, GOVT. OF INDIA
Office No. 403 A, Mangalmurti Complex, S. No. 309,
Final Plot No. 37A, T P Scheme No. 1, CTS No. 990, Shukrawar Peth, Pune- 411 002.
Contact no:- 9822633383 Mail Id : suchita.amol.shah@gmail.com


## आयएमडीचा इशारा; दिल्लीत मोडला ७४ वर्षांचा विक्रम

# मार्चमध्ये विक्रमी @४० अंश तापमान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** भारतीय हवामान खात्याच्या (आयएमडी) दोन अधिकाऱ्यांनी पुढील महिन्यात म्हणजेच मार्चमध्ये असामान्य आणि विक्रमी उष्णतेचा इशारा दिला आहे. पुढील महिन्यात देशाच्या अनेक भागात पारा ४० अंश सेल्सिअसच्या पुढे जाऊ शकतो, जो या महिन्यासाठी असामान्य आहे. म्हणजेच यावर्षी पुढचा महिना विलक्षण उष्ण असणार आहे.

मार्चमध्ये कमाल तापमानात वाढ झाल्याने गव्हाच्या पिकाचे मोठे नुकसान होऊ शकते, असा इशाराही हवामान अधिकाऱ्यांनी दिला आहे. दीर्घकाळ तापमान सरासरीपेक्षा जास्त राहिल्यास मार्चमध्ये गहू पिकाच्या उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे. भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा गव्हाचा उत्पादक देश असला तरी गव्हाचे उत्पादन गेल्या तीन वर्षांपासून म्हणजे २०२२ पासून घटत आहे. त्यामुळे गव्हाची महागडी आयात टाळण्यासाठी भारताला २०२५ मध्ये बंपर पीक येण्याची अपेक्षा आहे.

तापमानातील वाढ २०२२ च्या पॅटर्नची आठवण करून देते, जेव्हा फेब्रुवारी आणि मार्चमध्ये अचानक उष्णतेमुळे गव्हाच्या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते, ज्यामुळे देशात गव्हाचे दर वाढू नयेत म्हणून गव्हाच्या निर्यातीवर बंदी घालावी लागली होती. गव्हाच्या उत्पादनासाठी प्रसिद्ध असलेल्या उत्तर आणि मध्य भारतातील तापमानात मार्चच्या मध्यापर्यंत सरासरीपेक्षा सहा अंश सेल्सिअसने वाढ होण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

दरम्यान, राष्ट्रीय राजधानी दिल्लीतील तापमानाने गुरुवारी ७४ वर्षांचा विक्रम मोडीत काढत फेब्रुवारीतील आतापर्यंतच्या सर्वात उष्ण रात्रीची नोंद केली आहे. सफदरजंगमधील किमान तापमान गुरुवारी १९.५ अंश सेल्सिअसवर पोहोचले, जे १९५१ ते २०२५ या कालावधीतील या महिन्यातील सर्वाधिक तापमान आहे. यापूर्वीच्या नोंदीनुसार २५ फेब्रुवारी २०१५ रोजी फेब्रुवारीचे सर्वोच्च किमान तापमान १९ अंश सेल्सिअस होते, जे रेकॉर्डवरील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वोच्च तापमान होते.

#रा

# बर्फवृष्टीमुळे जनजीवन विस्कळीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



## उत्तराखंडमध्ये हिमस्खलनात ४१ अडकले

**नवी दिल्ली :** उत्तराखंडमध्ये हिमस्खलनात ४१ मजूर जिवंत गाडले गेले, जम्मूत दोन जणांचा मृत्यू झाला आणि उत्तर भारतातील काही भागात शुक्रवारी जोरदार बर्फवृष्टी आणि पावसामुळे मुख्य रस्ते तुटले. हिमाचल प्रदेशच्या उंच भागात पुन्हा हिमस्खलनाचा धोका निर्माण झाला आहे. जम्मू आणि हिमाचल प्रदेशात शुक्रवारी तिसऱ्या दिवशीही पावसाने हजेरी लावल्याने अनेक जिल्ह्यांतील शाळा बंद ठेवण्यात आल्या आहेत.

उत्तराखंडच्या चमोली जिल्ह्यातील माना या उंचावरील सीमावर्ती गावाजवळ झालेल्या हिमस्खलनाखाली बीआरओचे ४१ कर्मचारी अडकले आहेत. हिमस्खलनामुळे सुरुवातीला ५७ जण गाडले गेले होते, पण १६ जणांना वाचवण्यात यश आले. हिमस्खलनामुळे माना आणि बद्रीनाथ दरम्यान बीआरओ कॅम्प गाडला गेला, अशी माहिती चमोलीचे जिल्हाधिकारी संदीप तिवारी यांनी दिली. बद्रीनाथपासून तीन किलोमीटर अंतरावर असलेले माना हे भारत-तिबेट सीमेवरील ३२०० मीटर उंचीचे शेवटचे गाव आहे. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ) आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दलाची (एसडीआरएफ) पथके बर्फवृष्टी आणि पावसाच्या पार्श्वभूमीवर घटनास्थळी रवाना झाली आहेत. त्याचवेळी, जम्मूतील उधमपूर जिल्ह्यातील मौंगरी जवळ टेकडीवरून दगड कोसळून एका महिलेचा आणि तिच्या मुलाचा मृत्यू झाला.

कठुआ जिल्ह्यातील राजबाग परिसरातील उझ नदीतून पोलिस आणि एसडीआरएफच्या संयुक्त पथकाने शुक्रवारी पहाटे अकरा मजुरांची सुटका केली. बांधकाम स्थळाला लागून असलेल्या शेडमध्ये ते राहत होते आणि पाणवठ्याला सूज आल्याने त्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला होता, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. निकी तावी परिसरातील तावी नदीत गाडी बुडाल्यानंतर पोलिस आणि एसडीआरएफच्या जवानांनी डंपरचालकाची सुटका केली. उंचावरील भागात मध्यम ते जोरदार बर्फवृष्टी झाल्याने विविध रस्ते बंद करण्यात आले.

रामसू आणि काझीगुंड दरम्यान बर्फ साचल्याने आणि नाशरी ते बनिहाल दरम्यान विविध ठिकाणी दगडफेक, भूस्खलन आणि दरड कोसळल्यामुळे गुरुवारी सायंकाळी सातच्या सुमारास बंद करण्यात आलेला जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्ग ही बंद ठेवण्यात आला आहे. रात्रभर झालेल्या बर्फवृष्टीमुळे काश्मीरमधील रेल्वे, हवाई आणि रस्ते दळणवळणावर परिणाम झाला आहे.

### २०० रस्ते बंद झाले

● राज्यभरात झालेल्या मुसळधार बर्फवृष्टीमुळे सुमारे २०० रस्ते बंद करण्यात आले असून कुल्लू, लाहौल आणि स्पीती, किन्नौर, चंबा आणि शिमला जिल्ह्यांतील अनेक भागांचा राज्याच्या इतर भागांशी संपर्क तुटला आहे. आदिवासी भाग आणि राज्यातील २३०० मीटरपेक्षा जास्त उंचीच्या भागात हिमस्खलनाचा इशारा देण्यात आला असून लोकांना घराबाहेर फिरण्यावर निर्बंध घालण्याचा सल्ला देण्यात आला आहे. चंबा आणि मनालीमध्ये कॉलेजांसह सर्व शैक्षणिक संस्था बंद ठेवण्यात आल्या आहेत. मात्र, सीबीएसई बोर्डाच्या परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसारच होणार आहेत.

चमोली जिल्ह्यातील माना गावाजवळ बीआरओकडून सुरू असलेल्या रस्ते बांधकामादरम्यान हिमस्खलन झाले. यात अनेक कामगार अडकल्याची दुःखद माहिती मिळाली. आयटीबीपी, बीआरओ आणि इतर बचाव पथकांकडून मदत आणि बचावकार्य सुरू आहे. सर्व कामगार बांधवांच्या सुरक्षेसाठी मी भगवान बद्री विशालकडे प्रार्थना करतो. **-पुष्करसिंह धामी,** मुख्यमंत्री, उत्तराखंड

## शिक्षक मतदारसंघ निवडणुकीत ९२ टक्के मतदान



**अमरावती :** उत्तर आंध्र प्रदेशातील शिक्षक मतदारसंघासाठी होणाऱ्या द्वैवार्षिक एमएलसी निवडणुकीत गुरुवारी ९१.८ टक्के मतदान झाले तर अविभाजित पूर्व आणि पश्चिम गोदावरी तसेच कृष्णा आणि गुंटूर जिल्ह्यांसाठी दोन एमएलसी पदवीधर निवडणुकांमध्ये अनुक्रमे ६३.२ टक्के आणि ६५.५ टक्के मतदान झाले. विधान परिषदेच्या निवडणुका पूर्व गोदावरी, पश्चिम गोदावरी, कृष्णा आणि गुंटूर या अविभाजित जिल्ह्यांमधील दोन पदवीधर मतदारसंघांसाठी तसेच आंध्र प्रदेशातील श्रीकाकुलम, विजयनगरम आणि विशाखापट्टणममधील एका शिक्षक मतदारसंघासाठी घेण्यात आल्या. सकाळी ८ वाजता मतदान सुरू झाले आणि दुपारी ४ वाजता संपले. मुख्यमंत्री एन चंद्राबाबू नायडू आणि आयटी मंत्री नारा लोकेश यांनी गुंटूर जिल्ह्यातील उंडावल्ली येथील स्थानिक शाळेत मतदान केले.

## संभल दंगल प्रकरणी समितीच्या सदस्यांनी जबाब नोंदवले



**संभल (उत्तर प्रदेश) :** गेल्या वर्षी २४ नोव्हेंबर रोजी संभळ येथील शाही जामा मशिदीत झालेल्या सर्वेक्षणादरम्यान झालेल्या दंगलींची चौकशी करण्यासाठी उत्तर प्रदेश सरकारने नियुक्त केलेल्या न्यायिक आयोगाच्या सदस्यांनी शुक्रवारी या घटनेसंदर्भात स्थानिक लोकांचे जबाब नोंदवले. स्थानिक अधिकाऱ्यांनी सांगितले की, उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश देवेंद्र अरोरा, माजी पोलिस महासंचालक (डीजीपी) अरविंद कुमार जैन आणि उत्तर प्रदेशाचे माजी अतिरिक्त मुख्य सचिव अमित मोहन प्रसाद यांचा समावेश असलेल्या या आयोगाला चंदौसी रोडवरील पीडब्ल्यूडी गेस्ट हाऊसमध्ये जबाब नोंदवण्यासाठी तैनात करण्यात आले आहे. दंगलींमध्ये चार जणांचा मृत्यू आणि पोलिसांसह अनेक जण जखमी झाल्यानंतर आयोगाची स्थापना करण्यात आली.

## पत्नीची हत्या करणाऱ्या पतीला अटक



**बेंगळुरू :** शहराच्या बाहेरील भागात पत्नीची हत्या केल्याबद्दल आणि नैसर्गिक मृत्यू दाखवून ते लपविण्याचा प्रयत्न केल्याबद्दल एका ५१ वर्षीय पुरूषाला अटक करण्यात आली, असे पोलिसांनी गुरुवारी सांगितले. तिच्या अंत्यसंस्काराच्या काही मिनिटांपूर्वी पोलिसांना मृत्यूच्या कारणाबद्दल संशय निर्माण करणारा एक निनावी फोन आला, त्यानंतर त्याला अटक करण्यात आली, असे त्यांनी सांगितले. ही घटना २३ फेब्रुवारी रोजी दोड्डाबल्लापुरा ग्रामीण पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडली, असे पोलिसांनी सांगितले.

## मशिदीत स्फोट किमान ५ जणांचा मृत्यू

**पेशावर :** खैबर पख्तूनख्वा प्रांतातील नौशेरा जिल्ह्यातील अकोरा खट्टक येथील मदरसा-ए-हक्कानिया येथे शुक्रवारच्या नमाज दरम्यान झालेल्या शक्तिशाली स्फोटात किमान पाच जणांचा मृत्यू झाला आणि २० जण जखमी झाले, असे पोलिसांनी सांगितले. खैबर पख्तूनख्वाचे मुख्य सचिव शहाब अली शाह यांनी मदरशाचे काळजीवाहक आणि जमियत उलेमा इस्लाम (सामी ग्रुप) चे प्रमुख हमीदुल हक हक्कानी यांच्या स्फोटात मृत्यूची पुष्टी केली. खैबर पख्तूनख्वाचे आयजीपी झुल्फिकार हमीद म्हणाले की, हा स्फोट आत्मघातकी बॉम्बस्फोट असल्याचा संशय आहे आणि हमीदुल हक हे लक्ष्य असल्याचे दिसून येत आहे. "आम्ही हमीदुल हक यांना सहा सुरक्षा रक्षक पुरवले होते," असे ते म्हणाले

## काठमांडूमध्ये भूकंपाचा जोरदार धक्का



**काठमांडू :** शुक्रवारी पहाटे शेजारच्या सिंधुपालचौक जिल्ह्यात झालेल्या तीव्र भूकंपात काठमांडू आणि इतर ठिकाणी किमान चार जण जखमी झाले. राष्ट्रीय भूकंप देखरेख आणि संशोधन केंद्राच्या म्हणण्यानुसार, पहाटे २.५१ वाजता ६.१ तीव्रतेचा भूकंपाचा धक्का जाणवला आणि त्याचे केंद्रबिंदू काठमांडूपासून ६५ किमी पूर्वेला असलेल्या सिंधुपालचौक जिल्ह्यातील भैरबकुंडा येथे होते. भूकंपाच्या धक्क्यानंतर सिंधुपालचौक जिल्ह्यातील काही घरांना भेगा पडल्या. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, काठमांडू खोऱ्याव्यतिरिक्त, दक्षिण आणि पूर्व नेपाळमधील लोकांनाही भूकंपाचे धक्के जाणवले.

# यमुनेच्या स्वच्छतेसाठी मास्टर प्लॅन

## दिल्लीमधील नवनिर्वाचित भाजप सरकारची तयारी

दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या वेळी भारतीय जनता पक्षाने यमुना नदी स्वच्छ आणि स्वच्छ करण्याचे आश्वासन दिले होते. निवडणुकीतील नेत्रदीपक विजयानंतर आता यमुनेच्या स्वच्छतेची जबाबदारी नव्या भाजप सरकारवर आली आहे. खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीयाबाबत वचनबद्धता व्यक्त केली आहे. आता एक चांगली बातमी समोर येत आहे की, दिल्लीतील यमुना नदी स्वच्छ करण्यासाठी केंद्र सरकारने 'यमुना मास्टर प्लॅन' तयार केला आहे. तो लवकरच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येणार आहे.



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** माध्यमांनी याबाबतची माहिती दिली आहे. यमुनेची स्वच्छता हा भाजप आणि 'आप'साठी निवडणुकीचा मोठा मुद्दा होता. गेल्या आठवड्यात दिल्लीचे नायब राज्यपाल व्ही. के. सक्सेना यांच्या आदेशानुसार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवडणूक आश्वासनानुसार दिल्लीतील यमुनेच्या स्वच्छतेची प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, 'यमुना मास्टर प्लॅन'साठी जलशक्ती मंत्रालयाकडून तज्ज्ञांचा सल्ला घेण्यात आला आहे. या तज्ज्ञांनी गुजरातमधील साबरमती नदीच्या काठावर रिव्हरफ्रंट तयार केला होता. याशिवाय मंत्रालयाकडून काही बैठकाही घेण्यात आल्या.

यमुना स्वच्छता प्रकल्पाचे चार प्रमुख घटक आहेत. कचरा व गाळ काढणे, प्रमुख नाल्यांची स्वच्छता, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांची काटेकोर देखरेख व त्याचा विस्तार.

दिल्लीच्या चौथ्या महिला मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतल्यानंतर रेखा गुप्ता यांनी आपल्या कॅबिनेट मंत्र्यांसह वासुदेव घाटावर यमुना आरती केली. दिल्ली भाजपने शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये मुख्यमंत्र्यांव्यतिरिक्त दिल्ली भाजपचे प्रभारी बैजयंत जय पांडा, प्रवेश वर्मा, आशिष सूद, मनजिंदर सिंह सिरसा आणि कपिल मिश्रा हे मंत्री आरती करताना दिसत आहेत.

यमुनेतील प्रदूषणाच्या वाढत्या पातळीवरून दोन्ही गटांमध्ये शाब्दिक चकमक उडाली. दिल्लीचा पाणीपुरवठा अडवून भाजपशासित हरयाणा यमुनेत विष मिसळत असल्याचा आरोप 'आप'चे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी केला. मात्र, हरयाणाने याचा जोरदार इन्कार केला आहे.

दरम्यान, दिल्लीची बदललेली परिस्थिती पाहता योजनांची अधिक चांगल्या प्रकारे अंमलबजावणी होण्याची शक्यता असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी स्पष्ट केले. यात यमुनेच्या स्वच्छतेचाही समावेश आहे. न्यायमूर्ती बी. आर. गवई आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या खंडपीठाने 'प्रदूषित नद्यांची सुधारणा' या खटल्याच्या सुनावणीदरम्यान हे निरीक्षण नोंदवले.

# चेंगराचेंगरीप्रकरणी याचिका फेटाळली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर १५ फेब्रुवारी रोजी झालेल्या चेंगराचेंगरीसंदर्भातील याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. रेल्वे प्रशासन मृतांचा नेमका आकडा लपवत असल्याचा दावा याचिकाकर्ते आनंद लीगल एड फोरम ट्रस्टने केला होता. या चेंगराचेंगरीत १८ जणांचा मृत्यू झाल्याची अधिकृत माहिती आहे. मात्र, या चेंगराचेंगरीत सुमारे २०० जणांचा मृत्यू झाल्याचे याचिकाकर्त्याने प्रत्यक्षदर्शींच्या हवाल्याने सांगितले. त्यावर न्यायालयाने राज्य सरकार या प्रकरणाकडे पूर्णपणे दुर्लक्ष करत असल्याचा दावा याचिकाकर्ते करत आहेत का, अशी विचारणा केली. 'ज्यांना याचा फटका बसला आहे, त्यांनी न्यायालयात धाव घ्यावी,' अशी टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाने केली. याचिकाकर्त्याचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर न्यायालयाने याचिका फेटाळून लावली.

रेल्वे स्थानकावरील चेंगराचेंगरी प्रकरणाची सुनावणी दिल्ली उच्च न्यायालयातही झाली आहे. प्लॅटफॉर्म तिकिटांची विक्री आणि प्रवाशांच्या मर्यादेशी संबंधित तरतुदींचा विचार करण्याचे आदेशही न्यायालयाने रेल्वेला दिले आहेत. याचिकेत उपस्थित करण्यात आलेल्या मुद्द्यांचा रेल्वे बोर्डात उच्च स्तरावर आढावा घेण्यात यावा, असे न्यायालयाने म्हटले आहे. सॉलिसिटर जनरल तुषार मेहता म्हणाले की, हे प्रकरण प्रतिकूल पद्धतीने घेण्यात आलेले नाही. रेल्वे कायद्याचे पालन करण्यास बांधील आहे.

प्रयागराज महाकुंभाच्या दुसऱ्या दिवशी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव रेल्वे कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यासाठी दाखल झाल्या होत्या. महाकुंभात १३ हजार गाड्यांचे नियोजन करण्यात आले होते, मात्र १६ हजारांहून अधिक गाड्या चालवण्यात आल्या. वैष्णव यांनी उत्तर मध्य रेल्वे (एनसीआर), ईशान्य रेल्वे (एनईआर) आणि उत्तर रेल्वे अंतर्गत येणाऱ्या विविध स्थानकांना भेट दिली आणि जमीनी स्तरावरील कामकाजाचा आढावा घेतला. प्रयागराज दौऱ्यादरम्यान रेल्वेमंत्र्यांनी या मेगा इव्हेंटमध्ये भाविकांच्या गर्दी व्यवस्थापनात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या प्रत्येक रेल्वे कर्मचाऱ्याची भेट घेतली आणि त्यांच्या कामाचे कौतुक केले.

# उद्धव ठाकरेंच्या तोंडी औरंगजेबाचा जप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** उद्धव ठाकरे हे सभेत दाखवण्यापूरती हातात रुद्राक्षाची माळ घेतात, त्यांच्या तोंडात कायम औरंगजेबाचा जप सुरू असतो, असा आरोप करत मंत्री आशिष शेलार यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला आहे. आशिष शेलार यांनी उद्धव ठाकरे यांना हिंदुत्ववादी ढोंगी, असे देखावे करीत असल्याची टीका शेलार यांनी केली आहे.

या संदर्भात भारतीय जनता पक्षाचे मंत्री आशिष शेलार यांनी एका पोस्टच्या माध्यमातून उद्धव ठाकरे यांच्यावर हिंदुत्व वादाच्या मुद्द्यावरून जोरदार निशाणा साधला.

आयोध्येत प्रभू रामाचे भव्य मंदिर उभे राहिले. महाराष्ट्रातील ढोंगी हिंदुत्ववादी सोडले तर जगभरातील कोट्यावधी लोकांनी तेथे दर्शन घेऊन आले असल्याचे शेलार यांनी म्हटले आहे. इतकेच नाही तर आमच्या छत्रपती संभाजी महाराजांवरील छावा सिनेमाला मात्र महाराष्ट्रातील ढोंगी हिंदुत्ववादी सोडले तर जगभरातील कोट्यावधी लोकांनी तो पाहिला असल्याचे शेलार यांनी म्हटले आहे.



अर्जेंटिना

**जोरदार निदर्शने :** अर्जेंटिनाच्या ब्यूनस आयर्स येथे अर्जेंटिनाचे राष्ट्राध्यक्ष जेवियर मिलेई यांच्या धोरणांविरुद्ध जोरदार निदर्शने करण्यात आली.

# पुढील महिन्यात आणखी एक अमृत भारत ट्रेन




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारतीय रेल्वेने प्रवाशांसाठी एक आनंदाची बातमी दिली आहे. चेन्नईस्थित इंटिग्रल कोच फॅक्टरी (आयसीएफ) पुढील महिन्यात आणखी एक अमृत भारत ट्रेन देणार आहे. ही नवी ट्रेन सध्याच्या अमृत भारत ट्रेनसेटचे आधुनिक रूप असेल. रेल्वे मंत्रालयाने पुढील दोन वर्षांत ५० अमृत भारत २.० गाड्यांच्या निर्मितीचे उद्दिष्ट ठेवले आहे. या दिशेने वेगाने काम सुरू आहे. अल्प उत्पन्न आणि मध्यम उत्पन्न गटातील कुटुंबांना डोळ्यासमोर ठेवून अमृत भारत ट्रेनची रचना करण्यात आली आहे. अमृत भारत २.० ही लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी परवडणारी सेवा पुरवते. तसेच यामध्ये मिळणाऱ्या सुविधांमुळे प्रवासी चांगलेच प्रभावित झाले आहेत.

अमृत भारत ट्रेन २०२३ मध्ये सुरू करण्यात आली होती. यात लांब पल्ल्याचा प्रवास सहज पार केला जातो. यात दोन प्रकारचे डबे असतात. पहिला स्लीपर क्लास आहे, जो राखीव प्रवाशांसाठी आहे. दुसरा जनरल क्लास आहे, जो अनारक्षित प्रवाशांसाठी आहे. रेल्वेच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, आयसीएफ अमृत भारत ट्रेनसेटच्या तिसऱ्या रॅकचे उत्पादन आणि वितरण मार्चमध्ये पूर्ण करेल. तिसऱ्या अमृत भारत रॅकच्या पॅन्ट्री कारचे आयसीएफच्या फर्निशिंग विभागात वायरिंग आणि फिटमेंटचे काम सुरू आहे. येत्या १५-२० दिवसांत या रॅकची डिलिव्हरी होऊ शकते.

अमृत भारत ट्रेन २.० मध्ये २२ कोच-रेक फॉर्मेशन आहेत, ज्याच्या दोन्ही टोकाला लोकोमोटिव्ह आहेत. अमृत भारत ट्रेन २.० पुश-पुल तंत्रज्ञानाने तयार करण्यात आली आहे, जी कार्यक्षम प्रवासासाठी आहे. या गाडीचा वेग ताशी १३० किमी असेल. ट्रेनमध्ये पुश-पुल ऑपरेशनसाठी कंट्रोल कपलर असतील आणि उच्च त्वरणासाठी दोन्ही टोकांवर लोकोमोटिव्ह असतील. शॉक फ्री प्रवास आणि सहज कनेक्शनसाठी या ट्रेनमध्ये सेमी ऑटोमॅटिक कपलर्स असतील.



पिंपरी तालुका शिरूर येथील महाशिवरात्री यात्रेनिमित्त आयोजित बैलगाडा शर्यतीतील चित्त थरारक क्षण

## महाशिवरात्रीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

**रांजणगाव गणपती :** महाशिवरात्रीचे औचित्य साधून रांजणगाव परिसरातील विविध गावांमध्ये महाशिवरात्री निमित्त विविध धार्मिक, सांस्कृतिक, व परंपरागत कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पिंपरी दुमाला येथे अखंड हरिनाम सप्ताह, भव्य किर्तन सोहळा व बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले होते. या मध्ये फायनल मध्ये आलेले बैलगाडा मालक व सेकंद पुढील प्रमाणे ज्ञानेश्वर धोंडीबा पवार - ११.४५ सेकंद, रावसाहेब दशरथ वारे- ११.७५, पिराजी निवृत्ती आव्हाळे, मेजर बाळासाहेब गोपाळा दंडवते -११.८१ सेकंद, शिवन्या रविंद्र भुजबळ पंडीत दल्लाभर्थ धुमाळ जुगलबंदी -११.९१, साहेबराव सीताराम नाणेकर- ११.१४ सेकंद असे फायनलचे गाडे विजेते झाले. यात्रा यशस्वी करण्यासाठी पिंपरी दुमाला ग्रामपंचायत, सोमेश्वर देवस्थान ट्रस्ट व गावातील विविध संस्थांचे आजी माजी पदाधिकारी व ग्रामस्थ यांचे मोलाचे योगदान लाभले. कारेगाव येथे कारेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने महिलांना दर्शनासाठी विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या तर तर वाघाळे जीर्णोद्धार समितीच्या वतीने धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्याचप्रमाणे कोंढापुरी, सोनेसांगवी, ढोकसांगवी येथेही महाशिवरात्री अतिशय उत्साहात व भक्तीमय वातावरणात पार पडली.

## मुखई आश्रमशाळेत मराठी भाषा गौरवदिन साजरा



**शिक्रापूर :** मुखई ता. शिरुर येथील कै. रामराव गेणूजी पलांडे माध्यमिक आश्रमशाळा व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरवदिन निमित्ताचे विविध कार्यक्रमाचे आयोजन करत मोठ्या उत्साहामध्ये मराठी भाषा गौरवदिन साजरा करण्यात आला. मुखई येथील कै. रामराव गेणूजी पलांडे माध्यमिक आश्रमशाळा व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये मराठी भाषा गौरवदिन निमित्ताचे प्राचार्य तुकाराम शिरसाट तसेच सर्व शिक्षकांच्या हस्ते कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विविध कार्यक्रमांमध्ये काव्यवाचन, व्याख्यानमाला, मराठी भाषेतील गीत, भजन, अभंग, पोवाडा गायन, पोवाडा सादरीकरण, रांगोळी स्पर्धा यांसह मराठी भाषेतील विविध पारंपरिक गीतांचा नृत्य विद्यार्थ्यांनी सादर केले, सदर सुत्रसंचालन किशोर गोगावले यांनी केले तर प्रस्ताविक रघुनाथ दातीर यांनी केले आणि रूपसिंग मल्लाव यांनी आभार मानले.

## कपडे धुवायला गेलेली महिला बेपत्ता

**शिक्रापूर :** जातेगाव बुद्रुक येथे ओढ्यावर कपडे धुण्यासाठी गेलेली महिला अचानकपणे बेपत्ता झाल्याची घटना घडली असल्याने बेपत्ता महिलेच्या पतीने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे खबर दिल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. जातेगाव बुद्रुक येथील पल्लवी गायकवाड ही महिला दुपारच्या सुमारास गावातील ओढ्यावर कपडे धुण्यासाठी गेली होती, सायंकाळ पर्यंत पल्लवी घरी न आल्याने तिच्या पतीसह नातेवाईकांनी तिचा ओढ्यासह अन्य ठिकाणी शोध घेतला असता, ओढ्यावर धुण्यासाठी नेलेले कपडे व बादली मिळून आली. मात्र, पल्लवी कोठेही मिळून आली नाही. याबाबत महिलेचे पती आकाश चिंतामण गायकवाड (२८, रा. जातेगाव बुद्रुक ता. शिरुर) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे खबर दिली आहे. बेपत्ता महिलेबाबत कोणासही काही माहिती असल्यास शिक्रापूर पोलिसांशी संपर्क करण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## देशमुख, कुडपने यांच्या पेंटिंगचा सन्मान



**पुणे :** आंध्र प्रदेशाच्या हैद्राबाद आर्ट सोसायटीच्या राष्ट्रीय प्रदर्शन सोहळ्यात महाराष्ट्र राज्यातील पुणे येथील नामवंत चित्रकार अनिकेत देशमुख आणि सुरेंद्र कुडपणे पाटील यांना मानांकन मिळाले असून, २०२५ चे पुरस्कार राज्यपाल जिष्णू देववर्मा यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. यावेळी हैद्राबाद संस्थांनाचे नववे नवाब उपस्तिथ होते. सुरेंद्र कुडापणे पाटील देशाच्या विविध प्रदर्शना मध्ये आमंत्रित आर्टिस्ट असून वीसहुन अधिक राष्ट्रीय पुरस्काराचे सन्मान त्यांना प्राप्त आहेत. सिनेसृष्टीतून ही उल्लेखनीय कामगिरी दर्शविली असून जहांगीर आर्टसह देश विदेशातून त्यांनी विशेष कामगिरी दर्शवली आहे, तर अनिकेत देशमुख हे गेली वीस वर्ष गेमिंग (माहिती तंत्रज्ञान) कंपनीतून काम पाहत आहेत.

# आळंदीत मराठी भाषा गौरव दिन उत्साहात

## माऊली मंदिरात उद्या 'ओळख श्री ज्ञानेश्वरीची' पुस्तक प्रकाशन सोहळा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**आळंदी :** श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमेटी व ओळख श्री ज्ञानेश्वरी परिवार यांच्याकडून शालेय विध्यार्थी यांच्या मूल्य संवर्धनासाठी ओळख श्री ज्ञानेश्वरीची व परिचय भागवत धर्माचा ओळख ज्ञानेश्वरीची या दोन पुस्तकांचा प्रकाशन सोहळा रविवारी ( दि. २) सकाळी दहा वाजता उद्योग व मराठी भाषा मंत्री ना. उदयजी सामंत यांचे हस्ते माऊली मंदिरात होणार आहे, अशी माहिती ओळख श्री ज्ञानेश्वरी परिवाराचे वतीने श्री ज्ञानेश्वर महाराज चरित्र समितीचे अध्यक्ष प्रकाश काळे यांनी दिली.

ओळख श्री ज्ञानेश्वरी परिवाराचे वतीने मराठी भाषा गौरव दिनाचे आयोजन करण्यात आले होते. मराठी भाषा गौरव दिना निमित्त श्री ज्ञानेश्वर महाराज प्रतिमा पूजन, श्री ज्ञानेश्वरी, हरिपाठ पूजन, दीप प्रज्वलन उपस्थित मान्यवरांचे हस्ते हरिपाठ वाटप करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन व ओळख श्री ज्ञानेश्वरी एक परिवाराचे वतीने आयोजित पुस्तक प्रकाशन सोहळ्याची माहिती देताना काळे बोलत होते. अध्यक्षस्थानी श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे माजी व्यवस्थापक श्रीधर सरनाईक होते. या प्रसंगी ओळख श्री ज्ञानेश्वरी परिवारातील अर्जुन मेदनकर, विश्वम्भर पाटील, विलास वाघमारे, बापू गोरे, ज्ञानेश्वर घुंडरे, रोहिदास कदम, धनाजी काळे,प्रकाश भागवत, कैलास आव्हाळे आदी उपस्थित होते.

प्रकाशन सोहळ्याची माहिती देताना काळे म्हणाले, श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी व ओळख श्री ज्ञानेश्वरी परीवार यांच्या संयुक्त विद्यमान ओळख श्री ज्ञानेश्वरी पुस्तकाचे प्रकाशन रविवारी ( दि. २ ) सकाळी १० वाजता श्री ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिरात होत आहे. पुस्तकाचे प्रकाशन उद्योग व मराठी भाषा मंत्री ना. उदयजी सामंत यांच्या हस्ते होणार आहे.

या वेळी श्री ज्ञानेश्वरी महाराज संस्थान कमिटीचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजन नाथसाहेब, विश्वस्त अॅड. राजेंद्र उमाप, पालखी सोहळा प्रमुख व विश्वस्त, भावार्थ देखणे, ह.भ.प. शांतीब्रह्म मारुती बाबा कुरेकर महाराज, ह.भ.प. डॉ. नारायण म. जाधव, आळंदी देवस्थानचे माजी विश्वस्त डॉ. अभय टिळक आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या प्रकाशन सोहळ्यांत ओळख श्री ज्ञानेश्वरी या पुस्तकाचे लेखक ह.भ.प. सुभाष म. गेठे, ह.भ.प. वासुदेव म.शेवाळे, ह.भ.प. भागवत म. साळुंके, तसेच पुस्तक निर्मीती सेवा कार्यातील मान्यवरांचा देखील सत्कार करण्यात येणार आहे. या प्रकाशन सोहळ्यास ओळख श्री ज्ञानेश्वरी या उपक्रमात सर्व संस्था प्रमुख, प्राचार्य, मुख्याध्यापक, संस्था पदाधिकारी, अध्यापक, शिक्षक, ग्रामस्थ, ज्ञानेश्वर महाराज यांच्या संत साहित्यावर प्रेम करणारे, वारकरी, भाविक उपस्थित रहाणार असल्याचे ओळख श्री ज्ञानेश्वरी परिवारातर्फे प्रकाश काळे यांनी सांगितले. मराठी भाषा दिना निमित्त मराठी भाषेचे महत्त्व प्रकाश काळे यांनी माऊलींचे श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरीतील ओव्यांचा संदर्भ देत विशद करून मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून २ मार्च रोजी आळंदी माऊली मंदिरात होत असलेल्या प्रकाशन सोहळ्यास भाविक, नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन केले.

ओळख श्री ज्ञानेश्वरीची हा शालेय मुलांसाठी मूल्य संवर्धनाचा, संस्कारक्षम मुले घडावीत यासाठी सुरु असलेला उपक्रम ७५ शाळांत सुरु असून हा उपक्रम सर्वदूर जावा यासाठी यात सर्व शाळांनी सहभागी व्हावे असे आवाहन त्यांनी केले. यावेळी श्रीधर सरनाईक यांनी मनोगत व्यक्त केले. आभार अर्जुन मेदनकर यांनी मानले. पसायदानाने मराठी भाषा गौरव दिनाची सांगता झाली.

# सकाळी थंडी, तर दिवसभर कडक ऊन



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** तालुक्यात उन्हाळ्याची तीव्रता दिवसेंदिवस वाढू लागली आहे. सकाळपासूनच उन्हामुळे नागरिक हैराण होत आहेत. सकाळी थंडी आणि दिवसभर ऊन अशा दुहेरी ऋतूंचा सामना बळीराजाला करावा लागत आहे. थंडावा देणारी फळे, रसवंतिगृह, थंडपेय, आईस्क्रीम पार्लरची दुकाने राज्य मार्गावर दिसू लागली आहेत. ग्राहकही ते खरेदी करण्यासाठी गर्दी करताना दिसत आहेत.

शहर आणि ग्रामीण भागात थंडीचा प्रभाव कमी - अधिक होत आहे. चालू वर्षी उन्हाची तीव्रता अधिक असणार आहे. फेब्रुवारी ते मे दरम्यान नागरिकांना चार महिने असह्य उन्हाचा चटका सहन करावा लागणार आहे. गेल्या वर्षी झालेल्या समाधानकारक पावसामुळे बारामती तालुक्यात फारशी पाणीटंचाई जाणवणार नसल्याचे सकारात्मक चित्र आहे.

निरा नदीत समाधानकारक पाणीसाठा आहे. याशिवाय निरा डाव्या कालव्याचे आवर्तन सुरू आहे, त्यामुळे शेतीचा पाणी प्रश्न मार्गी लागला आहे. पिण्यासह शेतीच्या पाण्याचा प्रश्न फारसा सतावणार नसला तरीही शेतकऱ्यांना उन्हाचा तीव्र चटका सहन करावा लागणार आहे.

संरक्षण व्हावे यासाठी विविध उपाययोजना केल्या जात आहेत. घरातील आणि कार्यालयातील पंखे, कुलर,एसी सुरू राहात आहेत. थंडावा देणाऱ्या फळांची मागणी वाढली आहे. बाजारात कलिंगड, टरबूज आदी फळांची मागणी वाढली आहे. राज्य मार्गावरील वाहतूक दुपारच्या सत्रात कमी प्रमाणात सुरू आहे. त्यामुळे रस्ते ओस पडू लागले आहेत. मार्च, एप्रिल, मे अशी तीन महिने उन्हाची तीव्रता राहणार असून या दरम्यान नागरिकांना आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे.

## विद्या प्रतिष्ठानमध्ये मराठी भाषा गौरव दिन उत्साहात



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** विद्या प्रतिष्ठानच्या कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने 'मराठी भाषा गौरव दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास पुणे विमानतळ येथील संगठन प्रधान प्रशासकीय अधिकारी आणि महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी तानाजी देवकाते प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भरत शिंदे होते.

आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी मराठी भाषेचे महत्त्व विशद करत विद्यार्थ्यांना मातृभाषेचा अभिमान बाळगण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख डॉ. आनंदा गांगुर्डे यांनी केले, तर प्रमुख अतिथींचा परिचय डॉ. श्रीराम गडकर यांनी करून दिला. यावेळी प्राचार्य डॉ. भरत शिंदे यांच्या हस्ते प्रमुख अतिथींचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमात विद्यार्थी अभय खरात याने काव्यवाचन केले. तसेच सोनाली शिंदे, अंजली ढोबळे, प्रतीक्षा काकडे आणि अश्विनी गायकवाड या तृतीय वर्ष कला शाखेतील विद्यार्थिनींनी 'संविधान उद्देशिके'चे वाचन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमृता मोहिते हिने केले, तर आभार प्रा. शिवाजी टकले यांनी मानले.

# क्षुल्लक कारणावरून गज व कोयत्याने हल्ला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

## दोघे जखमी, १४ जणांवर गुन्हा दाखल

**इंदापूर :** इंदापूर तालुक्यातील हिंगणगाव येथे अत्यंत क्षुल्लक कारणावरुन तरुणांच्या टोळक्याने दोघा भावांना कोयता, लोखंडी गज व बॅटने अमानुष मारहाण केल्याची घटना मंगळवार दि. २५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सव्वासहा वाजण्याच्या सुमारास घडली. या हल्ल्यात दोघे बंधू जखमी झाले असून १४ जणांवर इंदापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असल्याची माहिती इंदापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सूर्यकांत कोकणे यांनी दिली.

प्रशांत मोहन आरडे (वय २३ वर्षे, रा. हिंगणगाव) यांच्या फिर्यादी वरून स्वप्निल जगताप, निखिल बगाडे, स्वप्निल बगाडे, स्वयंम, समीर वाघमारे, प्रज्वल वाघमारे, रोहन भोसले, दीपक जगताप, प्रेम रणदिवे, अक्षय बापु आरडे, सूरज आरडे, धीरज पिंगळे, धीरज निरवणे, योगेश जाधव, सुमित जगताप (सर्व जण रा. हिंगणगाव, ता. इंदापूर) अशी आरोपींची नावे आहेत. घरी कार्यक्रम आहे हे माहित असताना फिर्यादीचा मोठा भाऊ ओंकार आरडे हा गाडीने धुळ उडवत गेला, तुम्हाला लई माज आला आहे या क्षुल्लक कारणावरुन आरोपीनी फिर्यादी व त्याच्या कुटुंबियांना शिवीगाळ करुन, त्यांना मारहाण करण्याच्या हेतूने कोयता, लोखंडी गज, बॅट घेवून त्यांच्या अंगावर चालून गेले. आरडे कुटुंबांनी जीव वाचवण्यासाठी शेजारच्यांच्या घराचा आसरा घेतला. मात्र जबरदस्तीने त्या घराचे दार उघडून आरोपींनी फिर्यादी, त्याचा धाकटा भाऊ सुशांतवर हल्ला चढवत अमानुष मारहाण केली. त्याना वाचवण्याचा प्रयत्न करणा-या महिलांना देखील मारहाण करण्यात आली, बोलेरो गाडीतून कोयते, गज, बॅट काढण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले.

## कारेगावात अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कारेगाव :** कारेगाव, ता. शिरुर येथे महाशिवरात्रीनिमित्त आयोजित तिसऱ्या अखंड हरिनाम सप्ताहाची नुकतीच उत्साहात सांगता झाली. येथील ग्रामदैवत श्री कारेश्वर महाराजांच्या प्रांगणात झालेल्या या सप्ताह काळात शिवलिलामृत पारायण सोहळा यानिमित्ताने गाथा पारायण झाले. ग्रंथराज पारायणासाठी ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज जाधव व ह.भ.प.विजुताई गटणे यांनी व्यासपीठ चालक म्हणून काम पाहिले.

कारेश्वर सेवा ट्रस्ट व कारेगाव ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या या सप्ताह काळात गणेश महाराज भगत (पुणे), माऊली महाराज रासकर (रामलिंग), नवनाथ महाराज माशेरे (आमदाबाद), संतोष महाराज कौठाळे (देवदैठण), सुरेश महाराज गावडे (पिंपरी कोलंदर), आळंदी देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त भावार्थ महाराज देखणे (कारेगाव), उद्धव महाराज चोले (पंढरपूर) आणि समाधान महाराज शर्मा (बीड) यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता झाली. पहाटे ४ ते ६ काकडा भजन, सकाळी ७ ते ११ ज्ञानेश्वरी पारायण, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, रात्री ७ ते ९ किर्तन तर रात्री १० वाजता हरिजागर कार्यक्रम झाले.गुरुवारी, दि.२७ रोजी प्रसिद्ध किर्तनकार ह.भ.प.समाधान महाराज शर्मा (बीड) यांच्या काल्याच्या कीर्तनाने अखंड सप्ताहाची भक्तिमय वातावरणात आणि मोठया उत्साहात सांगता झाली. काल्याच्या कीर्तनानंतर सर्व ग्रामस्थांसाठी युवा उद्योजक शुभम नवले व मयूर कोहकडे यांच्या वतीने महाप्रसाद देण्यात आल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली.



शिरूर भिर्रर भिर्रर झाली...: श्री क्षेत्र जुने शिरुर, ता.शिरुर येथे श्री रामलिंग महाराजांच्या यात्रेनिमित्त बैलगाडा शर्यतीतील एक चित्तथराक क्षण.

छायाचित्र - पोपट पाचंगे, कारेगाव.

# सोमेश्वरमधील 'त्या' कर्मचाऱ्यांचे निलंबन

## कारखाना प्रशासनाची फसवणूक, आर्थिक घोटाळा प्रकरण




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** सोमेश्वर सहकारी साखर कारखान्यामध्ये रोजंदारी तत्त्वावर काम करणाऱ्या कर्मचारी व कामगार यांचे हजेरी नोंदीमध्ये संगनमताने कारखाना प्रशासनाची फसवणूक करून आर्थिक घोटाळा केल्याप्रकरणी कारखान्याचे लेबर व टाइम ऑफिस विभागातील लेबर ऑफिसर, हेड टाइम कीपर, टाइम कीपर, सर्व लिपिक व कर्मचारी यांचे निलंबन करण्याचा निर्णय संचालक मंडळाने गुरुवारी पार पडलेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेमध्ये घेतला.

सोबतच या सर्वांविरोधात व लेबरपुरवठा करणाऱ्या कंत्राटदार यांच्यावर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करणार असल्याची माहिती सोमेश्वरचे अध्यक्ष पुरुषोत्तम जगताप यांनी दिली. जगताप यांनी दिलेल्या प्रसिद्धिपत्रकात म्हटले आहे की, सोमेश्वर कारखाना सर्वच क्षेत्रांमध्ये आघाडीवर असताना कारखान्याच्या कामकाजामध्ये चुकीचे काम करणाऱ्या कोणत्याच घटकाला पाठीशी घालू नये, अशी कारखान्याचे मार्गदर्शक उपमुख्यमंत्री अजित पवार यांची संचालक मंडळास वेळोवेळी सूचना असते. असे असताना जाणीवपूर्वक कारखान्याच्या प्रगतीमध्ये अडसर ठरेल व कारखान्याचे नुकसान होईल, असे काही अधिकारी आणि कामगार यांनी कृत्य केल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे या अधिकारी व कर्मचारी यांच्याविरोधात तत्काळ कारवाई करण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतला आहे. नियमानुसार कायदेशीर मुद्दे विचारात घेऊन या प्रकरणाची इंडस्ट्रियल व लेबर न्यायालयामध्ये काम पाहणाऱ्या तज्ज्ञ वकिलांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करून नियमाप्रमाणे सखोल तपास करण्याचा निर्णय देखील संचालक मंडळाने घेतलेला आहे.

# खरेदी-विक्री संघात फिफ्टी फिफ्टी?

## ९ संचालक बिनविरोध, ९ जागांसाठी १७ उमेदवार रिंगणात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** खेड आळंदी विधानसभा निवडणुकीत झालेल्या हार जितची पार्श्वभूमी असलेल्या आणि खेड तालुक्याच्या राजकारणाचा प्रमुख भाग असलेल्या खेड तालुका खरेदी विक्री संघाचे ९ संचालक बिनविरोध निवडून आले. तर उर्वरित ९ जागांसाठी १७ उमेदवार रिंगणात आहेत. सन १९४७ मध्ये स्थापना असलेल्या या संस्थेची बिनविरोध निवडणुकीची परंपरा यामुळे खंडित झाल्याची भावना जनसामान्यात आहे.

खेड तालुका सहकारी खरेदी विक्री संघाच्या संचालक मंडळातील १८ जागांसाठी ५३ उमेदवारांनी ५९ अर्ज दाखल केले होते. माघारीच्या अखेरच्या दिवशी गुरुवारी (दि २७) ३६ जणांनी माघार घेतली, तर बिनविरोध आणि लढणारे असे मिळुन २६ अर्ज कायम राहिले. प्रोसेसिंग व कांझ्यूमर्स प्रतिनिधी गटातून हिरामण सातकर, सोसायटी अ गटातल्या



खेड तालुका सहकारी खरेदी विक्री संघाच्या निवडणुकीबाबत माहिती देताना आमदार बाबाजी काळे, सभापती विजयसिंह शिंदे पाटील

आळंदी गटातून स्वामी येळवंडे, खेड गटातून खंडेराव थिगळे, वाडा गटातून अरूण सोमवंशी बिनविरोध निवडून आले आहेत. उर्वरित ५ गटात दिग्गज उमेदवारांमध्ये चुरशीची लढत होणार आहे. महिलाप्रवर्गातून तिन्हेवाडीच्या सरपंच प्रतीक्षा पाचारणे आणि पुजा कचाटे, अनुसूचित जाती जमाती मधुन कल्याणशील देखणे, इतर मागास प्रवर्ग मधुन दत्तात्रय सातपुते, सोसायटी बिगरशेती गटातून मुकुंद धायबर हे बिनविरोध निवडून आले. त्यांच्या समर्थकांनी जल्लोष करीत विजयाचा आनंद व्यक्त केला. आमदार बाबाजी काळे, संघाचे मावळते अध्यक्ष राजाराम लोखंडे, हिरामण सातकर, बाजार समितीचे सभापती विजयसिंह शिंदे पाटील, माजी सभापती कैलास लिंभोरे, कैलासराव सांडभोर, अमोल पवार,जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अनिल बाबा राक्षे, राजूशेठ जवळेकर, शांताराम भोसले , खंडेराव थिगळे, विनायक घुमटकर , संजय घनवट आदींनी निवडणुक बिनविरोध होण्यासाठी प्रयत्न केले. काही प्रमाणात प्रतिसाद मिळाला.मात्र ९ जागांसाठी निवडणुक होणार आहे. शुक्रवारी (दि. २८) चिन्ह वाटप होणार असून ९ मार्चला मतदान होणार आहे.

> खेड तालुक्याचे माजी आमदार स्व साहेबराव सातकर यांच्या नेतृत्वाखाली खेड तालुका खरेदी विक्री संघ स्थापन झाला. स्वातंत्र्य पुर्व काळात स्थापना असलेल्या संघाची निवडणुक बिनविरोध होण्याची परंपरा कायम राहिली. काही जागा बिनविरोध झाल्या. काही प्रभागात निवडणुक होत आहे. मात्र तरीही खेळीमेळीच्या वातावरणात ही प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. विधानसभा निवडणुकीचा आणि शेतकऱ्यांची संस्था असलेल्या खरेदी विक्री संघाच्या निवडणुकीचा अर्थाअर्थी कसलाही संबंध नाही.
>
> **— विजयसिंह शिंदे पाटील,**
> सभापती, खेड बाजार समिती

## ब्रम्हकुमारी प्रजापतीच्या वतीने सहस्त्र शिवलिंग दर्शन



**पुरंदर :** राज्यात सर्वत्र भक्तिमय वातावरणात महाशिवरात्र उत्सव साजरा झाला. खंडोबाच्या जेजुरीतही त्रिलोक दर्शन घेत येथील ब्रम्हकुमारी प्रजापतीच्या वतीने सहस्त्र शिवलिंग पिंडिंचे दर्शन शिव भक्तांना घडविले. जेजुरीची ग्रामदेवता श्रीजानाई देवी मंदिरापासून ब्रम्हकुमारी प्रजापती सेवेकऱ्यांनी विधिपूर्वक शिवलिंग दर्शन सोहळ्याचा प्रारंभ केला. स्थानिकांना सहज दर्शन घेता यावे, या दृष्टीकोनातून सहस्त्रदर्शन रथ सोहळा ग्रामप्रदक्षणा घेत जेजुरतील पुरातन लवथळेश्वर या पौराणिक शिवालयात सांगता करण्यात आली. विश्वातील सर्व मानवासह वन्यजीव अणुरेणूच्या सुखा करिता आणि विश्व शांतते करिता देवादेव महादेवाला सेवेकऱ्यांच्या वतीने प्रार्थना करण्यात आली. या संपूर्ण सोहळ्याचे नियोजन ब्रम्हकुमारी प्रजापती शाखा जेजुरीच्या नंदादीदी, ज्योतिदिदी चंद्रकांतभाई नलवडे, सीतारामभाई झगडे, उमेशभाई सोनवणे, भास्करभाई यादव, आत्मारामभाई सावंत, जगताप इत्यादीनी केले, तर स्वामीमय सेवा ट्रस्टने सहकार्य केले

## श्री गाडगे महाराज विद्यालयात मराठी राज्यभाषा दिन साजरा



**ओतूर :** गाडगे महाराज शिक्षक संकुलात मराठी राजभाषा गौरव दिनाचे औचित्य साधून माझी शाळा समृद्ध शाळा हा स्तुत्य उपक्रम सुरु झाला. मराठी राजभाषा गौरव दिन साजरा करण्यात आला असल्याची माहिती गाडगे महाराज विद्यालयाचे मुख्याध्यापक संपत माने यांनी दिली. मराठी भाषा ही समृद्ध असून, तिला अभिजात भाषेचा दर्जा प्रदान करण्यात आला आहे विष्णू वामन शिरवाडकर यांचा जन्मदिवस मराठी राजभाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्यात येतो. माझ्या माय मराठीचा किती गावा गोडवा, आपल्या पोरा बाळांना मराठीतून घडवा असे विचार मराठी विषय प्रमुख रामदास बगाड यांनी व्यक्त केले. यज्ञेश डुंबरे, संस्कृती डुकरे, मनस्वी वाघ,अनुष्का सोनवणे, आराध्या ठिकेकर, सायली तांबे या विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली. शालेय व्यवस्थापन समिती सदस्य नितीन पाटील, अरुण वाकचौरे, माध्यमिक आश्रम शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली डुंबरे, प्राथमिक आश्रम शाळेच्या मुख्याध्यापिका सुमन घाडगे, पर्यवेक्षक कैलास महाजन, सुनील पोकळे, निवृत्ती कुकडे, भानुदास ढोबळे, प्रकाश मोधे आदी यावेळी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शोभा तांबे यांनी केले, तर आभार तुषार पानसरे यांनी मांडले.

## मराठी भाषेचा प्रचार, प्रसार व संवर्धन करणे आद्य कर्तव्य



**उरुळी कांचन :** मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला असून तमाम भारतीयांसाठी ही निश्चितच अभिमानाची बाब आहे. यापुढे मराठी भाषेचा प्रचार, प्रसार व संवर्धन करणे हे प्रत्येक मराठी भाषिकाचे आद्य कर्तव्य असून आपण सर्वांनी ते प्रामाणिकपणे पार पाडायला हवे असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. शिवाजी बोऱ्हाडे यांनी केले. ते येथील महात्मा गांधी सर्वोदय संघ संचलित पद्मश्री मणिभाई देसाई महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन समारंभात अध्यक्ष स्थानावरून बोलत होते. यावेळी कला व मराठी विभागप्रमुख डॉ. समीर आबनावे, इंग्रजी विभागप्रमुख डॉ. निलेश शितोळे, इतिहास विभाग प्रमुख डॉ. अमोल बोत्रे, डॉ. अर्चना कुदळे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य धनंजय ठाकरे, प्रा. अनुप्रीता भोर, प्रा. शुभांगी रानवडे, प्रा. अंजली शिंदे , प्रा. रोहित बारवकर, प्रा. भाऊसाहेब तोरवे, प्रा. सारिका ढोणगे, प्रा. प्रियांका गोलांडे, प्रा. झेबा तांबोळी, प्रा. मनाली धिवार आदी प्राध्यापक व मराठी विभागाचे विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या कवी कुसुमाग्रज यांच्या साहित्यावरील व मराठी भाषा गौरव दिनानिमित्त भित्तीपत्रकाचे अनावरण प्राचार्यांच्या हस्ते केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. डॉ. अर्चना भुजबळ यांनी केले, तर आभारप्रदर्शन स्वाती शिंदे हिने केले.

# मराठी भाषा गौरव दिन उत्साहात



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** कवी कुसुमाग्रज यांच्या जयंती निमित्ताने साजरा होणारा मराठी भाषा गौरव दिन येथील संत नामदेव शाळेत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. महाराष्ट्र साहित्य परिषदेची सासवड शाखा आणि सासवड नगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमास पालिकेचे मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण, साहित्य परिषद अध्यक्ष अ‍ॅड दिलीप निरगुडे, शिक्षण मंडळाचे माजी सभापती यशवंत जगताप विशेष अतिथी म्हणून या वेळी उपस्थित होते. जेष्ठ साहित्यिक डॉ नारायण टाक, डॉ सुभाष तळेकर व कवी अनिल कदम यांची सुश्राव्य मनोगते कार्यक्रमाचे वैशिष्ट्य ठरले.

कुसुमाग्रजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून, दीप प्रज्वलन करत महाराष्ट्र गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष सतीश पाटील यांनी प्रास्ताविकात परिषद राबवत असलेल्या उपक्रमांची माहिती दिली.

मुख्याधिकारी डॉ चव्हाण व साहित्य परिषद अध्यक्ष अ‍ॅड दिलीप निरगुडे यांनी शुभेच्छा दिल्या. साहित्य परिषदेच्या वतीने शाळेला विशाखा काव्यसंग्रह आणि नटसम्राट हि पुस्तके यावेळी भेट देण्यांत आली. विद्यार्थ्यानी काढलेल्या चित्रांना दाद देत प्रमुख पाहुण्यांनी त्यांना पुस्तके भेट दिली. मुख्याध्यापिका अरुणा नवगिरे यांनी सर्वांचे स्वागत केले. विद्यार्थी आदर्श वाघमारे व युवराज राजपूत यांचा पोवाडा विद्यार्थ्यांची सामुहिक कविता तर रिंकिता केंगार हिचे मनोगत कार्यक्रमाच्या निमित्ताने समयोचीतठरले. हेमंत ताकवले यांनी सूत्रसंचालन केले, तर उपशिक्षक आनंद कदम यांनी आभार मानले.

अ‍ॅड आण्णासाहेब खाडे, अ‍ॅड कलाताई फडतरे, डॉ राजेश दळवी, कुंडलिक मेमाणे, मनोहर कामठे, शहाजी ताकवले, दत्ता भोंगळे, सुधीर गुरव, बाळासाहेब कुलकर्णी, संतोषआबा काकडे, केशव काकडे, मामा गिरमे, विलास पवार यांसह अनेक साहित्यप्रेमी या प्रसंगी उपस्थित होते. अरुणा नवगिरे, स्वप्नंजा दिक्षित, विनायक झडे, आनंद कदम या शिक्षकवृंदांनी कार्यक्रमाचे सुंदर आयोजन केले.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत महिला ठार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** खंडाळे माथा ता. शिरुर येथील पुणे अहिल्यानगर महामार्गालगत हॉटेल आशिर्वाद समोरून रेणुका शिंदे हि महिला रस्ता ओलांडत असताना, अहिल्यानगर बाजूने पुणेच्या दिशेने आलेल्या पांढऱ्या रंगाच्या इरटिका कारची रेणुका यांना धडक बसून त्या रस्त्यावर पडून गंभीर जखमी झाल्या. कार चालक कारसह भरधाव वेगाने पळून गेला. सदर अपघातात रेणुका सुनील शिंदे (२६, रा. खंडाळे माथा ता. शिरुर) ही महिला ठार झाली.

## यशोदा गावडे यांचे निधन



**जेजुरी :** जेजुरी शहरातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, माजी नगरसेवक संघटनेचे अध्यक्ष ,जेजुरी पालिकेचे माजी उपनगराध्यक्ष रमेश सर्जेराव गावडे यांच्या पत्नी यशोदा रमेश गावडे (६०) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे पती, दिर, दोन मुले, एक मुलगी, नातवंडे असा मोठा परिवार आहे. यशोदा गावडे यांच्यावर जेजुरी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सर्व राजकीय पक्ष, विविध संघटना व ग्रामस्थांच्या वतीने श्रद्धांजली वाहण्यात आली.

## मराठी भाषा दिनानिमित्त विविध उपक्रम साजरे


पारगाव कारखाना (ता.आबेगाव ) येथे दत्तात्रय गोविंदराव वळसे पाटील महाविद्यायात मराठी भाषा दिन निमित्त मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ.थोरात.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** पारगाव (ता. आंबेगाव) येथील भीमाशंकर शिक्षण संस्था संचलित, दत्तात्रय गोविंदराव वळसे पाटील महाविद्यालयात मराठी भाषा दिन हा विविध मार्गदर्शक व्याख्याने व ग्रंथ प्रदर्शन उपक्रम राबवून साजरा करण्यात आला. इंग्रजी भाषेबरोबरच मराठी भाषेला जागतिक स्तरावर स्थान आहे. दैनंदिन जीवनात मराठी शब्दांचा वापर करून मराठी भाषा जतन केली पाहिजे, असे प्रतिपादन प्रा. सुप्रिया तिवाटने यांनी व्यक्त केले. व्याख्यानमालेनंतर सर्व विद्यार्थ्यांसाठी ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यात मराठी साहित्यात गाजलेले सर्व साहित्य ठेवलेले होते. कार्यक्रमासाठी भीमाशंकर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष पाटील, उपाध्यक्ष अ‍ॅड. प्रदीप वळसे पाटील, सचिव चंद्रकांत ढगे, कार्यालयीन सचिव वसंत जाधव, विशेष कार्यकारी अधिकारी बीडी चव्हाण व सर्व सन्माननीय सदस्य पदाधिकारी यांनी मराठी भाषा दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यार्थी, प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रियांका वायाळ, प्रास्ताविक प्रा. सुप्रिया तिवाटने यांनी तर कार्यक्रमाचे आयोजन व आभार मराठी विभाग प्रमुख डॉ. विक्रम ओतारी यांनी मानले.

# विद्या प्रतिष्ठान महाविद्यालयाचा राज्यस्तरीय सन्मान

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करिअर कट्टा 2024-25 राज्यस्तरीय स्पर्धेत विद्या प्रतिष्ठानच्या कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाने अभूतपूर्व यश मिळवत तीन प्रतिष्ठित पुरस्कारांवर आपले नाव कोरले. महाविद्यालयाच्या या भव्य यशासाठी महाराष्ट्र राज्याचे उद्योग मंत्री मा. नामदार उदयजी सावंत यांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे सन्मान करण्यात आला.



महाविद्यालयातील विद्यार्थी कु. जयकुमार सावंत याने आपल्या व्यावसायिक कौशल्याचा ठसा उमटवत राज्यस्तरीय स्पर्धेत पहिला युवा उद्योग मंत्री पुरस्कार मिळवला. त्याने हॉटेल सावंतवाडा, बारामती या यशस्वी स्टार्टअपच्या माध्यमातून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

शानदार यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भरत शिंदे यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन करत भविष्यातही महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास उपक्रमांना नवी उंची गाठण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचा संकल्प व्यक्त केला. विद्या प्रतिष्ठान कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाचा हा बहुमान महाविद्यालयाच्या सातत्यपूर्ण उत्कृष्टतेचे प्रतीक आहे.

पुरस्कार सोहळ्यास महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. लालासाहेब काशीद प्रा. निलीमा पेंढारकर डॉ. जयश्री बागवडे डॉ सुनील ओगले डॉ. आनंदा गांगुर्डे डॉ. संजय खिलारे डॉ अलका घोडके डॉ राजेश शर्मा सुजाता पाटील डॉ कुलकर्णी, कांचन खिरे, विश्वास बाबर, नंदकुमार शितोळे, प्रशांत निंबाळकर जयकुमार सावंत व विद्यार्थी संसद सदस्य उपस्थित होते.

### महाविद्यालयाने पटकावलेले राज्यस्तरीय पुरस्कार

**स्टार्टअप साठी राज्यस्तरीय पुरस्कार :** विद्यार्थ्यांच्या नवकल्पनांना चालना देण्यासाठी महाविद्यालयाला ₹५०,००० चा धनादेश प्रदान करण्यात आला.

**उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार :** राज्यसेवा परीक्षेतील उल्लेखनीय निकाल आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी घेतलेल्या पुढाकारामुळे महाविद्यालयास ₹१,००,००० चा धनादेश आणि गौरवचिन्ह प्रदान. प्राचार्य डॉ. भरत शिंदे व डॉ. सुनील ओगले व करिअर कट्टा समिती सदस्यांच्या नेतृत्वाखाली हे दैदिप्यमान यश मिळाले.

**उत्कृष्ट राज्यस्तरीय जिल्हा समन्वयक पुरस्कार :** करिअर कट्टा अंतर्गत प्रभावी कार्य केल्याबद्दल डॉ. सुनील ओगले यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

**विद्यार्थ्यांचा उल्लेखनीय ठसा :** जयकुमार सावंत

# आंतरराष्ट्रीय परिषद ही शाश्वत विकासाची पाऊलवाट




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**उरुळी कांचन :** खेड्यांचा विकास हाच भारताचा खरा विकास आहे, असा गांधी विचार देणाऱ्या महात्मा गांधीजींच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या उरुळी कांचन भूमीत संपन्न होणारी शाश्वत विकासावरील आंतरराष्ट्रीय परिषद ही ग्रामीण भारताला चिरस्थायी विकासाकडे नेणारी पाऊलवाट ठरेल व त्यातून शाश्वत विकासाचे भारताचे स्वप्न साकार होण्यास मदतहोइल्होइल ठरेल असे प्रतिपादन द इस्लामिक रिपब्लिक ऑफ इराणचे व्हाईस कन्सुल अब्बास ताजिक यांनी केले. येथील पद्मश्री मणिभाई देसाई महाविद्यालयाने आयोजित केलेल्या 'सस्टेनेबल डेव्हलपमेंट : सोल्यूशन्स फॉर द फ्युचर' या विषयावरील बहुविद्याशाखीय आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महात्मा गांधी सर्वोदय संघाचे विश्वस्त संभाजी कांचन होते. यावेळी महात्मा गांधी सर्वोदय संघाचे सचिव सोपान कांचन, इराणचे बेहजाद पाघेह, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी बोऱ्हाडे, परिषद समन्वयक प्रा.नंदकिशोर मेटे आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना ताजिक म्हणाले की, महात्मा गांधींची ग्रामविकासाची संकल्पना मणिभाई देसाई यांनी शाश्वत विकासाशी जोडली, म्हणूनच या परिसराचा कृषी विकास जलद गतीने झाला.

सचिव सोपानराव कांचन यांनी आपल्या मार्गदर्शनात परिषदेत सहभागी झालेले सर्व परदेशी पाहुणे, विषयतज्ञ, संशोधक, प्राध्यापक यांचे महात्मा गांधी सर्वोदय संघाच्या वतीने स्वागत करून देशाचा कृषी विकास हाच शाश्वत विकासाचा कणा आहे असे मत व्यक्त केले. परिषदेसाठी देश - विदेशातून आलेल्या दोनशेहून अधिक शोधनिबंधाच्या नियतकालिकाच्या दोन खंडांचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. तसेच इराणच्या कल्चर हाऊसचे डायरेक्टर मोहम्मद रेझा फजल यांचा संदेश डॉ. बेहजाद पाघेह यांनी वाचून दाखवला. सूत्रसंचालन प्रा. अनुजा झाटे यांनी केले. आभार समन्वयक प्रा. नंदकिशोर मेटे यांनी मानले. परिषदेच्या आयोजनात डॉ. बेहजाद पाघेह, डॉ.संजय एकसंबेकर, सायरसच्या प्राचार्या राजलक्ष्मी, उपप्राचार्य डॉ.अविनाश बोरकर, सचिव डॉ. निलेश शितोळे, कला विभाग प्रमुख डॉ. समीर आबनावे, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. सुजाता गायकवाड, संगणक विभाग प्रमुख प्रा.वैशाली चौधरी, सहसमन्वयक डॉ. अमोल बोत्रे यांनी सहभाग घेतला.

# महिमा शिव उपासनेचा

**भगवान शंकरांनी हजारो भक्तांना, ऋषी-मुनींना तसेच देवांप्रमाणे दानवांनादेखील वर दिले. त्यांना जीवनाची प्रणाली, तत्त्वं शिकवली. अशा भोळ्या शंकराची आराधना करण्याचा उत्सवदिवस म्हणून आपण महाशिवरात्र साजरी करतो. प्रत्येक महिन्याच्या वद्य चतुर्थीला शिवरात्र म्हणतात. परंतु माघ महिन्यातील शिवरात्र विशेष महत्त्वाची मानली जाते. व्रतवैकल्य, उपवास आणि शिवआराधनेद्वारे श्रद्धापूर्वक हा दिवस साजरा होतो.**



आपल्या संस्कृतीत विविध सणवारांचं नेमकं महत्त्व आहे. विशिष्ट ऋतूमानानुसार येणाऱ्या सणवारांच्या निमित्तानं निसर्गाचं पूजन केलं जातं. या भारतभूमीत विविध देवी-देवतांचं वास्तव्य राहिलं आहे. त्यांच्या वास्तव्यानं विविध ठिकाणं पावनं झाली आहेत. अशा पवित्र ठिकाणी त्या त्या दैवतांच्या मंदिरांची उभारणी करण्यात आली. आजही अशा ठिकाणी दर्शनासाठी भाविकांची मोठ्या संख्येनं गर्दी होत असते. आपल्याकडे वर्षभर सणवारांची रेलचेल असते. माघ महिन्यात गणेश जयंतीचा सोहळा मोठ्या भक्तीभावानं साजरा केला जातो. या निमित्तानं विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न होतात. यानंतर वेध लागतात ते महाशिवरात्रीचे. महाशिवरात्री म्हणजे भगवान शंकराच्या भक्तांसाठी मोठी पर्वणीच असते. 'हर हर महादेव', 'शंभो शिवशंकर'च्या गजरात महादेवाच्या मंदिरात दर्शनासाठी लाखो भक्तांच्या रांगा लागतात.

शंकर हे अनेकांचं श्रद्धास्थान आहे. खरं तर श्रद्धेशिवाय जगण्याला काहीच अर्थ नाही. आई-वडिलांवर, गुरुजनांवर, देशावर, कामावर आणि धर्मावर श्रद्धा हवी. इथेच आपली पाळमुळं रुजलेली असतात. सण-उत्सव हादेखील त्यातीलच एक भाग आहे. सन-उत्सवांच्या साजरीकरणातून आपल्या अमूल्य अशा संस्कृतीचं जतन केलं पाहिजे. भारतीय संस्कृतीतील सौंदर्य आणि तत्वज्ञानाला तोड नाही. श्रीकृष्णाने अर्जुनाला गीता सांगितलं पण या मार्गाने सर्वांनाच कर्तव्यप्रवृत्त केलं. त्याचप्रमाणे भगवान शंकरांनी हजारो भक्तांना, ऋषी-मुनींना आणि देवाप्रमाणे दानवांनासुद्धा प्रसन्न होऊन 'वर' दिले. जीवनाची प्रणाली, तत्त्वे त्यांना शिकवली. अशा भोळ्या शंकराची आराधना करण्याचा उत्सवदिवस म्हणून आपण महाशिवरात्रीकडे पाहतो. प्रत्येक महिन्याच्या वद्य चतुर्थीस शिवरात्र म्हणतात; परंतु माघ महिन्यातील शिवरात्र विशेष महत्त्वाची मानली जाते.

या दिवशी शिवलिंगास अभिषेक करुन १०८ किंवा सहस्त्र बिल्वपत्रे वाहून उपवास करतात. शिवमंदिरात रात्रभर जप-स्त्रोत्रे म्हटली जातात. या दिवशी शिवाची प्रदोष पूजा करतात. सोमवार हा शिवाचा वार असल्यामुळे सुवासिनी १६ सोमवारचं व्रत करतात. प्रदोषकाळी भक्तगण भस्म आणि रुद्राक्ष धारण करून शिवाच्या मंदिरात जातात. यावेळी शिवाचं ध्यान केलं जातं. त्यानंतर भगवान श्री शंकराची षोडशोपचार पूजा होते. महाशिवरात्रीच्या दिवशी शिवाला १०८ कमळं किंवा बेलाची पानं अर्पण करण्याची प्रथा आहे. त्याचप्रमाणे पुष्पांजली अर्पण करुन अर्ध्य दिलं जातं. पूजा, स्त्रोत्रपाठ आणि मूलमंत्राचा जप याही बाबी महत्त्वाच्या ठरतात. ही पूजा श्रद्धापूर्वक व्हायला हवी. मनोभावे पूजा केल्यावर हातून कळत-नकळत घडलेल्या दुष्कृत्यांबद्दल क्षमायाचना करावी. या काळात चार प्रहरी चार पूजा कराव्या, असं सांगण्यात आलं आहे. त्यांना 'ग्रामपूजा' म्हणतात. प्रत्येक ग्रामपूजेत देवाला अभ्यंगस्नान घालावं. अनुलेपन करावं. धोत्रा, आंबा आणि बेल यांची पत्री वहावी. तांदळाच्या पिठाचे २६ दिवे करुन त्यांनी देवाला ओवाळावं. पूजेच्या शेवटी १०८ दिवे दान करावे. प्रत्येक पूजेतील मंत्र वेगवेगळे असतात. त्यांनी अर्ध्य द्यावं. महाशिवरात्रीच्या रात्री नृत्य, गीत, कथाश्रवण आदींमध्ये भक्तीभावनेने लीन व्हावं असं महाशिवरात्रीच्या व्रताचं महात्म्य सांगितलं जातं.

'नम: शिवाय' हा शिवाचा पंचाक्षरी मंत्र आहे. त्यातील प्रत्येक अक्षराचा अर्थ जाणून घ्यायला हवा.

**न** = समस्त लोकांचा आदीदेव.

**म:** = परमज्ञान देणारा आणि महापातकांचा नाश करणारा.

**शि** = कल्याणकारी, शांत आणि शिवानुग्रहाला कारणीभूत असणारा.

**वा** = वृषभवाहन, वासुकि, वामांगी, शक्ती यांचा सूचक.

**य** = परमानंदरुप आणि शिवाचे शुभ असे वास्तव्यस्थान.

अशा या शिवाला नमस्कार असो अशी या जपामागची भावना आहे.

आपल्याकडे देवपूजेतील प्रत्येक कृतीला अर्थ आहे. पुजेच्या वेळी केला जाणारा प्राणायाम हा फुफ्फुसांची ताकद वाढवतो. रोगाला दूर ठेवतो तर 'ॐ नम: शिवाय' सारख्या जपामुळे दीर्घश्वसन घडतं. तीर्थरूपात मिळणारं पंचामृत प्राशन केल्यामुळे त्यातील दूध, मधासारख्या शरीराला उपकारक ठरणाऱ्या घटकांचा लाभ मिळतो. पूजा-अर्चनेमुळे मन एकाग्र होतं. सध्याच्या धकाधकीच्या जीवनात या मानसिक शांततेची खरी आवश्यकता आहे. आरोग्याच्या दृष्टीनेही मन:शांती आवश्यक असते. आपल्याकडे मोठ्यांना नमस्कार करण्याची पद्धत आहे. 'नमस्कारे लीनता घडे, नमस्कारे विकल्प मोडे' अशा तऱ्हेने त्यातून नम्रता तर दिसतेच पण शरीरालाही एक प्रकारचा व्यायाम होतो.

प्रासंगिक

वाकल्यामुळे, मेंदूकडे जास्त रक्तपुरवठा होतो. आरोग्याच्या दृष्टीने हे फायदेशीर असतं. आपण दारात तुळस लावतो, तुळस ही अतिशय औषधी वनस्पती आहे. त्यामुळे सर्दी, खोकला झाल्यास त्यावर बहुगुणी असा तुळशीच्या पाल्याचा काढा तयार करता येतो. त्याचप्रमाणे तुळस दारात असल्यास डास, माशाही कमी होतात. शंकराच्या मंदिरात आपण बेल वाहतो. त्यामागेही शास्त्रीय कारण आहे. या सर्वच वनस्पती औषधी आहेत. मानवी आरोग्याच्या दृष्टीने त्यांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. ते लक्षात घ्यायला हवं.

भारतामध्ये बारा ज्योतीर्लिंगे आहेत. महाराष्ट्रात त्याचं महत्त्व वेगळंच आहे. देशामधील सोरटी-सोमनाथ, मल्लिकार्जून, महाकालेश्वर, ओंकार-अमलेश्वर, वैद्यनाथ, भीमाशंकर, रामेश्वर, नागेश्वर, काशीविश्वेश्वर, त्र्यंबकेश्वर, केदारेश्वर, घृणेश्वर या सर्व मंदिरात महाशिवरात्रीच्या दिवशी भाविकांची दर्शनासाठी खूपच गर्दी असते. या स्थानांना वेगळं असं पौराणिक महत्त्व आहे. या सर्व स्थळांना भाविक अत्यंत श्रद्धेने भेटी देतात. मन:शांती हा त्यातील अत्यंत महत्वाचा भाग. या सर्व सण-उत्सवांची बैठक वैज्ञानिक दृष्टीकोन लक्षात ठेवून केल्यामुळे त्याचे अप्रत्यक्ष फायदेही खूप होतात. प्रत्येक सण-उत्सवातील पदार्थ हा वेगळा आणि वैशिष्ट्यपूर्ण असतो. उपवास हा यामधील श्रद्धेचा भाग मानला जातो. यात आहारशास्त्राचा विचार केला असल्यामुळे आपलं आरोग्य चांगलं राहतं.

कोणत्याही गोष्टीचा संबंध धर्माशी जोडल्यावर त्यातील चांगल्या गोष्टी आत्मसात करणं सोपं जातं, हे ओळखून आपल्या पूर्वजांनी समाजहितकारक अशा अनेक गोष्टींचा धर्माशी समन्वय साधला. उदा. वृक्षपूजा, प्राण्यांना देव मानून पूजा करणं यामुळे आपोआपच निसर्गाचा समतोल राखला जाई. झाडे तोडणं, प्राण्यांना मारणं आदी कृत्ये रोखण्यासाठी पूर्वी कायदे करावे लागले नाहीत. निसर्गपूजेतून समाजाचा डोळस दृष्टीकोनच समोर आला आहे. पूर्वीच्या काळी निसर्गाच्या समतोलाविषयी पुरेशी काळजी घेतली जात असे. सध्या मात्र ही जाणीवच नाहिशी झालेली आहे. त्यामुळे नव्याने निसर्गाशी जवळीक साधण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. त्यासाठी व्रतवैकल्याचा आधार मोलाचा आहे.

महाशिवरात्रीसारख्या अनेकविध सण उत्सवानिमित्त यात्रेच्या रुपाने अनेक लोक एकत्र येतात. त्यातून नवीन ओळखी होतात. दुर्मीळ होत असणारा सुसंवाद प्रस्थापित होण्यास ही एक चांगली संधी असते. यातूनच एकमेकांचं सुख-दु:ख कळतं, प्रेम वाढतं, सहकार्य वाढतं आणि त्याचा समाजाला फायदा होतो. सण-उत्सवानिमित्त आपण घर तर स्वच्छ करतोच पण त्यातून परिसरही स्वच्छ होतो. दाराला लावलेलं तोरण, अंगणातील सुबक रांगोळी असं मंगलमय वातावरण निर्माण झाल्याने हे सण-उत्सव आपल्याला अपार आनंद देऊन जातात. समाजात एकोपा, बंधुभाव वाढीला लागणाच्या दृष्टीने उत्सवांचं महत्त्व मोठं आहे. समाजाच्या विविध घटकातील कटुता नाहीशी होऊन जगाला शांततेचा आणि एकतेचा संदेश देण्यासाठी पुरेसं बळ मिळावं हीच प्रार्थना या महाशिवरात्रीच्या निमित्तानं भगवान शंकराकडं करू या.

# कसा मिटवायचा वाद?

हिंदू धर्मातील धर्मग्रंथांमधून आयुष्याला एक मार्ग मिळतो. आयुष्यातल्या अनेक प्रसंगांवर मात करण्याची शक्ती मिळते. हिंदू धर्मातल्या पौराणिक कथा वेगवेगळ्या युगांमध्ये घडल्या असल्या तरी आजच्या अनेक प्रसंगांमध्येही या कथांचं सार लागू पडतं. वादविवाद टाळून मार्ग कसा काढायचा हे या कथांमधून आपल्याला शिकायला मिळतं. वादविवादांवर कसा मार्ग काढायचा हे आपण रामायणातून शिकू शकतो. राजा दशरथाच्या तीन राण्या होत्या. कौशल्या, सुमित्रा आणि कैकयी. या राण्यांचे चार पुत्र. राम, लक्ष्मण, भरत आणि शत्रुघ्न. श्रीराम सर्वात मोठा. म्हणून अयोध्येचं राज्य रामाला देण्याचा निर्णय दशरथाने घेतला. अयोध्येचा भावी राजा म्हणून तो रामाकडे पाहत होता.




पण कैकेयीला हे मंजूर नव्हतं. आपला मुलगा भरत याला अयोध्येचं राज्य मिळावं, अशी इच्छा तिच्या मनात जागी झाली. कैकेयीची दासी मंथरेने तिचे कान भरले आणि रामावर जीवापाड प्रेम करणाऱ्या कैकेयीने त्याला वनवासात पाठवलं. आज्ञाधारक रामाने आपल्या पित्याची आज्ञा मान्य करून वनवासाचा रस्ता धरला. लक्ष्मण आणि सीतेनेही त्याला सोबत करायचं ठरवलं.

सेल्फ हेल्प

रामाच्या चौदा वर्षांच्या वनवासकाळात भरताने त्याच्या पादुकांची मनोभावे पूजा केली. अयोध्येच्या राजसिंहासनावर रामाचा अधिकार आहे हे तो जाणून होता. म्हणूनच सिंहासनावर रामाच्या पादुका ठेऊन १४ वर्षं कार्यभार सांभाळला. चौदा वर्षांनंतर राम अयोध्येला परत आल्यानंतर भरत या जबाबदारीतून मुक्त होतो आणि रामाला राजसिंहासन सोपवतो. अर्थात या काळात सगळे वाद संपुष्टात आलेले असतात. सगळं काही छान होतं. पृथ्वीवर रामराज्य अवतरतं. वादविवादांवर बुद्धीच्या जोरावर योग्य मार्ग काढण्याचं भरताने ठरवलं. त्याला मार्ग मिळाला. भरताने चातुर्य दाखवलं आणि भावंडांमध्ये कोणतंही वितुष्ट येऊ दिलं नाही. धैर्य आणि बुद्धी यांचा वापर करून माणूस प्रत्येक परिस्थितीचा सामना करू शकतो. प्रत्येक परिस्थितीतून मार्ग काढू शकतो. रामायणातून आपण हा धडा घेऊ शकतो.

# खडकातून साकारले मंदिर

स्थापत्यकलेचा उत्तम नमुना असलेली अनेक मंदिरं भारतात आहेत. खजुराहोची मंदिरं वास्तूकलेला उत्तम नमुना म्हटली पाहिजे. देशातल्या प्रत्येक राज्यात वैशिष्ट्यपूर्ण मंदिरं आहेत. राजस्थानातील राजसमंद आणि पाली जिल्ह्याच्या सीमेवर एक मंदिर वसलंय. भगवान परशुरामाने या मंदिराची निर्मिती केल्याचं बोललं जातं. परशुच्या सहाय्याने खडक कापून परशुरामाने हे मंदिर उभारलंय. 'टांगीनाथ धाम' या नावाने हे मंदिर ओळखलं जातं. पाली जिल्हयापासून १०० मीटर अंतरावर हे मंदिर वसलंय. कुंभलगडपासून हे मंदिर अवघ्या १० किलोमीटर अंतरावर आहे. या मंदिरात परशुरामाच्या परशुचं दर्शनही घेता येतं. म्हणूनच या मंदिरात भाविकांची बरीच गर्दी झाल्याचं पहायला मिळतं.




भगवान परशुरामाला विष्णूचा अवतार मानलं जातं. परशुरामाने पृथ्वी नि:क्षत्रिय केली होती. हे मंदिर एका गुहेत आहे. या मंदिरापर्यंत जाण्यासाठी ५०० पायऱ्या चढाव्या लागतात. परशुरामाने त्रेतायुगात कठोर तपश्चर्या केली होती. शिवलिंग समोर ठेऊन तपश्चर्या केली होती. हे शिवलिंग या मंदिरात पहायला मिळतं. राजस्थानात या मंदिराचं मोठं महत्त्व आहे. परशुरामाने स्थापन केलेल्या शिवलिंगाचं दर्शन घ्यायचं असेल तर या मंदिराला भेट द्यायला हवी. पण यासाठी राजस्थानातल्या पालीमध्ये जायला हवं. परशुरामाच्या अस्तित्त्वाने पावन झालेलं हे स्थान बरंच प्रसिद्ध आहे. याठिकाणी गेल्यावर परशुरामाच्या अस्तित्त्वाची जाणीव होत राहते. असं हे अनोखं मंदिर शिवभक्तांसाठी पर्वणीच आहे.

तीर्थक्षेत्र

# कायम रहा उत्साही

आपल्यापैकी प्रत्येकाने उत्साही आणि उल्हासित आयुष्य जगायला हवं. उत्साह आणि उल्हास हे आनंदी जीवनाचं गमक आहे. जीवनात आनंदी आणि उत्साही राहायचं तर आयुष्याचं एक उद्दीष्ट असलं पाहिजे. उद्दीष्टहीन मनुष्याचं आयुष्य पशुसमान मानलं जातं. मनुष्यजन्म मिळायला भाग्य लागतं. ८४ लक्ष योनींमधून फिरल्यानंतर मनुष्य जन्माचा लाभ होतो. म्हणूनच माणूस म्हणून जन्म घेतल्यानंतर आपण चांगली कर्म केली पाहिजेत. आयुष्याचं एक ध्येय निश्चित केलं पाहिजे. ध्येय निश्चित करून ते पूर्ण करण्यासाठी आपण झटलं पाहिजे. या ध्येयपूर्तीत प्रचंड आनंद असतो. संघर्ष असला तरी त्यातही एक मजा असते. या जगात अनेक आंदोलनं झाली. ही सगळी आंदोलनं ध्येय आणि उत्साहामुळे यशस्वी ठरली. मानवी हक्कांसाठीच्या या आंदोलनांमुळे आयुष्याला नवी दिशा मिळाली.




आता माझं वय झालं, या वयात मी काय करू. आयुष्य संपायची वेळ आली असं अनेक जण म्हणतात. पण उत्साह आणि उल्हास यांचा संबंध वयाशी लावता येत नाही. काही ज्येष्ठ नागरिक अशक्य असलेल्या गोष्टी करून दाखवतात. कुणी धावतो तर कुणी एव्हरेस्ट सर करून दाखवतो. आयुष्यात असलेल्या उत्साहामुळेच हे शक्य होतं. सेवानिवृत्ती पत्करल्यानंतर ज्येष्ठ नागरिकांच्या आयुष्यात कोणतंही उद्दीष्ट राहात नाही. त्यामुळे असे लोक पलंगावर पडून राहतात. त्यांचं शरीर रोगांचं, विकारांचं आगार बनतं. आता मी काय करू, असा प्रश्न पडतो आणि आयुष्य अर्थहीन होऊन जातं. म्हणून आयुष्यातला उद्देश कधीही हरवता कामा नये. ८० वर्षांच्या आज्जीने हे करून दाखवलं. नव्वदीचे आजोबा कॉम्प्युटर शिकले, असं आपण वाचतो, ऐकतो. आयुष्यातला उद्देश कधीही हरवू न देण्याच्या विचारामुळे ते असं करू शकतात. क्रियाशील असलेले लोक सतत आनंदी असतात. त्यांचं मन कायमच प्रसन्न असतं.

बोध

महर्षी वाल्मिकी म्हणतात की, माणसासाठी काहीही अशक्य नाही. यासाठी गरज असते ती उत्साहाची, उल्हासाची, उर्मीची. उत्साही मनुष्य अशक्य गोष्ट शक्य करून दाखवतो. दु:खामुळे आयुष्यातले यशाचे सगळे मार्ग बंद होतात. तर आनंदी आणि उत्साही राहिल्याने आयुष्याला नवी दिशा मिळते. सकारात्मकतेचा प्रभाव आयुष्यातल्या प्रत्येक निर्णयात दिसून येतो. आपण परिस्थितीला घाबरतो. पण त्याऐवजी स्वत:ला घाबरायला हवं. माझा मार्ग योग्य आहे का, हा प्रश्न स्वत:ला विचारा. मनाने होकार दिला तर पुढे जा. कोणताही विचार करू नका. मनात किंतू आणू नका. महात्मा गांधींनीही हेच सांगितलंय. कर्तव्याचा संघर्ष सुरू असेल तर मनातल्या सूक्ष्म शक्तीला आवाज द्या. तिच्याशी बोला. आपल्या मनाचा निर्णय अंतिम असू द्या.

# लाओत्सेंचा ताओ धर्म

चीनमध्ये ताओ धर्माला मान्यता मिळाली आहे. लाओत्से यांनी ताओ धर्माची स्थापना केली. लाओत्से यांना लाओ-सू किंवा लाओ-सी या नावानेही ओळखलं जातं. लाओत्से हे चीनमधले प्रसिद्ध तत्त्वज्ञानी. ताओ ते चिंग या नावानेही त्यांची ओळख आहे. या नावाने त्यांनी लेखन केलं. लोकांना उपदेश केला. लाओत्से यांच्या विचारधारेवर आधारित धर्म म्हणजे ताओ धर्म. लाओत्से यांना परमेश्वरासमान मानलं जातं. इसवीसन पूर्व सहाव्या शतकात झोऊ राजाच्या काळात लाओत्से होऊन गेले, असं चीनी लोकं मानतात. लाओत्से यांचे कान बरेच मोठे होते. मोठ्या कानाचे लोक बुद्धीवान असल्याचं मानलं जातं. त्यामुळे लाओत्से यांच्या चेहऱ्यावर ज्ञानाचं तेज झळकत असे. लाओत्से ९० वर्षं जगले.



लाओत्से यांच्या विचारांवर आधारित असलेला ताओ हा धर्म चीनमधला प्राचीन धर्म आहे. ताओ हा फक्त धर्म नाही तर हिंदू धर्माप्रमाणे ही एक जीवनशैली आहे. जुन्या काळात ताओ धर्माला ताओ दर्शन असं म्हटलं जायचं. गौतम बुद्धाच्या उदयानंतर चीनमध्ये बौद्ध धर्माचा प्रचार आणि प्रसार झाला. इथल्या विचारवंतांनी बौद्ध धर्मातलं तत्त्वज्ञान अंगिकारलं. यामुळे एका विचारावर आधारित असलेलं ताओ दर्शनाचं रूपांतर ताओ धर्मात झालं. अर्थात बौद्ध आणि ताओ या दोन्ही धर्मांमध्ये अहिंसात्मक संघर्ष होत राहिला. हा वैचारिक संघर्ष होता. पण आजच्या काळात या दोन्ही धर्मांचे, विचारधारेचे अनुयायी गुण्यागोविंदाने नांदत आहेत. जुन्या काळातला हा संघर्ष आता संपलाय. चीनमधली ५० ते ८० टक्के लोकसंख्या बौद्ध आहे. ताओ धर्माच्या अनुयायांची संख्या खूपच कमी झालीये. 'दाओ दे चिंग' आणि 'जुआंग जी' या ग्रंथांमधून लाओत्से यांनी आपले विचार मांडले. हे ग्रंथ ताओ धर्मांचे आधारस्तंभ मानले जातात. यिन आणि यांग हे ताओ धर्मातले देवी आणि देवता आहेत. या धर्मात कर्मकांड, पशुबळी यांना मान्यता आहे. लाओत्से यांचा ताओ धर्म आजही अस्तित्त्वात आहे.

धर्म देशोदेशीचे

# भाग्यकारक रोपटी

घरातला प्रत्येक कोपरा आपल्या आयुष्यावर प्रभाव टाकत असतो. यासोबतच घराच्या सजावटीसाठी वापरली जाणारी प्रत्येक वस्तूही कळत नकळत जीवनावर प्रभाव टाकत असते. या वस्तूंचा आपल्यावर सकारात्मक आणि नकारात्मक असा प्रभाव पडत असतो. घरात लावलेली झाडंही सौभाग्य आणि दुर्भाग्याला आमंत्रण देत असतात. आवड व हौस म्हणून आपण रोपटी लावतो. पण त्याचे चुकीचे परिणामही होऊ शकतात. म्हणूनच घरात कोणती झाडं लावणं शुभं मानलं जातं याविषयी जाणून घेणं गरजेचं ठरतं.



* अनेकांच्या घरात तुळशी वृंदावन असतं. तुळस दक्षिणेकडे ठेऊ नये. दक्षिणेकडे ठेवलेली तुळस नकारात्मक ऊर्जा निर्माण करते.

* घरात कृत्रिम रोपटी आणि झाडं लावू नये. कृत्रिम झाडं लावणं वास्तूशास्त्राला मान्य नाही. यामुळे घरात नकारात्मक ऊर्जेचा वास राहतो, असं म्हटलं जातं.

वास्तू भक्ती

* धनलाभाच्या दृष्टीकोनातून घरात मनीप्लांट लावला जातो. मनी प्लांट घराच्या दक्षिण-पूर्व दिशेला लावायला हवा. या रोपट्याला सतत पाणी द्यायला हवं. यामुळे धनलाभ होतो.

* बेडरूममध्ये रोपटी लावू नये. यामुळे पती-पत्नींमधला ताण वाढतो. वाद-विवाद, भांडणं होऊ शकतात.

* घर आणि ऑफिसमध्ये सकारात्मक ऊर्जा रहावी यासाठी फुलदाण्या ठेवा. परंतु फुलदाण्या रिकाम्या ठेऊ नका. त्यातील कोमेजलेली फुलं लगेच काढून टाका. त्या जागी ताजी फुलं ठेवा. कोमेजलेल्या फुलांमुळे नकारात्मक ऊर्जा निर्माण होते.

* कोरफड, कॅक्टससारखी रोपटी घरात लावू नये. काटेरी रोपट्यांमुळे घरात नकारात्मक ऊर्जेचा वास राहतो आणि स्वभाव आळशी बनतो. आजारपणांचं प्रमाण वाढतं.

* चंपा, चमेलीसारखी सुगंधी फुलांची झाडं घराच्या बाहेर लावता येतील. अशी झाडं घरात लावणं वास्तुशास्त्राला मान्य नाही.

# या सवयी बदला

हिंदू धर्मातील शास्त्रांमध्ये काही गोष्टी अशुभ मानण्यात आल्या आहेत. या संदर्भात आपल्या सवयींमधून विचार आणि संस्कारांचं दर्शन घडत असतं. या सवयी भविष्यातलं यश निश्चित करत असतात. शास्त्रांमध्ये उल्लेख करण्यात आलेल्या या सवयी अशुभ फळ देणाऱ्या आहेत. या सवयींविषयी जाणून घेऊन त्या बदलण्यातच खरा शहाणपणा आहे.



* आंघोळीनंतर स्वच्छतागृह घाण ठेवलं तर चंद्राचा कोप होतो. जलतत्त्वावर चंद्राचा प्रभाव असतो. त्यामुळे आंघोळीनंतर बाथरूम स्वच्छ करायला हवं. फरशीवर पसरलेलं पाणी काढून टाकायला हवं. यामुळे शरीराचं तेज वाढतं आणि चंद्राची आपल्यावर कृपा राहते.

* जेवल्यानंतर उष्ट ताट सिंक किंवा बाथरूममध्ये ठेवायला हवं. उष्ट ताट असंच टाकून गेल्याने आयुष्यात यश मिळत नाही. मेहनत केल्यानंतरही त्याचं योग्य फळ मिळत नसेल तर ही सवय बदलून बघा. उष्ट ताट जागेवर ठेवल्याने शनी आणि चंद्राशी संबंधित दोष दूर होऊन लक्ष्मीची कृपा राहते.

* पादत्राणं इतस्तत: ठेऊ नये. घरात पादत्राणं अस्ताव्यस्त पडली असतील तर मान-सन्मान कमी होतो. शत्रूचा त्रास वाढतो.

* पलंगावर सामान पडलं असेल, घाणेरड्या चादरी घातल्या असतील तर नकारात्मक प्रभाव पडतो. ही सवय आरोग्यासाठी हानिकारक मानली जाते.

शास्त्रांमधून

* मोठ्याने, रागाने बोलणाऱ्या व्यक्तीला शनिदोषाचा सामना करावा लागतो. त्यामुळे आपलं म्हणणं शांतपणे मांडा. घरात शांतता राखा. उगाचच आरडाओरडा करू नका.

* रात्रभर जागरण करणाऱ्या व्यक्तीला चंद्रदोषाचा सामना करावा लागतो. अशा लोकांना बरेच ताण असतात.

* थुंकण्याची सवय असलेल्या लोकांवर महालक्ष्मी रूसून बसते. या सवयीमुळे मान-सन्मान मिळत नाही.

* घरातल्या ज्येष्ठांचा अपमान केल्याने प्रगती खुंटते. घराची भरभराट होत नाही. ज्येष्ठ मंडळी खूश असलेल्या घरावर देवीदेवतांची कृपा राहते.

* पाय स्वच्छ ठेवले पाहिजे. पाय घाण असतील तर तुम्हाला यश मिळत नाही. तसंच इतरांपुढे अपमान होतो.



“तुम्हाला काय वाटतं की, आम्ही फक्त मॅक्सवेलविरूद्ध खेळायला आलोय? असं होईल असं वाटतं का? आम्ही संपूर्ण ऑस्ट्रेलियन संघासाठी रणनिती आखली आहे. मला माहित आहे की तो (मॅक्सवेल) २०२३ च्या विश्वचषकात चांगला खेळला आहे, पण ती भूतकाळातील गोष्ट आहे.” “त्यानंतर आम्ही त्यांना टी-२० विश्वचषकात पराभूत केले आणि आम्ही सर्व विरोधी संघांचा विचार केला. आम्ही कोणत्याही एका खेळाडूसाठी नियोजन करण्यासाठी मैदानात उतरत नाही. रणनितीसह उतरण्याचा आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करू. आम्ही केवळ मॅक्सवेलविरुद्ध खेळत नाही. आम्ही ऑस्ट्रेलियाविरूद्ध खेळणार आहोत.”

— हशमतुल्लाह शाहिदी

# अफगाणिस्तानची फटकेबाजी

## ऑस्ट्रेलियासमोर २७४ धावांचे आव्हान : द्वारशीसने घेतल्या ३ विकेट्स

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क






**लाहोर :** आयसीसी स्पर्धेत आश्चर्यकारक कामगिरी करणाऱ्या अफगाणिस्तान संघाने आज चॅम्पियन्स ट्रॉफीतील महत्त्वाच्या सामन्यात चूक केल्याचे दिसले. पाच प्रमुख खेळाडूंशिवाय स्पर्धेत दाखल झालेल्या ऑस्ट्रेलियाला त्यांनी हलक्यात घेतले. पण, ऑस्ट्रेलियाचा संघ हा नेहमीच आयसीसी स्पर्धेत दमदार कामगिरी करतो आणि तशी आजही केली. एकवेळ सामना पूर्णपणे अफगाणिस्तानच्या हातात असल्याचे दिसत असताना ऑसी गोलंदाजांनी संघाला चांगले पुनरागमन करून दिले. मात्र, अटल व ओमरझाई यांच्या अर्धशतकांच्या जोरावर अफगाणिस्तानने सन्मानजनक धावसंख्या उभी केली.

स्पेन्सर जॉन्सनने पहिल्याच षटकात रहमनुल्लाह गुरबाझचा ( ०) त्रिफळा उडवला. पण इब्राहिम झाद्रान व सेदीकुल्लाह अटल यांनी अफगाणिस्तानला सावरले आणि पहिल्या १० षटकांत ५४ दावा फलकावर चढवल्या. ऑस्ट्रेलियाच्या जलदगती गोलंदाजांचा या दोघांनी संयमाने सामना केला. ही जोडी तोडण्यासाठी कर्णधार स्टीव्ह स्मिथने फिरकीपटू अॅडम झम्पाला आणले. त्याने १४व्या षटकात झाद्रानला ( २२) बाद करून ऑस्ट्रेलियाला यश मिळवून दिले. त्यानंतर ग्लेन मॅक्सवेलने रहमत शाह ( १२) याला बाद केले. अटलने ६४ चेंडूंत अर्धशतक पूर्ण करताना संघाला शतकी पल्ला गाठून दिला.

अटलने चांगली फलंदाजी केली होती आणि त्याला ८३ धावांवर पायचीत पकडण्याची संधी ऑस्ट्रेलियाला मिळाली होती. पण, स्मिथने DRS घेण्यास नकार दिला. त्याला कर्णधार हशमतुल्लाह शाहिदीने साथ देताना चौथ्या विकेटसाठी अर्धशतकी भागीदारी पूर्ण केली. या दोघांनी ऑस्ट्रेलियाला त्रास दिला होता आणि त्यामुळे आलेले नैराश्य ऑसींच्या चेहऱ्यावर दिसत होते. पण, स्पेन्सर जॉन्ससने मागील षटकात अटलला बाद करण्याची गमावलेली संधी पुढील षटकात खेचून आणली. स्मिथने सुरेख झेल टिपून अफगाणिस्तानला मोठा धक्का दिला.

अटल ९५ चेंडूंत ६ चौकार व ३ षटकारांसह ८५ धावांवर झेलबाद झाला. हशमतुल्लाहवर सर्व भीस्त होती, परंतु झम्पाच्या गोलंदाजीवर स्वीप मारण्याच्या प्रयत्नात तो २० धावांवर झेलबाद झाला. अझमतुल्लाह ओमरजाई आणि मोहम्मद नबी यांच्यातला चुकलेला ताळमेळ ऑस्ट्रेलियाने हेरला आणि नबी १ धावेवर धावबाद झाला. ओमारजाईला राशिद खानची साथ मिळाली आणि राशिदच्या फटकेबाजीने चाहत्यांची मनं जिंकली. तो १७ चेंडूंत १९ धावा करून माघारी परतला. स्पेन्सरने १०-०-४९-२ अशी स्पेल टाकली.

## १८ व्या वर्षी ग्रँडमास्टर जिंकणारा चॅम्पियन हरपला!



**नवी दिल्ली :** माजी जागतिक बुद्धिबळ चॅम्पियन बोरिस स्पास्की यांचे वयाच्या ८८ व्या वर्षी निधन झाले आहे. रशियन बुद्धिबळ महासंघाने याबद्दल माहिती देली, परंतु त्यांचा मृत्यू केव्हा झाला आणि मृत्यूचे कारण काय होते याबद्दल तपशील जाहीर केला नाही. पण १९६९ ते १९७२ या कालावधीत देशाचा निरोप १० वे विश्वविजेते ठरलेले बोरिस स्पास्की यांनी जगाचा निरोप घेतला आहे. त्यांनी वयाच्या १८ व्या वर्षी ग्रँडमास्टर किताब जिंकला होता. आंतरराष्ट्रीय बुद्धीबळ महासंघाने ट्वीट करत स्पास्की यांना श्रद्धांजली वाहीली आहे व त्यांच्याबद्दल माहिती दिली आहे. "त्याच्या पिढीतील सर्वात प्रतिभावान खेळाडूंपैकी एक असणाऱ्या १०व्या जागतिक चॅम्पियन बोरिस स्पास्की यांचे वयाच्या ८८ व्या वर्षी निधन झाले. स्पास्की यांना बुद्धिबळातील प्रतिभावान मानले जात असे. त्यांनी वयाच्या १८ व्या वर्षी ग्रँडमास्टरचे विजेतेपद मिळवले आणि १९ व्या वर्षी उमेदवारांच्या स्पर्धेत (ॲमस्टरडॅम, १९५६) पदार्पण केले.'

## केवीन पीटरसनचे दिल्ली कॅपिटल्समध्ये पुनरागमन

**नवी दिल्ली :** इंडियन प्रीमियर लीग २०२५ स्पर्धेला २२ मार्चपासून सुरुवात होत असल्याने आता सर्व संघ या हंगामासाठी तयारीला लागले आहे. यंदा मेगा ऑक्शन झाल्याने प्रत्येक संघात मोठे बदल घडले आहेत. फक्त खेळाडूंबाबतच बदल झालेले नाहीत, तर सपोर्ट स्टाफमध्येही बदल घडले आहेत. दिल्ली कॅपिटल्सनेही त्यांचा सपोर्ट स्टाफ बदलला आहे. रिकी पाँटिंग आणि दिल्ली कॅपिटल्सचेही मार्ग वेगळे झाले आहेत. दरम्यान आता इंग्लंडचा माजी कर्णधार केविन पीटरसनचेही दिल्ली कॅपिटल्स संघात पुनरागमन झाले आहे. दिल्ली कॅपिटल्स संघाचा मेंटॉर म्हणून पीटरसनची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे ४४ वर्षीय पीटरसन दिल्ली संघाला आयपीएलच्या १८ व्या हंगामात मार्गदर्शन करताना दिसणार आहे. आयपीएल २०२५ साठी दिल्ली संघाचे मुख्य प्रशिक्षक हेमांग बदानी आहेत, तर सहाय्यक प्रशिक्षक मॅथ्यू मॉट, गोलंदाजी प्रशिक्षक गोलंदाजी प्रशिक्षक आणि क्रिकेट संचालक वेनुगोपाल राव आहेत. त्यांच्यासोबत पीटरसन काम करणार आहे. पीटरसन यापूर्वी २०१२ आणि २०१४ साली आयपीएलमध्ये दिल्ली संघाकडून खेळला आहे. त्याने २०१२ साली ८ सामन्यात ३०५ धावा केल्या होत्या, तर २०२४ साली ११ सामन्यात २९४ धावा केल्या आहेत. त्याने या संघाचे नेतृत्वही केले आहे.



## सीमेवर शांतता नाही, तोपर्यंत भारत-पाकिस्तान मालिका नाही



**नवी दिल्ली :** चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत भारताने पाकिस्तानचा एकतर्फी पराभव केला आणि पाकिस्तानचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले. स्पर्धेचे यजमानपद पाकिस्तानमध्ये असल्यामुळे पाकिस्तानी मीडियाकडून भारताचे माजी क्रिकेटपटू सुनिल गावस्करांना स्पर्धेबाबत गप्पांसाठी आंमत्रित करण्यात आले. यावेळी पाकिस्तानी अँकरने भारत-पाकिस्तानमधील द्विदेशीय मालिकेबाबत प्रश्न विचारला, यावेळी गावस्कारांनी त्याला रोखठोक उत्तर दिले. मागच्या १२ वर्षांपासून भारत व पाकिस्तान दरम्यान द्विदेशीय मालिका खेळवण्यात आलेली नाही. दोन्ही देशांदरम्याम २०१२-१३ मध्ये अंतिम मालिका खेळवली गेली होती. ज्यावेळी पाकिस्तान संघ मर्यादित षटकांची मालिका खेळण्यासाठी भारतात आला होता. त्यानंतर राजकीय वातावरणामुळे दोन्ही देशांमध्ये मालिका खेळवण्यात आली नाही. एका मीडिया चॅनेलवरील मुलाखतीत पाकिस्तानी अँकरकडून गावस्करांना द्विदेशीय मालिकेबाबत प्रश्न विचारण्यात आला. त्यानंतर गावस्करांनी स्पष्ट शब्दात सांगितले की, "सीमेवर शांतता होत नाही तोपर्यंत भारत आणि पाकिस्तान यांच्यात द्विपक्षीय मालिका खेळवण्यात येणार नाही. आम्ही ऐकतो की घुसखोरी होत आहे, त्यांना थांबवले पाहिजे, मग आम्ही खेळण्याचा विचार करू शकतो." २३ फेब्रुवारी रोजी झालेल्या दुबईच्या आंतरराष्ट्रीय मैदानावर झालेल्या भारतविरूद्ध पाकिस्तान सामन्यात भारताने ६ विकेट्सने विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करणाऱ्या पाकिस्तानचा डाव भारताने २४१ धावांवर गुंडाळला आणि पाकिस्तानने दिलेले आव्हान भारताने ४२.३ षटकांत पूर्ण केले. ज्यामध्ये भारताचा स्टार क्रिकेटपटू विराट कोहलीने शतक ठोकले. आशिया क्रिकेट काउन्सिल (ACC) आशिया कप २०२५ स्पर्धा सप्टेंबरच्या दुसऱ्या ते चौथ्या आठवड्यादरम्यान घेण्याचा विचार करत आहेत. त्यामुळे भारत व पाकिस्तान संघ एकाच गटात असल्यास दोन्ही संघादरम्यान सामना रंगताना पाहायला मिळू शकतो. दोन्ही संघ अंतिम सामन्यापर्यंत पोहोचल्यास दोन्ही संघांदरम्यान एकूण ३ सामने होतील.

## पीसीयू मध्ये क्रीडारंभ महोत्सवाचा समारोप



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पिंपरी चिंचवड विद्यापीठ साते, वडगाव मावळ येथील प्रांगणात "क्रीडारंभ २०२५" या तीन दिवसीय वार्षिक क्रीडा महोत्सवाचा यशस्वी समारोप करण्यात आला. क्रीडारंभचे उद्घाटन क्रिकेटपटू रोहित मोटवानी याच्या हस्ते करण्यात आले होते. यावेळी पीसीयूच्या कुलगुरू डॉ. मनीमाला पुरी, प्र-कुलगुरू डॉ. सुदीप थेपडे, क्रीडा समितीच्या अध्यक्षा डॉ. प्रोतिभा नाथ बॅनर्जी, डॉ. अमित पाटील, डॉ. वी एन पाटील, डॉ. रामदास बिरादार, मकबूल खान, डॉ. अंजू बाला, डॉ. राजकमल उपाध्याय आदींसह विविध विभागाचे प्रमुख, प्राध्यापक व सहभागी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

क्रिकेट, फूटबॉल, व्हॉलीबॉल, कबड्डी या सांघिक खेळांबरोबरच कॅरम, बुद्धिबळ, बॅडमिंटन, टेबल टेनिस या वैयक्तिक स्पर्धा घेण्यात आले यामध्ये दीड हजार पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यशस्वी विद्यार्थ्यांना व संघांना प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. कौस्तुभ भोसले या विद्यार्थ्याने दिल्ली येथे झालेल्या १९ व्या आशियाई क्रीडा स्पर्धा मध्ये मिळवलेल्या उल्लेखनीय यशाबद्दल सत्कार करण्यात आला.

## बॅडमिंटन स्पर्धेत अर्चित खानदेशेला दुहेरी मुकुट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** टू एल्व्हस क्राफ़्टेड सोल्युशन्स पुरस्कृत योनेस्क सनराईज शटल चॅम्प्स बॅडमिंटन स्पर्धेत अर्चित खानदेशे याने ११ व १३ वर्षाखालील मुलांच्या गटात विजेतेपद पटकावत दुहेरी मुकुट संपादन केला. तर, शौर्य सातव, सिबतेनरझा सोमजी, सिद्धी जगदाळे, नितीन एस, देवांश सकपाळ, शिवांजली कर्दिले, आर्यन इपटे यांनी आपापल्या गटातील प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून विजेतेपद पटकावले.

डेक्कन जिमखाना व पीडीएमबीए बॅडमिंटन हॉलमध्ये पार पडलेल्या या स्पर्धेत अंतिम फेरीत ९ वर्षाखालील मुलांच्या गटात शौर्य सातवने मल्हार भोसलेचा १६-१४, ११-१५, १६-१४ असा तर, मुलींच्या गटात रावी कदमने तिथी वर्माचा १५-०५, १५-१० असा पराभव करून विजेतेपद पटकावले. ११ वर्षाखालील मुलांच्या गटात अव्वल मानांकित अर्चित खानदेशेने तिसऱ्या मानांकित कृष्णा सावंतचा १५-०४, १५-१० असा तर, मुलींच्या गटात अव्वल मानांकित कियारा साखरेने दुसऱ्या मानांकित विहा गुरवचा १५-१३, १५-०७ असा पराभव करून विजेतेपद मिळवले. १३ वर्षाखालील मुलांच्या गटात अव्वल मानांकित अर्चित खानदेशेने पार्थ शिंदेचा १५-११, १५-१२ असा तर, मुलींच्या गटात बिगरमानांकीत दिविशा सिंगने दुसऱ्या मानांकित अनिशा पिंगेचा १५-१२, १५-१२ असा पराभव करून विजेतेपदाचा मान पटकावला.

१५ वर्षाखालील मुलांच्या गटात अव्वल मानांकित सिबतेनरझा सोमजीने दुसऱ्या मानांकित जीवराज पाटीलचा १५-०४, १५-०७ असा तर, मुलींच्या गटात तिसऱ्या मानांकित सिद्धी जगदाळेने मौसम माने पाटीलचा १५-१२, १३-१५, १५-११ असा संघर्षपूर्ण पराभव करुन विजेतेपद पटकावले. १७ वर्षाखालील मुलांच्या गटात दुसऱ्या मानांकित देवांश सकपाळने अव्वल मानांकित नितीन एसचा १५-१०, १५-१२ असा तर, मुलींच्या गटात दुसऱ्या मानांकित शिवांजली कर्दिलेने अव्वल मानांकित एस दाखणेचा १५-१२,१२-१५, १५-०८ असा पराभव करुन विजेतेपद पटकावले. १९ वर्षाखालील मुलांच्या गटात नितीन एस, मुलींच्या गटात सिद्धी जगदाळे, पुरुष गटात आर्यन इपटे, ३० वर्षावरील पुरुष गटात उमाकांत सर्गे, महिला गटात मनाली कुलकर्णी देशपांडे, ३५ वर्षावरील पुरुष गटात स्वप्नील ओकने, महिला गटात विभा धीमान, ४० वर्षावरील पुरुष गटात धीरेंद्र वर्माने ४५ वर्षावरील महिला गटात सौम्या जयभारद्वाज हिने आणि ५० वर्षावरील पुरुष गटात निरंजन मंत्री यांनी विजेतेपद पटकावले.

## १६ वर्षाखालील टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत दक्ष पाटील, स्वानिका रॉय यांना दुहेरी मुकुटाची संधी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क





**पुणे :** फर्ग्युसन कॉलेज यांच्या वतीने व शेपिंग चॅम्पियन्स फाऊंडेशन पुणे यांच्या सहकार्याने आयोजित एमएसएलटीए फर्ग्युसन कॉलेज पीएमडीटीए अखिल भारतीय मानांकन सुपर सिरीज १६ वर्षाखालील टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत मुलांच्या गटात दक्ष पाटील, स्वानिका रॉय यांनी एकेरी व दुहेरी या दोन्ही गटात अंतिम फेरीत प्रवेश करत दुहेरी मुकुटाकडे वाटचाल केली आहे.

फर्ग्युसन कॉलेज टेनिस अकादमी येथे सुरु असलेल्या या स्पर्धेत एकेरीत मुख्य ड्रॉमध्ये उपांत्य फेरीत मुलांच्या गटात अव्वल मानांकित मनन अग्रवाल याने आपलाच राज्य सहकारी सहाव्या मानांकित वरद उंद्रेचा ४-६, ६-०, ६-४ असा पराभव करून अंतिम फेरी गाठली. हा सामना २ तास १५ मिनिटे चालला. पहिल्या सेटमध्ये सुरेख सुरुवात करत वरदने मननची नवव्या गेममध्ये सर्व्हिस ब्रेक केली व स्वतःची सर्व्हिस राखत हा सेट ६-४ असा जिंकून आघाडी मिळवली. दुसऱ्या सेटमध्ये मनन याने जोरदार कमबॅक करत दुसऱ्या व चौथ्या गेममध्ये वरद ची सर्व्हिस रोखली व हा सेट ६-० असा एकतर्फी जिंकून बरोबरी साधली. तिसऱ्या व निर्णायक सेटमध्ये दोन्ही खेळाडूंनी आठव्या गेमपर्यंत तोडीस तोड खेळ केला. त्यामुळे ४-४ अशी बरोबरी झाली. दहाव्या गेममध्ये मननने चतुराईने खेळ करत वरदची सर्व्हिस रोखली व हा सेट ६-४ असा जिंकून विजय मिळवला. दुसऱ्या सामन्यात आठव्या मानांकित महाराष्ट्राच्या दक्ष पाटील याने कर्नाटकच्या धनुष बेल्लापुराचा ६-३, ३-१ असा पराभव करून विजय मिळवला.

मुलींच्या गटात उपांत्य फेरीत अव्वल मानांकित पुण्याच्या स्वानिका रॉय हिने आपली शहर सहकारी पाचव्या मानांकित प्रार्थना खेडकरचा ६-३, ६-१ असा पराभव करून अंतिम फेरी गाठली.

## राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत महेश घुलेला रौप्यपदक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** अखिल भारतीय नागरी सेवा क्रीडा व सांस्कृतिक मंडळ यांच्यावतीने घेण्यात आलेल्या शासकीय अधिकारी-कर्मचारी यांच्या राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत पिंपरी चिंचवड निवड प्रादेशिक परिवहन विभागाचा राष्ट्रीय खेळाडू महेश घुलेने ७२ किलो वजन गटात ग्रीको रोमन या प्रकारांत रौप्यपदकाचा मान मिळविला.

म्हाळुंगे बालेवाडी येथे झालेल्या या स्पर्धेत ७२ किलो वजन गटाच्या अंतिम लढतीत हरियानाच्या अस्लम खानने महेश घुलेचा पराभव केला. या स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी अप्पर पोलिस महासंचालक दीपक पांडे, रुस्तुम ए हिंद किताब मिळविणारा अमोल बुचडे, राष्ट्रीय स्पर्धा समन्वयक जोगिंदरसिंग हे उपस्थित होते. पदक विजेता महेश घुलेचे परिवहन आयुक्त विवेक भिमनवार, भरत कळसकर, संजय म्हेत्रेवार, शैलेश कामत, संदेश चव्हाण, राहुल जाधव यांनी अभिनंदन केले आहे.

## सेमीफायनलमध्ये भारत कुणाशी भिडणार? गट ‘अ’ व गट ‘ब’चं कसं बदलतंय गणित?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** यंदाच्या चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत भारतीय संघानं आत्तापर्यंतच्या दोन्ही सामन्यांमध्ये विजय मिळवला आहे. सलामीच्या सामन्यात बांगलादेशला तर दुसऱ्या लढतीत पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानला नमवत टीम इंडियानं झोकात उपांत्य फेरी अर्थात सेमीफायनल गाठली आहे. पण आता सेमीफायनलचा सामना नॉकआऊट असल्यामुळे तिथे पराभूत झाल्यास टीम इंडियाला गाशा गुंडाळावा लागेल. त्यामुळे या सामन्यात भारताला कुणाशी दोन हात करावे लागणार? यासंदर्भात चर्चा सुरू झाली असून गट ‘ब’ मधील गणितांवर हे मोठ्या प्रमाणावर अवलबून असेल.

चॅम्पियन्स ट्रॉफीच्या सेमीफायनलमध्ये गट अ मधील सर्वात वरचा संघ गट ब मधील दुसऱ्या क्रमांकाच्या संघाशी खेळेल. दुसऱ्या सेमीफायनलमध्ये गट अ मधील दुसऱ्या क्रमांकाचा संघ गट ब मधील पहिल्या क्रमांकाच्या संघाशी खेळेल.

टीम इंडिया पहिल्या दोन सामन्यांत विजयी झाल्यामुळे सध्या गट अ मध्ये दुसऱ्या स्थानावर असून न्यूझीलंड दोन विजयांसह चांगल्या नेट रनरेटच्या जोरावर पहिल्या स्थानी आहे. पण येत्या रविवारी भारत व न्यूझीलंड यांच्यातील या गटातली शेवटची लढत होईल. या लढतीत भारतानं विजय मिळवला, तर भारत गट अ मध्ये पहिल्या क्रमांकावर येईल, तर न्यूझीलंड दुसऱ्या क्रमांकावर जाईल.

‘ब’ गटात सध्या मोठी चुरस निर्माण झाल्याचं पाहायला मिळत आहे. सध्या दक्षिण आफ्रिका व ऑस्ट्रेलिया दोन सामन्यांमध्ये तीन गुणांसह अनुक्रमे पहिल्या आणि दुसऱ्या स्थानी आहेत.

## सलग तिसरा पराभव; गुजरातचा दणदणीत विजय

# घरच्या मैदानात आरसीबीची गाडी अडखळली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**बंगलुरू :** वूमन्स प्रीमियर लीग २०२५ स्पर्धेत सलग दोन विजयांसह दणक्यात सुरुवात करणाऱ्या गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला गुरुवारी (२७ फेब्रुवारी) सलग तिसऱ्या पराभवाचा सामोरं जावं लागलं आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला गुरुवारी गुजरात जायंट्सने ६ विकेट्सने पराभूत केलं. हा सामना बंगळुरूच्या एम चिन्नास्वामी स्टेडियमवर खेळवला गेला होता. विशेष म्हणजे रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने त्यांचं घरचं मैदान असलेल्या चिन्नास्वामी स्टेडियमवरच सलग तीन पराभव स्वीकारले आहेत.

या सामन्यात बंगळुरूने गुजरातसमोर १२६ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग गुजरातने १६.३ षटकात ४ विकेट्स घेत पूर्ण केले. गुजरातच्या विजयात कर्णधार ॲश्ले गार्डनरने किफायतशीर गोलंदाजी आणि आक्रमक फलंदाजी करत मोलाचा वाटा उचलला. गुजरातकडून बेथ मुनी आणि दयालन हेमलता यांनी डावाची सुरुवात केली होती. पण दयालनला ५ व्या षटकात १५ चेंडूत ११ धावा करूनच बाद झाली. त्यानंतर मुनीही २० चेंडूत १७ धावा करून बाद झाली.

दरम्यान, बंगळुरूच्या गोलंदाजांनी ८ व्या षटकापर्यंत गुजरातवर दबाव ठेवला होता. त्यांना फार मोठे शॉट्स खेळण्याची संधी दिली नव्हती. परंतु, चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला उतरलेली कर्णधार ॲश्ले गार्डनरने आक्रमक खेळ केला आणि ९ व्या षटकात तिने ४ चौकार आणि १ षटकारासह १९ धावा केल्या आणि गुजरातवरील दबाव दूर केला. मात्र हर्लिन देओल १० व्या षटकात ५ धावांवर बाद झाली. पण फोबी लिचफिल्डने गार्डनरची चांगली साथ दिली. या दोघींनी गुजरातला विजयाच्या जवळ नेले. गार्डनरने अर्धशतकही केले. परंतु, गुजरातला विजयासाठी ९ धावांचीच गरज असताना गार्डनर १६ व्या षटकात बाद झाली. गार्डनरने ३१ चेंडूत ६ चौकार आणि ३ षटकारांसह ५८ धावांची खेळी केली.

#रा